शनिवार । २६ सप्टेंबर १९८१ । एक रुपया

माणूस

# भ्रष्टाचाराचा उगम इंदिरा-पद्धतीच्या शासनातच आहे.

संपादक, 'माणूस' यांस,

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री श्री. अंतुले यांनी इंदिरा प्रतिभा प्रतिष्ठानसाठी साखर कारखान्यांकडून म्हणजेच एक प्रकारे ऊस उत्पादक शेतकऱ्यांकडूनच देणग्या उकळल्या. या प्रकरणी प्रथम आवाज उठविण्याचे काम इंडियातील सधन व निर्धनांविरुद्ध लढणारे, भारतातील आम जनतेचे नेते श्री. शरद जोशी करतील अशी अपेक्षा होती. त्यांनी हे काम व्यवस्थितपणे टाळले. परंतु आपणही याबाबत फारसे लिहिल्याचे आठवत नाही हे आमचे दुर्दैवच !

यावरून तरी असाच बोध घ्यावयास हवा आणि तो म्हणजे 'इंडिया' व 'भारत' दोन्हीमधील गरिबांची खरीखुरी एकजूट घडवून आणली तरच या देशात बदल होऊ शकतो आणि त्यासाठी कितीही आव आणला तरी प्रत्यक्षात तथाकथित भारतातील सधनांची बाजू घेणाऱ्यांपासून अपेक्षा न बाळगणेच उचित. कळावे.

१४ सप्टेंबर — भालचंद्र राजे, कल्याण

**स. न.**

(१) मुख्यमंत्री श्री. अंतुले यांनी इंदिरा प्रतिभा प्रतिष्ठानसाठी साखर कारखान्यांकडून ज्या देणग्या उकळल्या त्या परत कराव्यात, अशी मागणी शेतकरी नेते श्री. शरद जोशी यांनी केल्याचे वृत्तपत्रातील बातम्यांवरून समजते.

(२) पण साखर कारखान्यांकडून, म्हणजेच पर्यायाने आपल्या ( = श्री. राजे) म्हणण्यानुसार ग्रामीण सधनांकडून मुख्यमंत्री अंतुले यांनी देणग्या उकळल्या असतील तर आपण ( = श्री. राजे ) वास्तविक या उकळाउकळीचे स्वागत नाही तरी निदान तिचा निषेध करण्याचे तरी काय कारण ? आपापाचा माल गपापाकडे गेला म्हणून ना खेद ना खंत अशी आपल्यासारख्यांची भूमिका असायला हवी.

(३) 'माणूस'मधून याबाबत फारसे नाही तरी पुरेसे टीका-निषेधपर लिखाण येऊन गेलेले आहे. भ्रष्टाचाराविरुद्ध सर्वंकष लढाई हवी. हल्ली चालू आहे तसे केवळ अंतुले-हटाव उपयोगी नाही. बिहारचे मुख्यमंत्री गफूर किंवा गुजराथचे चिमणभाई यांच्या विरुद्ध ७-८ वर्षांपूर्वी विद्यार्थ्यांचा, जनतेचा जसा उत्स्फूर्त उठाव झाला तसा हा अंतुले-हटावचा कार्यक्रम अजून तरी दिसत नाही. त्या वेळच्या विद्यार्थ्यांच्या उठावात अपरिपक्व असली तरी नैतिकतेची, नवनिर्माणाची एक प्रेरणा होती. म्हणूनच जयप्रकाशजी त्याकडे आकृष्ट झाले व भ्रष्टाचारविरोधी लढ्याला त्या वेळी एक उंची प्राप्त झाली. अंतुले यांनी निर्विवादपणे भ्रष्टाचार केलेला आहे; पण या भ्रष्टाचाराचा उगम इंदिरा पद्धतीच्या शासनात आहे. कर्नाटकातील गुंडुरावांनी कोणता भ्रष्टाचार करायचा बाकी ठेवला आहे ? पण त्यांना अद्याप इंदिरा गांधींनी काढून टाकले नाही. भ्रष्टाचारापासून बऱ्याच प्रमाणात अलिप्त राहू शकणाऱ्या पर्यायी नेतृत्वाचा लाभ झाला तर भ्रष्टाचारविरोधी आंदोलन थोडेफार तरी यशस्वी होऊ शकते. जिजामाता प्रतिष्ठानवाल्यांनी इंदिरा प्रतिष्ठानवाल्यांची लक्तरे कितीही टांगली तरी काय उपयोग ? सगळेच एका माळेचे मणी आहेत अशी आज लोकांची भावना झाली आहे. म्हणून जयप्रकाशांसारखे नैतिकतेची ग्वाही देणारे नेतृत्व आवश्यक असते. तसे नेतृत्व अगदी नक्षलवाद्यांकडून जरी पुढे आले तरी तेवढ्यापुरते 'माणूस' त्याचे स्वागतच करील.

(४) ग्रामीण व शहरी गरिबांची एकजूट घडवून आणली तरच देशात बदल होऊ शकतो हा आपण ( = श्री. राजे) घेतलेला 'बोध' ठीकच आहे; पण मांजराच्या गळ्यात ही घंटा बांधणार कोण ? वाटत होते की माओने चीनमध्ये अशी घंटा बांधली. पण सध्या तिथे काय चालू आहे ? माओ जिवंत असतानासुद्धा त्याचा जयप्रकाश होऊ लागलाच होता. तेव्हा केवळ वर्गीय एकजूट वगैरे पुरेशी नाही. व्यक्तीने, आपणहून बदलण्याची धडपडही केली पाहिजे. अशी काही धडपड, नवी जाणीव, सध्याच्या अंतुले-हटाव मोहिमेच्या बुडाशी दिसत नाही. म्हणून 'माणूस'ने 'फारसे' लिहिले नाही. 'पुरेसे' मात्र वेळच्यावेळी 'माणूस'मधून आलेले आहे.

— संपादक

# भ्रष्टाचारविरोध...असाही

कालिकत येथील सरकारी इस्पितळ. कालिकत मेडिकल कॉलेज ही त्या इस्पितळाला जोडून असलेली शिक्षणसंस्था. तेथील डॉक्टर्स लाचखाऊ म्हणून प्रसिद्ध. जनतेचं म्हणणं असं की, हे सरकारी संस्थान असल्याने इथे रुग्णसेवा उपचार वगैरे मोफत व्हायला पाहिजेत. इथे येणारे बहुसंख्य रुग्ण कालिकतजवळच्या अविकसित भागातले. साध्या औषधासाठीसुद्धा ज्यांच्याकडे पैसा नाही ते या डॉक्टरांचे हात ओले करण्यासाठी कोठून पैसा आणणार ?

केरळच्या 'जनकीय संस्कारिक वेदी' नावाच्या संघटनेनं हे भ्रष्टाचाराचं प्रकरण धसाला लावायचं ठरवलं. वेदीचे कार्यकर्ते बहुतेक तरुण, पेशेवर आणि कॉलिज विद्यार्थी यांच्यामधले. सामाजिक-राजकीय अन्यायाविषयी विशेष जागरूक. पांढरपेशी मध्यम वर्गाच्या सुखविलासाला वाहिलेली सध्याची 'वर्चस्ववादी सरंजामी आणि भांडवली संबंधा'वर आधारलेली ही समाजरचना बदलायला पाहिजे; आवश्यक तर पक्षाच्या मदतीनं धक्का देऊन पाडायला पाहिजे अशा मताची.

या भ्रष्टाचाराविरुद्ध जनजागरण करायच्या उद्देशानं वेदिनं दहा दिवस धरणं, निदर्शनं वगैरे प्रकार केले. भ्रष्टाचाराचे बळी बरेच होते. त्यांचा पाठिंबा मिळाला. कालिकतच्या सर्वसामान्य नागरिकानाही समजून चुकले की, आपण असेच उदासिन राहिलो तर या कॉलेजच्या भ्रष्ट डॉक्टर-विद्यार्थी– हाऊस सर्जनांच्या मगरमिठीत आवळले जाऊ अनेक रुग्ण, विद्यार्थी आणि हाउस-सर्जनांच्या मुलाखती घेऊन सत्य परिस्थितीचे यथार्थ चित्रण करणारा एक अहवाल वेदीनं प्रसिद्ध केला. त्या अहवालामध्ये वेदीनं १४ भ्रष्टाचारी डॉक्टराची यादीच दिली. सगळ्यात भ्रष्ट लाच खावू म्हणून डॉ. जॉर्ज यांचे नाव प्रथम क्रमांकावर होते.

अहवालापाठोपाठ कालिकत शहरात आणि आसपास लोकांच्या कृती-समित्या बनवण्यात आल्या. वेदीच्या चळवळीला संघटित जन-आंदोलनाचे स्वरूप येत चालले. लोकाच्या प्रतिक्रिया जोरदारपणे व्यक्त व्हायला लागल्या–

'खरं म्हणजे हे वैद्यकी महाविद्यालय आहे. इथले डॉक्टर्स हे आम्हा विद्यार्थ्यांना शिकवण्याकरता आहेत; पण वर्गावर शिकवायला कुणीच येत नाही. या संस्थेचा ते खाजगी नर्सिंग होमसारखा वापर करताहेत, सार्वजनिक इपितळ म्हणून नाही. पहिली गोष्ट म्हणजे त्यांना बाहेर प्रॅक्टीस करायची परवानगी नाही. म्हणून ते आपल्या खाजगी पेशंटांना इथे अग्रहक्काने ॲडमिट करतात. गरिबांना त्यामुळे कित्येक आठवडे ॲडमिशन मिळत नाही.'

'वरच्या अधिकाऱ्याना काय या गोष्टी माहीत नाहीत ? चांगल्या माहीत आहेत; पण ते सगळे सामील आहेत. आमचे प्राचार्य म्हणतात, 'लख्ख पुरावा नसल्याने आम्ही काही ॲक्शन घेवू शकत नाही.' आणि पुरावा द्यायला जावे तर आम्ही पडलो त्याचे विद्यार्थी, आमचे रिझल्ट आमच्या पदव्या यांच्या हातात.'

'या चौदाही डॉक्टराना वाटतं की, कायदा आपलं काही वाकडं करू शकत नाही. कुणी पोलिसात बातमी दिली तरी ते लाच चारून त्यातून बाहेर निसटू शकतात. लाच द्यायला त्यांच्याकडे पैशाचा तोटा नाहीच.'

वेदीचं हे जन-आंदोलन पसरू लागलं तसा समाजातल्या भ्रष्टाचारी लब्धप्रतिष्ठितानी 'अतिरेकी दल' असा त्याविरुद्ध अपप्रचार सुरू केला. महाविद्यालयाकडून कॉलेजमधल्या ११ तथाकथित 'अतिरेक्या' ची यादी पोलिसाकडे पाठवण्यात आली या अकरा जणातले बहुतेक जण स्टुडंट्स युनियनचे पदाधिकारी होते. मेसमधील अनागोंदी, होस्टेल–रूमची पडझड वगैरेसंबंधी त्यांच्या तक्रारी होत्या. त्यासाठी त्यांना असा त्रास देण्यात आला. त्यांच्यामध्ये एक हाउस सर्जन होता. त्याला अटक करून चार दिवसपर्यंत डाबून ठेवण्यात आलं आणि नंतर २००० रुपये जामिनावर सोण्यात आलं त्याच्या अटकेचं कोणतंही कारण पोलिसांनी दिलं नाही. सर्कल इन्पेक्टरनं या संबंधात खाजगीत खुलासा केला की वरून दबाव आला होता.

प्रथम क्रमाकाचा भ्रष्टाचारी डॉक्टर


**साप्ताहिक माणूस**

वर्ष : एकविसावे

अंक : सतरावा

२६ सप्टेंबर १९८१

किंमत : एक रुपया

संपादक

श्री. ग. माजगावकर

सहाय्यक

दिलीप माजगावकर

सौ. निर्मला पुरंदरे

वार्षिक वर्गणी :

चाळीस रुपये



प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.



राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे, येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

**साप्ताहिक माणूस**

१०२५ सदाशिव, पुणे ३०. दूरध्वनी : ४४३४५९

जॉर्ज आपल्यालाच गुर्मीत होता हुं. ही नक्षलवादी मंडळी नुसतीच क्रांतीच्या गप्पा मारणारी असंतुष्ट जात. याना काय घाबरायचं ? आणि तशीच वेळ आली तर आपल्यापाशी पिस्तुल आहेच आणि आपलं सैनिकी शिक्षणही झालेलं आहे. अशा भावनेत वावरत होता आणि एक दिवस सकाळी हॉस्पिटलच्या आवारात हा आपल्या गाडीतून उतरला. लगेच कार्यकर्त्यांच्या घोळक्याने त्याला घेरले आणि हॉस्पिटलसमोरच्या चव्हाटयावर चलण्याची विनंती केली. नकार देणे त्याच्या मनात असले तरी शक्य नव्हते. डॉक्टर महाशयांनी जवळच्या पोलीस चौकीकडे आशाळभूतपणे पाहिलं; पण त्याच्या लक्षात आलं की, चौकीवरचे मूठभर शिपाई शेदोनशेच्या जमावापुढे काय करणार होते ? चव्हाटयावर मध्यभागी दोन खोकी मांडली होती. त्यावर डॉक्टरला आरोपी म्हणून उभे करण्यात आले हा हा म्हणता मोठा प्रेक्षकवर्ग जमा झाला आणि जनता कोर्टाच्या कामकाजाला सुरुवात झाली. या कोर्टात पैसे देऊन आणलेला न्यायाधीश नव्हता की शाब्दिक कसरती करून आरोपीला सोडवणारा वकीलही नव्हता. वेदीच्या एका कार्यकर्त्यानेच कोर्ट सुरू झाल्याची घोषणा केली आणि आरोपपत्र वाचण्यास आरंभ केला. प्रेक्षकांनी शेलक्या शिव्या हाणून आणि उपरोधिक आवाज काढून प्रत्येक आरोपाचे समर्थन केले. आरोपपत्राच्या वाचनानंतर शिरस्त्याप्रमाणे डॉक्टरला बचावाची संधी देण्यात आली. पण डॉक्टरमहाशय नुसतेच पुटपुटले, 'तुमचा गैरसमज झाला आहे.'

आरोप सिद्ध झाला आहे. हाच जनतेचा निकाल होता. चपलांचा हार घालून आणि 'मी गुन्हेगार आहे. मी लोकाचे अपराध केले. मला क्षमा करा' असे लिहिलेला एक फलक हातात देवून डॉक्टरची हॉस्पिटलभोवती धिंड काढण्यात आली. तोपावेतो पोलिसांची तुकडी येवून थडकली आणि पोलिसांनी नेहमीचे हिंसेचे काम केले. लाठीमार आणि ४३ जणाना अटक होवून कार्यक्रमाची सांगता झाली.

प्रकरण सर्व देशभर गाजलं. केरळ विधानसभेतील लब्धप्रतिष्ठितांचे प्रतिनिधी विरोधी नेते करुणाकरन यानी 'अतिरेक्यानी राज्यभर उसळवलेला हिंसेचा डोंब' अशी बोंब ठोकली. केरळ राज्य जळत आहे आणि डावी लोकशाही आघाडी फिडल वाजवते आहे असा तोंडाळ आरोप करण्यात आला. सरकारने वेदीच्या कार्यकर्त्यांना राजद्रोहाच्या आरोपाखाली तुरुंगात डांबले. तरीपण प्रस्थापित कायदा स्वाहाकारी लाचलुचपतीविरुद्ध असमर्थ ठरला ही गोष्ट जगजाहीर झालीच. सरकार आणि लब्धप्रतिष्ठित काहीही म्हणोत जनतेने जनता कोर्ट उचलून धरले. पत्रकार, वकील, इतकेच काय राजकारणातल्या मंडळीनीसुद्धा मान्य केले की, वेदीने केलेली कृती अभूतपूर्व आणि परिणामकारक अशीच होती. भारताच्या सरन्यायाधीशांनी स्पष्ट म्हटले आहे की जोपर्यंत वरचे वर्ग न्यायालयाचा उपयोग गरिबाना वैद्यकी सेवा वगैरेपासून वंचित करण्यासाठी करतील तोपर्यंत गरीब जनता जनता कोर्टाचाच अवलंब करणार.

¤

'एक तिमजली प्रशस्त हवेली. प्रवेशद्वाराशी फलक 'डॉ. त्यागराजन, सर्जन, असिस्टंट प्रोफेसर, कालिकत मेडिकल कॉलेज' हे 'त्या' चवदा भ्रष्ट डॉक्टरांमधले. मुलाखतीच्या आरंभालाच डॉक्टर बचावाची फैर झाडून मोकळे होतात– 'मी म्हणतो, आम्ही डॉक्टरांनीच काय पाप केले आहे ? भ्रष्टाचार सगळीकडे आहे. तुम्हाला हॉस्पिटलमधली कामाची पद्धत माहीत नाही. तुम्ही फक्त सर्जन, स्त्रीरोगतज्ज्ञ, गुंगीतज्ज्ञ, हाडवैद्य आणि क्ष–किरणवाल्यांनाच का धरता ? बाकीच्यांना का नाही ? हे बघा मी पक्का सनातनी वृत्तीचा माणूस आहे. इथल्या २० वर्षांच्या माझ्या नोकरीमध्ये मी एकदाही पैसा मागितला नाही. पण जर कोणी रुग्ण आला आणि त्यानं पैसे दिले तर नाही म्हणत नाही कारण तो मला कृतज्ञतेच्या भावनेतून देत असतो. ही लाच नव्हे. भ्रष्टाचार केव्हा होईल ? मी पैसे मागितले तर. जर पैसे न मागता मिळाले तर... भ्रष्टाचाराची माझी व्याख्या वेगळी आहे. तुम्हाला पटते का ? नुसती गाडी आणि मोठा बंगला असलेल्या कोणालाही लाचखाऊ म्हणता येणार नाही. माझ्या पगारात मला या गोष्टी परवडणार नाहीत. बरोबर आहे. पण 'माझी इथं खाजगी प्रॅक्टिसपण आहे.'

यावेळी तिथं उपस्थित असलेला डॉक्टरमजकूरांचा मित्र (हाही डॉक्टर) अस्वस्थ होवून म्हणाला, 'तुम्ही असं बघा, या सगळ्या फालतूगिरीमागे आहे कोण ? या या वेदीला सगळी माहिती कुठून मिळते ? मी सांगतो, जी असंतुष्ट तत्वे आहेत. ज्यांचं कुठच काही जमलं नाही, जे बारा बारा वर्षं नापास होत राहतात ते याच्यात आहेत. हे सगळे विद्यार्थी पक्के दारुडे किंवा गुंगीचे व्यसनी आहेत. त्याना काम करायला नको, उलट आम्हाला बदनाम करायला हवं.'

मुलाखतीच्या शेवटी डॉ. त्यागराजन भावपूर्ण आवाजात संदेश देतात– 'आमच्यावर झालेल्या घोर अन्यायाबाबतचं सत्य सर्व भारतभर जावून सांगा.' मी बाहेर येतो. दरवाजा बंद होता... आणि दारामागून दोघांचा हसण्याचा आवाज स्पष्ट ऐकू येतो.

—रवींद्र वाघ


सामाजिक चळवळीच्या इतिहासाविषयी आस्था असणाऱ्या सर्वांना हे पुस्तक वाचावंसं वाटल्याशिवाय राहणार नाही. –डॉ. य. दि. फडके

**महाडचा मुक्तिसंग्राम**

लेखक : प्रा. रा. म. बिवलकर / प्रा. झुंबरलाल कांबळे

मूल्य : वीस रुपये. राजहंस प्रकाशन, पुणे ३०.

## मुंबई वार्ता

# हरुन-अल-रशिद जनाब अंतुलेंचं ' अग्निदिव्य '

सध्या भारताचं संक्रमण अरबी ग्रहदशेतून होतं आहे. मुंबईत तर अरबी अस्तित्वाच्या आणि प्रभावाच्या खुणा ठिकठिकाणी बघायला मिळतात. दक्षिण मुंबईतल्या आलिशान हॉटेल्समधून विखुरलेले, रस्त्यारस्त्यावरून आपले घोळदार पांढरे झगे सावरत चाललेले आणि फुटपाथवरच्या विक्रेत्यांकडून ' जेन्युइन इंडियन ट्रॅडिशन ' इत्यादि सांगणाऱ्या फुटकळ कलावस्तू खरीदणारे अरबी प्रवासी हे सारं इथलं नित्याचंच दृश्य आहे; त्याखेरीज हैद्राबाद, मिरज, सांगली भागात होणारी मुलींची विक्री-खरेदी हे तर सर्वज्ञातच आहे. मीनाक्षीपुरमला झालेल्या धर्मांतरामागेही अरबी पैसा उभा असल्याचं बोललं जातं. केरळसारख्या राज्यामध्ये अरबी पैशाची भरपूर आयात झालेली आहे; पण आता चक्क अरबी वाङ्मयाचाही प्रभाव इथे दिसायला लागला आहे. महाराष्ट्राच्या मंत्रिमंडळाला तर अरेबियन नाइटस्मधल्या कथांचे रोज निरनिराळे राजकीय अवतार सादर करण्याचं कंत्राटच मिळालं आहे आणि त्यांच्या पराक्रमाच्या, धाडसाच्या सुरस आणि चमत्कारिक कथांनी उभा भारतवर्ष कसा थक्क होऊन गेला आहे ! याचे म्होरके अर्थातच हरुन-अल-रशिद जनाब बॅरिस्टर अंतुले ! ते आणि त्यांचे मंत्रिगण इंडियन एअर लाइन्सच्या उडत्या गालीचावरून मुंबई-दिल्ली फेऱ्या करतच असतात. गेटक्रॅशिंग करून जनाब-ए-अंतुल्यांची भेट घेण्याचा प्रयत्न केला, तेव्हा साहेब दिल्लीवारीला गेले होते, त्यामुळे भेट झाली नाही; पण तिथे जमलेल्यांकडून आणि एकूणच लोकांकडून ज्या अंतुले-कथा ऐकायला मिळाल्या त्याही तितक्याच सुरस आणि चमत्कारिक आहेत.

तिथेच भेटलेला, कोकणातून आलेला एक म्हातारा कळवळून विनवणी करत होता. त्याच्या जमिनीचा कब्जा कोर्टात गेली अनेक वर्षे चालला होता. तारखांमागून तारखा पडूनही कोर्टाचा निर्णयच होत नव्हता; पण तोपर्यंत दोन वेळेला जेवण मिळण्याचीही भ्रांत झाली होती. तरीही आपल्याला न्याय मिळेल, अशा मोठ्या आशेने तो अंतुलेसाहेबांची भेट घ्यायला आलेला होता. मी त्याला सांगूनही बघितलं की, हे तर कोर्टाचं काम आहे, अंतुले त्यात काय करू शकणार ? या प्रश्नावर ' वो हमको कुछ समजता नही, अंतुलेसाब तो कुछ भी कर सकते है ! ' अशी त्यानंच माझ्या ज्ञानात ठणकावून भर घातली !

...' बघा म्हणजे सीमा-प्रश्नाचा गोंधळ आहे तो तसाच आहे. आम्हाला वाटलं, अंतुलेसाहेबांना इंदिरा गांधींकडे काही तरी वशिला लागेल आणि आता तरी आमचं काम होईल ! '– एक सीमा-प्रश्नग्रस्त.

' म्हणजे त्या उपोषणाच्या समाप्तीबद्दल तुम्ही म्हणताय का ? – मी विचारलं.

' च्, उपोषणाचं सोडा हो... '

' अहो, ते तर सोडलं की कधीच ! ' –मी.

' च्, ते नाही हो, पण अंतुलेसाहेब बाईंच्या एवढे मर्जीतले असूनही प्रश्न तसाच राहिला की ! कसची मर्जी आणि कसलं काय ! '

बॅ. अंतुल्यांची कारकीर्द सुरू होऊन वर्ष–सव्वा वर्ष लोटलं. आतापर्यंत चार–पाचशे घोषणा झाल्या असतील. महाराष्ट्रातील प्रत्येक जाती–जमातीसाठी प्रत्येक अल्प किंवा बहुसंख्यांकांसाठी राखीव घोषणा ठेवण्यात आल्या होत्या. त्यामुळे त्यांच्या राजीनाम्याविषयी प्रतिक्रिया विचारताच एकानं मला यातल्या बऱ्याचशा घोषणा आठवून सांगितल्या आणि प्रत्येक घोषणेमागे, लोकांना फसवण्याबद्दल एक राजीनामा मागितला ! पण सगळ्यात जिव्हारी लागणारी घोषणा कोकण विद्यापीठाची असावी. कारण मला भेटलेल्या तीन–चार कोकणवासियांनी कोकण विद्यापीठ आता होईल की नाही, अंतुल्यांच्या घोषणेचं सरकारीकरण होऊन खरोखरच विद्यापीठ होणार की नाही, याबद्दल मनस्वी चिंता व्यक्त केली– ' अहो, कधी नव्हे तो कोकणास मुख्यमंत्रीपद मिळाले; पण बघवले नाही ते कोणास ! '

आज–कालचं राजकारण हे कोणत्याही तात्त्विक निष्ठेवर चालण्यापेक्षा व्यक्तिगत नातेसंबंध आणि निष्ठांवरच चालतं. त्यामुळं कोणत्याही सरकारी धोरणामागचं गॉसिपच जास्त महत्त्वाचं ठरतं. आपल्यासारख्या सामान्य माणसाला प्रत्येक वेळेला ही इंगितं कळतातच असं नाही; पण प्रत्येक मराठी माणसाचं राजकीय मत मात्र ठाम असतं ! तसाच ठामपणा अंतुल्यांच्या तथाकथित राजिनाम्याविषयी व्यक्त झाला. कोकण विद्यापीठ असो, नाही तर भवानी तलवार असो.

' — प्रतिभा प्रतिष्ठानाच्या ' (रिकाम्या जागी योग्य तो शब्द भरावा ! ) निमित्तानं अंतुल्यांनी मुळीच राजीनामा देऊ नये, असं मत या सगळ्यांनी व्यक्त केलं आणि इंदिरा गांधी योग्य वेळी, योग्य तो निर्णय देतील– किंबहुना त्या देतील तोच योग्य निर्णय–असंही या मंडळींना वाटत होतं; पण बऱ्याच जणांच्या बोलण्यामध्ये कमालीचा नैराश्यवाद जाणवला. कोणतीही प्रतिक्रिया ठामपणे व्यक्त करायचं सोडून एकजण म्हणाला, ' अहो, जगात सगळीकडे असंच चाललंय. इंग्लंडमध्ये नाही, थॅचरबाईंनी सहा मंत्र्यांना डच्चू दिला. तो काय तात्त्विक मतभेदांमुळे ? आणि पैसे खाण्याचंच म्हणाल तर निक्सन एक सापडला तो सोडा; पण अमेरिकेच्या बाकीच्या तरी कुठल्या राष्ट्राध्यक्षाचे हात फार साफ आहेत ? ' त्या आंतरराष्ट्रीय मतावर मग पुढचं सारं बोलणंच खुटलं.

पण अंतुल्यांच्या या राजीनामा-प्रकरणामुळे गुंडूरावांना गाशा गुंडाळायला आणखी वेळ लागेल, अशी एक कानडी हळहळही व्यक्त करण्यात आली !

अंतुलेसाहेबांच्या सिमेंट-प्रकरणाविषयी बोलताना माझा एक मित्र म्हणाला, ' चार बडे बिल्डर्स सोडले, तर मुंबईतल्या नवश्रीमंतवर्गाचीही डाळ सिमेंटवाचत शिजत नाही, इतकी परिस्थिती बिकट आहे !

आमच्या इमारतीसारखे स्मॉल बिल्डर्स तर चक्क झोपले !' नव्यानं बांधण्यासाठी कंत्राटं घेणारा एक कंत्राटदार तर म्हणाला, 'दुर्दैवानं याच मंदीच्या काळात मी धंदा सुरू केला आहे. आता भले अंतुलेसाहेब देऊ देत राजीनामा, आमच्यासारख्या माणसांचे सिमेंटचे अर्ज खोळंबलेत ते तरी काही वाटेला लावून द्या! अरे, काही तरी समजून घ्या. नंबर दोनचे तरी किती घ्यायचे माणसानं ? तुम्हाला माहीत आहे, मला आज सिमेंट मिळालं तरी ते मुंबईतनं किंवा दादरहून बोरिवलीला आणायला ट्रकवाल्याला, टॅक्सीवाल्याना किती 'वर'चे पैसे द्यावे लागतात आणि पैसे घेऊनही असली रिस्क घेणारे ट्रान्सपोर्टवाले कंत्राटदार शोधणं हेही जिकिरीचं झालं आहे. हा घोळ आधी सोडवा आणि मग काय हवं तर शंभर वर्षं राज्य करा !' ही इतकी बोलकी प्रतिक्रिया आहे की, त्याला मुहतोड जबाब प्रत्यक्ष दिल्लीदरबारीही मिळणार नाही !

'मी तुम्हाला सांगतो, राजीनामा हादेखील स्टंटच आहे. आधी राजीनामा द्या, मग मी तो मंजूर करणार नाही, असं अंतुले आणि इंदिरा गांधीचं ठरलेलंच असेल. एकदा इंदिरा गांधीनी 'नाही' म्हटलं की वर तोंड करून कोण बोलणार आहे ? तेव्हा याचा हा खेळ चालूच आहे, तू मारल्यासारखं कर, मी रडल्यासारखं करतो !' अशीही एक प्रतिक्रिया

**प्रतिभा कुणाची, प्रतिष्ठान कुणासाठी ?**

या आणखीही काही प्रतिक्रिया पहा—प्रतिभा—प्रतिष्ठानासाठी देणग्या गोळा केल्या त्यावद्दलच्या या प्रतिक्रिया—

'कमीत कमी पावत्या तरी दिल्या अंतुल्यानी. याआधीचे कोणी तर तेवढेही देत नव्हते. पावत्या घेऊन वर राजीनामा मागणं हा अंतुल्यांवर अन्याय आहे. त्यांच्या सरळपणाची आणि प्रामाणिकपणाची अगदी काहीच बूज करायची नाही म्हणजे काय ? आता प्रतिष्ठान हे इंदिरा प्रतिष्ठान असो, की आणखी काही नावानं असो, देणाऱ्याला पैसा तर तिकाच द्यावा लागणार ना ! पण पावतीमुळं त्या पैशाचा, आज नाही उद्या, कधी तरी जाब विचारायचं धाडस तरी झालं असतं कोणाला.'

या गृहस्थांचे हे विचार फार सारवासारवी करणारे आहेत, असं तुम्हाला वाटत असेल, तर ज्या दिवशी हे प्रकरण उघडकीला आलं, त्या दिवशीचा 'टाइम्स ऑफ इंडिया'चा अंक काढून बघा. त्याच्या अग्रलेखात बरोबर याच प्रकारची सारवासारव केलेली तुम्हाला दिसेल.

त्याच्यावरोबर उलटी प्रतिक्रियाही पुष्कळजणाकडून ऐकायला मिळाली— 'अहो, कसली आली आहे पावती ? हा तर निव्वळ साळसूदपणा झाला. इतके दिवस अशा लांड्या-लबाड्या चालायच्या; पण त्या टेबलाखालून हो ! पण आपल्या लबाडीला प्रतिष्ठानाची प्रतिष्ठा आणि पावत्यांचं शिक्कामोर्तब देण्याचं धारिष्ट्य एकटे अंतुलेच करू जाणोत ! हे म्हणजे आधी सॉरी म्हणून वर धक्का मारण्यासारखंच झालं. पावत्या देऊन काही काळयाचं पांढरं व्हायचं नाही आणि चोरी केली, अशी कबुली देऊन फार तर चोरी माफ होईल; पण चोराचा काही त्यामुळे साव ठरायचा नाही. तेव्हा राजीनामा दिला तर कौतुक कसलं त्यात ? राजीनामा द्यायलाच पाहिजे !'

या झाल्या सर्वसामान्य माणसांच्या प्रतिक्रिया. प्रत्येक जण पोटतिडिकीनं आपल्या बाजूचं समर्थन करत होता. मला एकदम आपणा सर्वसामान्यांची कीव आली. कुठे दिल्लीश्वर, कुठे सत्ताधारी आणि कुठे आपण ! वर्तमानपत्रं हा आपल्यातला एकमेव दुवा. शासक आणि शासितांमध्ये बाकी काहीच दळणवळण नाही. संबंध आहे तोही केवळ एकतर्फी. शासकाचा शासितावर प्रभाव आहे, शासिताचा प्रभाव मात्र जवळजवळ नगण्य. आपण किती काही बोललो, तरी जे व्हायचं आहे ते होणारच ! पण इंदिरा गांधीनी महाराष्ट्रातली मराठेशाही हटवण्यासाठी म्हणून अंतुल्याना सत्ता दिली काय आणि सव्वा वर्षाच्या कालावधीत भ्रष्टाचारानं हात बरबटून अंतुल्यावर राजीनाम्याची पाळी येते काय, सारच घृणास्पद वाटणारं !

मात्र इच्छा आहे ती एकच. हा राजीनामा हीच एक फसवणूक ठरू नये. अंतुल्याच्या भगतगणानं म्हटल्याप्रमाणे हे अग्निदिव्य अगदीच शाब्दिक राहू नये. सत्तेचं पावित्र्य आणि साधनशुचिता या इतक्या थट्टेच्या गोष्टी होऊ नयेत. या गोष्टीचं परिमार्जन म्हणून तरी राजिनाम्याचा स्वीकार व्हायलाच हवा !

—ललिता बर्वे

---

# पोलंड

## सॉलिडॅरिटीचे आव्हान

वा. दा. रानडे

'लोकशाहीमार्गाने संघटित झालेल्या स्वयंशासित समाजात दारिद्र्य, पिळवणूक, भीती आणि खोटेपणा यांच्यापासून मुक्त असे जीवन आम्हाला हवे आहे, अशी घोषणा पोलंडमधील सॉलिडॅरिटी या स्वतंत्र कामगार संघटनेच्या पहिल्या राष्ट्रीय काँग्रेसमध्ये संमत झालेल्या निवेदनात केली आहे. सॉलिडॅरिटी ही केवळ कामगार संघटना राहिलेली नसून पोलंडमध्ये नवी क्रांती घडवून आणणारी शक्ती त्यातून निर्माण होत आहे. काँग्रेसने घेतलेल्या या लढाऊ निर्णयामुळे रशिया व पूर्वयुरोपच्या राष्ट्रांना तर हादरा बसलाच; पण पाश्चात्य राष्ट्रांनाही चिंता वाटते. सॉलिडॅरिटीने फार लढाऊ पवित्रा घेतल्याने रशियाच्या लष्करी हस्तक्षेपाचा संभव वाढला आहे असे त्यांना वाटते तर सॉलिडॅरिटीच्या हालचालीना वेळीच पायबंद घातला नाही तर पोलंड आपल्या हातचा जाईल; एवढेच नव्हे तर पूर्वयुरोपात त्याची लाट पसरेल असे रशियाला वाटते. रशियाने लष्करी हस्तक्षेप केला तर सॉलिडॅरिटीचे बंड तर मोडले जाईलच; पण तिने आतापर्यंत जे कमावले तेही गमवावे लागेल. तेव्हा सॉलिडॅरिटीने थोडे सबुरीने घ्यावे असे त्या

चळवळीबद्दल सहानुभूती असलेल्या काही लोकशाहीवाद्यांना वाटते, तर सॉलिडॅरिटी-मधलाच कट्टर गट त्याला असं उत्तर देतो की, १९१७ च्या रशियन क्रांतीपूर्वी रशियात जशी परिस्थिती होती तशी आज पोलंडमध्ये आहे. तेथे सरकार आज नाममात्र अस्तित्वात असून सारा देश सॉलिडॅरिटीच्याच मागे आहे. पोलंडमधील परिस्थितीच्या या निरनिराळ्या मूल्यमापनांपैकी कोणाचे बरोबर, कोणाचे चूक याचे चित्र आणखी काही आठवड्यांतच स्पष्ट होईल; पण घटना आता निर्णायक टप्प्यास आल्या आहेत हे निश्चित!

सॉलिडॅरिटीने असे निर्णय तरी कोणते घेतले? सर्वात महत्त्वाचा निर्णय म्हणजे सॉलिडॅरिटीसारख्याच स्वतंत्र कामगार संघटना पूर्वयुरोपातील देशांत काढण्यास सॉलिडॅरिटी उत्तेजन देईल. रशियात पूर्वयुरोपातील कम्युनिस्ट देशांच्या अंतर्गत कारभारात हा हस्तक्षेप आहे अशी टीका रशियाने केली एवढेच नव्हे तर कामगारांचे मेळावे भरून सॉलिडॅरिटीचा निषेध करण्यात आला. सॉलिडॅरिटीची ही भूमिका रशियाविरोधी व कम्युनिस्टविरोधी आहे. तिच्या नेत्यांना भांडवलशाही पुन्हा आणावयाची आहे अशीही टीका करण्यात आली. मॉस्कोतील झिल या मोटारकारखान्यातील सत्तर हजार कामगारांच्या वतीने पोलंडच्या कामगारांना एक पत्र पाठविण्यात आले ते रशियातील वृत्तपत्रातून प्रसिद्ध झाले.

दुसरा महत्त्वाचा निर्णय म्हणजे कारखान्याचे व्यवस्थापन खऱ्या अर्थाने कामगारांकडे आले पाहिजे अशी मागणी सॉलिडॅरिटीने केली. सरकारने यासंबंधी तयार केलेले बिल सॉलिडॅरिटीला मान्य नाही. त्यात तिने बदल सुचविले आहेत. या प्रश्नावर सार्वमत घ्यावे असा ठराव काँग्रेसने केला. ही मागणी मान्य झाली नाही तर आम्ही पार्लमेंटवर बहिष्कार घालू असा इशारा सॉलिडॅरिटीच्या नेत्यांनी दिला आहे. सध्याची पार्लमेंट प्रातिनिधिक नाही. लोकशाही पद्धतीने ती निवडली गेलेली नाही. ही पार्लमेंट आम्ही विसर्जित करून नव्या निवडणुकांची मागणी करू असेही सॉलिडॅरिटीचे नेते म्हणत आहेत. सध्याच्या पार्लमेंटमध्ये फक्त सरकारतर्फे बिले मांडली जातात. सॉलिडॅरिटीच्या सभासदांनाही बिले मांडण्याचा अधिकार मिळाला पाहिजे अशीही मागणी करण्यात आली. निवडणुका लोकशाही पद्धतीने झाल्या पाहिजेत. त्यात कम्युनिस्ट पक्षाच्या उमेदवाराशिवाय इतरांनाही आपले उमेदवार उभे करण्याची मोकळीक असली पाहिजे ही सॉलिडॅरिटीची मागणी जुनीच आहे; तिचा पुनरुच्चार करण्यात आला.

रेडिओ, टी. व्ही., वृत्तपत्रे ही प्रसारमाध्यमे सध्या सरकारच्या व कम्युनिस्ट पक्षाच्याच नियंत्रणाखाली आहेत. या माध्यमांमध्ये सॉलिडॅरिटीलाही स्थान मिळाले पाहिजे. तिची भूमिका मांडली गेली पाहिजे अशी मागणीही सॉलिडॅरिटी सुरुवातीपासून करीत आहे. ती अजून मान्य झालेली नाही. काँग्रेसमध्ये तिचा पुनरुच्चार करण्यात आला. मागणी मान्य झाली नाही तर आम्ही स्वतःचे प्रक्षेपणकेंद्र उभारू असेही सॉलिडॅरिटीच्या एका नेत्याने सांगितले.

सॉलिडॅरिटीच्या भूमिकाविषयक निवेदनात कम्युनिस्ट पक्षाचे 'प्रभुत्वाचे स्थान' (डॉमिनेटिंग रोल) मान्य करण्यात आले आहे. त्यात बदल करून हे वाक्य वगळण्यात यावे अशी मागणी एका प्रतिनिधीने केली.तो म्हणाला, 'कम्युनिस्ट पक्षाच्या बहुतेक तत्त्वांशी संघर्षाची भूमिका आपण घेतलेली असता त्याचे प्रभुत्वाचे स्थान मान्य करणे हे विसंगत आहे'; पण अखेर ही सूचना चर्चेलासुद्धा घेऊ नये असा निर्णय काँग्रेसने घेतला. तात्त्विकदृष्ट्या त्याचा मुद्दा बरोबर होता. सॉलिडॅरिटीने या बाबतीतच सौम्य भूमिका का घेतली याचा उलगडा काँग्रेसचे जे सविस्तर वृत्तांत परदेशी पत्रांतून आले आहेत त्यावरून होत नाही.

राष्ट्रीय सरकार बनविण्याच्या कुवतीचे नेते आमच्याजवळ आहेत असे मरियन जुर्झिक या सॉलिडॅरिटीच्या एका विभागप्रमुखाने सांगितले. आपण सरकार बनवू व ते समर्थपणे चालवून दाखवू हा विश्वासच त्यातून व्यक्त होतो. पोलंडमधील मुख्य पेचप्रसंग केवळ राजकीय नसून आर्थिक आहे. तो सोडविण्यासाठी सॉलिडॅरिटीजवळ कोणता कार्यक्रम आहे? काँग्रेसच्या सहा दिवसांच्या बैठकीत त्यावर चर्चा झालीच नाही.त्यासाठी दुसरी बैठक काही दिवसांनी होणार आहे. आर्थिक पेचप्रसंगाची कल्पना देणारे काही आकडे सरकारने प्रसिद्ध केले आहेत. कोळसा उत्पादनात एका वर्षात २२·७ टक्के घट झाली आहे ती तशी चालूच राहिली तर सबंध अर्थव्यवस्थाच ढासळेल. खाणीत काम करण्यासाठी दहा हजार सैनिकांना सरकारने पाठविले आहे. जस्त, अॅल्युमिनिअम आणि शिसे यांच्या उत्पादनात या वर्षाच्या पहिल्या आठ महिन्यांत गेल्या वर्षाच्या पहिल्या आठ महिन्यांच्या तुलनेने २० टक्के घट झाली. तेलशुद्धीकरण कारखान्यांच्या उत्पादनात १७.६ टक्के आणि तांब्याच्या उत्पादनात १२ टक्के घट झाली. कारखान्यांची व्यवस्था खऱ्या अर्थाने कामगारांकडे सोपवा, आम्ही आर्थिक स्थिती सुधारून दाखवितो असे आव्हान सरकारला देण्यात सॉलिडॅरिटीची खरी कसोटी लागणार आहे.

सॉलिडॅरिटीला तसा आत्मविश्वास वाटतो हे त्या संघटनेच्या कामगारानी रशियन कामगाराना पाठविलेल्या पत्रावरून दिसते. स्वतंत्र कामगार संघटना पूर्वयुरोपातील देशातही स्थापन व्हाव्यात या ठरावाचा निषेध रशियन कामगारांनी आपल्या पत्रात केला होता. त्याला उत्तर वॉर्सा येथील विमानकारखान्यातल्या सॉलिडॅरिटीच्या सभासदांनी पाठविले. त्यात म्हटले आहे, 'सोव्हिएट कामगारांनी पोलंडला यावे आणि स्वतंत्र कामगार संघटनेमुळे प्रश्न सोडविण्यास कशी मदत होते हे स्वतःच पहावे. आपण बोलू, चर्चा करू, एकमेकांच्या भूमिका विशद करू.' यातील भूमिका स्वागतार्ह आहे; पण रशियाची भूमिका लक्षात घेऊन तेथील कामगार हे नियंत्रण स्वीकारणार नाहीत हे उघड आहे; पण सॉलिडॅरिटीच्या चळवळीवर प्रतिगामी,प्रतिक्रांतिकारक असे छाप मारण्याची घाई न करता वस्तुनिष्ठ दृष्टिकोनातून या प्रयोगाकडे पाहिले पाहिजे. त्याला संधी दिली पाहिजे. पाश्चात्य राष्ट्रांनीही या बाबतीत अलिप्तपणाची भूमिका घेणे चांगले. सॉलिडॅरिटीला त्यांनी पाठिंबा दिला तर ती संघटना भांडवलदारांचीच पाठिराखी आहे असा ग्रह तिच्याबद्दल निर्माण करणे कम्युनिस्टांना सोपे जाते. कम्युनिस्ट राष्ट्रे व भांडवलदारी राष्ट्रे यांनी अलिप्त राहून पोलंडचा प्रश्न तेथील जनतेलाच सोडवू द्यावा. □

## उत्तरमीमांसा : २४

स. शि. भावे

# आपण किती अस्वच्छता सोसू शकतो?

काही वर्षांपूर्वीची गोष्ट.

पुण्याहून मुंबईला निघालो होतो. सिकंदराबाद एक्सप्रेसच्या पहिल्या वर्गात बसलो होतो. गाडी पुणेस्टेशनात उभी होती. सुटायला पंधरा–वीस मिनिटे अवकाश होता.

माझ्या समोरच्याच बाकावर एक गृहस्थ बसले होते. सुखवस्तू आणि भले दिसत होते. डब्यात शिरून बसलो तेव्हा त्यांना पाहिल्यावर वाटले होते की, प्रवासात यांची चांगली सोबत होईल. पण योग वेगळा होता.

प्रथम पाहिले तेव्हा गृहस्थ शांतपणे, गप्प बसून होते. नंतर त्यांनी शांतपणाने खिडकीबाहेर फलाटावर पिंक टाकली. तेव्हा लक्षात आले की त्यांचा गप्पपणा तंबाखूमुळे होता.

गृहस्थाची पहिली पिचकारी फलाटावर चांगली तीन-चार फूट दूर गेली. एक लालभडक रेघ उमटली. मासिकांच्या फिरत्या गाडीवरच ती पडायची. पण अर्ध्या इंचाने गाडी बचावली. पाठोपाठ दुसरी पिंक आली. ती फूट–दीड फूट प्लॅटफॉर्मवर पडली आणि थोडीशी खिडकीखालच्या डब्याच्या पत्र्यावर बाहेरून ओघळली. नंतरचा हप्ता आला न गिळलेल्या तंबाखूच्या लगद्याच्या गोळीचा. जिभेने घोळून घोळून ती गोळी तोंडात तयार होताना विश्वरूपदर्शन होत होते. ती गोळी त्यानी खालच्या ओठाच्या टोकावर अलगद आणली आणि आतल्या वाऱ्याच्या जोराने खिडकीतून लांबवर भिरकावली. गाडीकडे येणारा, स्वच्छ कपडे केलेला एक शाळकरी मुलगा मधाच्या गाडीवाल्यासारखाच वाचला. तेव्हा 'कसा नेम साधला' असे अभिमानाचे हसू त्या गृहस्थांच्या चेहऱ्यावर पसरले.

त्यांच्या त्या निवांत आत्माविष्काराने, आजबाजूला होणाऱ्या अतिक्रमणाने मला वीट आला, रागही आला, पण सध्याच्या सभ्यतेत राग आला तरी आपण तो लगेचच व्यक्त करीत नाही. अलिप्तपणाच्या कवच्यात आपण स्वतःला सुरक्षित करतो. तसा मी सुरक्षित झालो. वर्तमानपत्र अशा अनेक वेळा चांगले उपयोगाला येते. ते डोळ्यासमोर धरले. स्वतःपुरता आडोसा तयार केला.

पण त्या आडोशाने माझा बचाव व्हायचा नव्हता.

गृहस्थांनी आता जोरजोराने खाकरे काढायला सुरुवात केली होती. ऑह्–ऑर–ख्याक–ऱ्हांव ऱ्हांव असे त्याचे आवाज, आधी कंपार्टमेंटमध्ये आणि नंतर डब्यातही घुमू लागले. मिनिटभराच्या विकट प्रयत्नानंतर कफाचा सुटा गोळा त्याच्या घशात तयार झाला. कफाचा आतला जोर इतका होता की तो गोळा त्यांच्या 'आ' तून अचानक अलगद बाहेर पडला आणि खिडकीच्या कठड्यावर ओथंबला. त्याचा एक ओघळ खिडकीखाली डब्याच्या आतल्या भागावर ओघळत येऊन अर्ध्यावर थाबून राहिला.

यानंतर दुसरा–तिसरा असे सहा–सात गोळे बाहेर पडले. द्रवकणांचा सूक्ष्म रूपात वर्षाव सर्वभर जाणवला. सर्वांनी आपापली अंगे रुमालांनी कोरडी केली. गृहस्थानी दम टाकला. गाडी सुटलीही.

आता मात्र मला राहवले नाही. द्रवकणांचा मारा मजवरही झाला होता. म्हणून माझा अलिप्तपणा सुटला. मी जरा ताणूनच विचारले.

'अहो, हा फर्स्टक्लासचा डबा आहे. इथे चागले टॉयलेट आहे. पाणीही आहे. तुमचा घसा मोकळा करण्यासाठी तिथं नाही का जायचं ?'

'पण तिथंच जायला पाहिजे का ?' गृहस्थ शात पण उर्मट आवाजात विचारते झाले.

'म्हणजे काय, ज्या गोष्टीसाठी जिथे सोय आहे तिथंच ती करावी.'

'मग तुम्ही करा की. नाही कोण म्हणतो.' आपण मोठा विनोद केला असे समजून गृहस्थ मोकळेपणाने हसले.

'पण तुम्ही टॉयलेट वापरलं नाही त्यामुळे आम्हाला त्रास झाला. त्याचं काय ?' त्यांना केल्या गोष्टीचे काहीच वाटत नव्हते म्हणून मी आता खरा रागावलो होतो.

'काय त्रास झाला आपणाला ? नाही, म्हणजे नक्की काय त्रास झाला ?' गृहस्थांनी कायदेशीरपणे विचारले.

'हे तुमचं कारंजं उडालं ना अंगावर !" त्या गोष्टीचा उल्लेख करण्याचीदेखील मला किळस वाटत होती. ती किळस माझ्या आवाजात चिडीच्या रूपाने आली होती.

"एवढंच होय. मग सॉरी म्हणतो त्याबद्दल." गृहस्थ शांतपणाने म्हणाले. ते पुढे म्हणाले, "प्रवास आहे. अशी एकमेकांची अडचण एकमेकाला होणारच. भांड्याला भांडं लागणारच. एवढं मनावर घेऊ नका!'

'भांड्याला भांडं लागणारच' हे तत्त्वज्ञान मला देखील माहीत होते. गृहस्थांनी ते येथे वापरावे यातली त्यांची चलाखीही मी मानली. माझ्यावर शॉवर झाला या वैयक्तिक मुद्यावरून मी सर्वसाधारण मुद्द्याकडे मोर्चा वळविला. म्हणालो,

'मुद्दा तो नाही. डब्यात टॉयलेटची सोय असताना खिडकीतून पिचकाऱ्या टाकणं, खाकरे टाकणं, त्याचा इतराना त्रास होणं – हे सारं वागणं चुकीचंच आहे. तुम्हाला हे पटवून घ्यायला एवढं का जड जातं आहे ?'

'तुम्हाला एकट्यालाच माझं वागणं चुकीचं वाटत आहे,' गृहस्थ म्हणाले, 'डब्यात पहा सगळी माणसं हेच करत आहेत. त्यांना थांबवा. मी पण थांबतो !'

असे म्हणून शांतपणे त्यांनी सिगरेट पेटवली.

गाडी सुरू झालेली असल्याने आणि ते इंजिनाकडे पाठ करून बसलेले असल्याने, धूर माझ्या तोंडावर येऊ लागला. मधूनच चार-दोन बारीक अग्निकणही येऊ लागले.

मला रागाचा दुसरा झटका येऊ लागला. गृहस्थांनी हवे तसे वागावे आणि आपल्याला काहीच करता येऊ नये, निमूटपणे सहन करावे लागावे, या स्वतःच्या असहायतेचा भाग माझ्या रागात जास्त होता. सभ्यतेने

राग व्यक्त झाला पाहिजे ही माझी आणखी एक असहायता होती. म्हणून मी नियमाचा आधार घेतला. म्हणालो,

'सहप्रवाशांची संमती घेऊनच सिगरेट ओढावी असा नियम आहे. तो इथं लिहिलेलाही आहे.'

'मग द्या की राव संमती' पुन्हा त्यांचे मोकळे, आक्रमक उत्तर.

'माझी नाही संमती. तुमच्या सिगरेटच्या राखेनं माझा शर्ट खराब होतोय.'

'पुन्हा तुमचं तेच. अहो, प्रवासात असं एवढं न्यायचंच. हे बघा. राख माझ्या पॅण्टवर पडली आहे. ती अशी टिचकीनं उडवून लावायची. झाली पॅण्ट स्वच्छ!' पुढे ते आणखीच अधिकाराच्या नि विश्वासाच्या आवाजात म्हणाले, 'तुम्ही पण झकास सिगरेट ओढा. आणि माझ्या अंगावर सोडा धूर. येऊ दे तुमच्या सिगरेटची राख आमच्या अंगावर!' असे म्हणून गृहस्थांनी सिगरेटची पेटी माझ्यापुढे उघडून धरली आणि आमच्या वादात पाठिंबा मिळावा म्हणून आजूबाजूला पाहिले.

मला आश्चर्य वाटले. आजूबाजूच्या लोकांचा पाठिंबा गृहस्थांनाच होता. एकजण पुढे झुकून, माझ्याकडे तिरपे पाहत म्हणाला, 'आणा इकडे, मी देतो तुम्हाला कंपनी.'

अस्वच्छतेला सामूहिक मान्यता आणि प्रतिष्ठा देण्याचा त्या साऱ्यांचा पवित्रा मला असह्य झाला. मी जरा ओरडूनच म्हणालो,

'अहो, या गृहस्थांचा खिडकीतून आत ओघळलेला खाकरा अजूनही ओला आहे याची तुम्हाला किळस कशी येत नाही?'

'अहो, घरी नाही का आपण मुलांची घाण काढत? खिडकीपासून थोडं बाजूला सरून बसायचं.' – एक.

'पण डब्यात संडास–मोरी असताना ही घाण बाहेर का करायची?' माझ्या मूळ प्रश्नाशी मी आलो.

'संडासात काय अन् बाहेर काय, आपलीच घाण ना ती? नाही तरी शरीरात असतेच की ती घाण.'

–दुसरा.

माझा पूर्ण पराभव झाला होता. माझे म्हणणे मला इतके योग्य वाटत होते की, इतरांना ते का पटू नये म्हणून मी व्याकुळ होतो. प्रत्यक्षात मात्र, आमच्या कंपार्टमेंटमधल्या एकालाही ते पटले नव्हते. मी एकटा पडलो होतो. मी गप्प बसलो.

¤

बऱ्याच वर्षांनी हा प्रसंग आठवण्याला आज एक निमित्त घडले आहे. मित्रवर्य प्रा. स. म. परळीकर यांचे एक पत्र 'सकाळ'मध्ये (११–९–८१) आले आहे. पत्रात त्यांनी लिहिले आहे–' कचरा योग्य ठिकाणी नेऊन टाकणे, रस्त्यावर थुकून किंवा त्याहीपेक्षा वाईट मार्गांनी घाण न करणे, वाहनांचे नियम पाळणे इत्यादी बाबतीत आम्ही सर्वांनी मिळून जर दक्षता बाळगली तर दर दिवशी होणारे शेकडो अपघातही होणार नाहीत व 'आपले शहर स्वच्छ ठेवा, अशा पाट्याही जागोजागी लावाव्या लागणार नाहीत; पण त्या दिशेने प्रयत्न कोण करणार?'

या प्रश्नाचे उत्तर प्रा. परळीकरांनी आत्यंतिक निराशेने दिले आहे. ते म्हणतात, 'आमच्या समाजातील सुशिक्षित लोकांकडून चांगल्या गोष्टीची अपेक्षा करणे व्यर्थ आहे. आमच्याकडील सुशिक्षित माणसेसुद्धा, आपण सुसंस्कृत नागरिक म्हणवून घेण्यास योग्य नाही, हे स्वतःच्या वर्तनाने वारंवार सिद्ध करतात. आजवरच्या अनुभवावरून तरी आमचे लोक आदर्श नागरिक बनतील, अशी शक्यता सुतराम् वाटत नाही!'

परळीकरांचे हे निदान मनाला कष्टी करणारे आहे.

खरे तर 'सकाळ'मध्ये व इतरही वृत्तपत्रांत, अस्वच्छतेबाबतच्या तक्रारी पत्रांतून सतत येत असतात. अनेकदा एकाच प्रकारच्या गलिच्छपणाबाबत पुन्हा पुन्हा तक्रारी असतात.

पान खाऊन रस व चोथा वाटेल तिथे, वाटेल तसा थुंकणे ही अशी एक नेहमीची तक्रार असते. अगदी सुशिक्षित प्राचार्यदेखील हे बिनदिक्कत करतात. रसाचे थेंब अथवा चोथ्याचे कण इतरांच्या कपड्यांवर उडाले तरी त्यांना त्याची पर्वा नसते. एस. टी. त पुढच्या सीटवर बसून ही टाकाऊ द्रव्ये बाहेर टाकली तर वाऱ्याने मागच्या सीटवर बसलेल्यांच्या अंगावर त्या द्रव्याचे थेंब किंवा कण नक्की जाणार याची कल्पनाही या थुंकीप्रवीणांना नसते.

खाजगी वाहनातून जाणारे थुंकीप्रवीण या बेजबाबदार वागण्याला अपवाद नसतात. पुढच्या वाहनवाल्याने (सायकल असो, स्कूटर असो की मोटर असो) थुकायचे आणि चाळीस-पन्नास फूट मागून येणाऱ्याला त्याचा प्रसाद मिळायचा, हा प्रकार क्षणोक्षणी चालू असतो.

कधी या प्रकरणी एखादा स्कूटरस्वार समोरच्या सायकलवाल्याचा पाठलाग करीत आहे व वाहने चालवीत दोघांचे भांडण चालू आहे असाही प्रकार दिसतो. हजारपैकी नऊशेनव्याण्णव प्रसंगी तड अशी काहीच लागत नाही. शिवीगाळ होते. बाचाबाची होते. कधी शर्ट पकडणे. बस्स. इथे कोणी तरी मध्यस्थ येतो. भांडण विरघळे जाते. कधी यातूनच अपघात होतो; पण थुकण्याची 'सदा चली आयी रीत' काही सुटत नाही!

ही थुकबाजी सौम्य वाटावी, असा प्रकार ओकारीचा असतो. एस. टी.त किंवा आगगाडीत बहुधा अंगावर येणारा हा प्रकार विलक्षण किळसवाणा असतो. आगगाडीत तर पुढच्या डब्यातून आपल्या अंगावर येणारी वांती ज्या मुखातून निघाली आहे तो मुखचंद्रही बघायला मिळत नाही. एस. टीत लिहिलेले असते की, वांती होऊ लागल्यास कंडक्टरकडून कागदी पिशवी मागून घ्यावी; पण ऐन वेळी कंडक्टरकडे, तक्रारबुकाप्रमाणे, पिशवीच नसते!

बरे, ज्यांना ओकारी होते, त्यांनी तरी काळजी घ्यावी, तर त्यांनी काळजी घेण्याचे नावच नको. वांतीसाठी गोळ्या घेण्याचे स्वास्थ्य आणि तशी ऐपत थोड्यांना असते हे खरे आहे; पण बाकीच्यांनी स्वत:पुरत्या कागदाच्या एक-दोन पिशव्या बाळगायला काय हरकत आहे? पण आपण कोणीच ही दक्षता घेत नाही. निदान वांती होत आहे अशी भावना झाल्यावर चटकन जागा बदलून अगदी मागच्या बाकावर बसावे व मागच्या खिडकीचा उपयोग करावा. (म्हणजे या उपायात मागून येणारांना त्रास आहेच; पण निदान या बसमधले तरी बचावले!) पण अशी जागा बदलणे हे अप्रतिष्ठेचे वाटते. तशी सूचना कोणी केली तर भांडण होते. वाटेल त्या सीटवर बसून ओकण्याचा हक्क बजावण्यासाठी मोठमोठी भांडणे लढविली जातात. अधिक महत्त्वाच्या हक्कांची पायमल्ली किती सहजपणे आपण सहन करतो

आणि अस्वच्छ वागण्याच्या या हक्कासाठी मारामाऱ्यासुद्धा होतात.

ओकून जी घाण झालेली असते ती साफ करण्याची जबाबदारी कुणाचीच नसते. ओकणाऱ्याच्या दृष्टीने ती एसटीची जबाबदारी असते. एसटीच्या चालक– वाहकांच्या ड्यूटीत हे काम नसते. बसस्टेशनवरच्या सफाई–कामगाराने ही सफाई करावी अशी त्यांची 'करेक्ट' भूमिका असते. सफाई-कामगार नसला तर ? तर मग त्या मधल्याच ठिकाणी त्या बसमधे चढलेल्या प्रवाशाला त्या सीटवर बसायचे तर ओंगळ प्रवाद, आंबुस वास यांचा सहवास पत्करावा लागतो किंवा बाहेरून माती वगैरे आणून स्वतःला सफाई उरकावी लागते. या बिचाऱ्या प्रवाशाने नंतर जर का आपला रास्त संताप वृत्तपत्रात पत्र लिहून व्यक्त केलाच, तर 'नको इतक्या बारकाईने पाहणारा गलिच्छता–समीक्षक' असा त्याचा प्रच्छन्न उपहासदेखील सोपेपणाने करता येतो.

थुंकणे आणि ओकणे. गलिच्छतेचे केवळ दोन प्रकार; त्यांचाच एवढा तपशील झाला. हा तपशील वाचूनही अनेकजण नाकाला रुमाल लावतील. दिलगिरी व्यक्त करून त्यांना एवढेच सांगायचे आहे, की त्यांना त्रास व्हावा या उद्देशाने हा तपशील दिलेला नाही, तर जाचाचे क्षेत्र कोठपर्यंत विस्तारते हे स्पष्ट व्हावे म्हणून दिला आहे. आपणांपैकी बहुतेकांना याचा अनुभव आला असेलच. हा तपशील वाचून, वाचताना जर इतके घाण वाटते, तर प्रत्यक्षात किती आणि कसे घाण वाटते या तीव्रतेचा अनुभव येईल.

या दोन प्रकारांप्रमाणे इतर शेकडो प्रकारांनी अस्वच्छ जाणि गलिच्छ घटनांचा विळखा आपल्या भोवती आज पडलेला आहे. आणखी उदाहरणे येथे दिली नाहीत तरी चालतील.

माझ्या मनातला अजूनही न सुटलेला प्रश्न असा आहे. गलिच्छतेचा हा विळखा सोडवायचा कसा ?

दारिद्र्य, अज्ञान, मागासलेपणा या कारणांनी ही अस्वच्छता आली आहे आणि जोवर समृद्धी, ज्ञान, पुरोगामी वृत्ती यांचा लाभ सर्व समाजाला होत नाही, तोवर अस्वच्छता पुरतेपणी दूर होणार नाही–ही सामाजिक मीमांसा खरी आहे. कोणाही विचार करणाऱ्याला ती मान्य होईल. उत्तुंग गगनचुंबी इमारती उभ्या राहाव्या, नंतर या इमारतीचा योगक्षेम व्यवस्थित चालावा म्हणून भोवताली झोपडपट्टी तयार होणारच. विषमतेच्या अवस्थेत एकाने परीटघडी स्वच्छ असायचे तर इतर अनेकांना मळके राहावे लागणारच, हे उत्तर आता सर्वांना माहीत झाले आहे–आणि पटलेही आहे.

पण मला वाटते, हे उत्तर पुरेसे नाही. एसटीचे तळ महाराष्ट्रात सगळीकडे आहेत. मग देशावरच्या तळापेक्षा कोकणातले तळ (आणि तळांवरील 'स्वच्छतागृहे' देखील) अधिक स्वच्छ असतात, ते का ? माणसांची मने आणि मनुष्यगटांची मने कशी चालतात याचाही या प्रश्नाच्या उलगड्यात भाग असला पाहिजे.

जी मने अगतिकतेने गलिच्छ असतात, ती जरा ओशाळी असतात. कधी एकदा गलिच्छता दूर करतो असे या मनांना झालेले असते. प्राप्त परिस्थितीत, शक्य तेवढी स्वच्छता राखण्याचा प्रयत्न अशी मने करीत असतात. आपल्या स्वच्छतेचे आक्रमण (की अतिक्रमण ? ) इतरांवर होत नाही ना, अशी काळजी घेत असतात.

काही वर्षांपूर्वीच्या माझ्या अनुभवातले गृहस्थ आणि त्यांच्यासारखे किती तरी, यांच्या मनात असा ओशाळेपणा नसतो. स्वतःचा अस्वच्छपणा हा त्यांना आपला हक्क वाटत असतो. इतरांवर त्यांच्या अस्वच्छतेचे जे आक्रमण होत असते त्या आक्रमणात त्यांना वेगळाच (कलात्मक !) आनंद मिळत असतो. स्वच्छ माणसांवरील प्रभुत्वाचा (superiority) आनंद मिळत असतो. प्रा. परळीकर जे निराश झाले आहेत ते या मनाच्या बाबतीत, असे वाटते.

स्वच्छ लोकांनी या आक्रमणाचा मुकाबला कसा करावा ? किंवा ही आक्रमक वृत्ती या लोकांच्या मनातून कशी दूर करावी ? हा वेगळ्या मीमांसेचा विषय आहे. □

## वर्गणीदारांसाठी सूचना

वर्गणीदाराना दिवाळी अंक वर्गणीतच दिला जातो. ज्यांना दिवाळी अंक रजिस्टर्ड पोस्टाने पाहिजे असेल त्यानी १५–१०–८१ पूर्वी तीन रुपये पाठवावेत.

अंक व्यवस्थित मोजून पोस्टाच्या ताब्यात दिले जातात. तरीही अंक न मिळाल्यास प्रथम स्थानिक पोस्टाकडे चौकशी करावी. तेथे लेखी तक्रार द्यावी व तक्रारीची एक प्रत आमच्याकडे पाठवावी. अंक शिल्लक असल्यास अवश्य पाठवू.

ज्यांची वर्गणी १० ऑक्टोबर किंवा त्यासुमारास संपली असेल व ज्यांची पुढील वर्षाची वर्गणी जमा नसेल त्यांना दिवाळी अंक पाठविला जाणार नाही.

जे वर्गणीदार कार्यालयातून दिवाळी अंक नेणार असतील त्यांनी १५–१०–८१ पूर्वी तसे कळवावे.

–व्यवस्थापक, माणूस

अवतीभवती । शरद कृष्णन

# □ नाणेनिधीकडून मिळणारे अवाढव्य कर्ज

आंतरराष्ट्रीय नाणेनिधीमार्फत भारताला जे बिलियन डॉलर्सचे कर्ज देण्यात येणार आहे, त्याबाबत जाचक आणि अपमानकारक अटी घातल्याचे आरोप विरोधी पक्षांतर्फे करण्यात येत आहेत. कोणत्या अटीवर हे कर्ज स्वीकारण्यात येणार आहे याबाबत सध्या केन्द्र सरकार व अर्थमंत्री मुग्धता बाळगून आहेत. कारण करारावर सही झाल्याखेरीज कराराच्या अटी उघड करण्यात येणार नाहीत अशीही एक अट असल्यामुळे, अर्थमंत्री श्री. वेंकटरामन यांनी करार झाल्याबरोबर अटी स्पष्ट करणारे एक निवेदन आपण गृहापुढे ठेवू, असे आश्वासन राज्यसभेत दिले आहे. असे निवेदन सादर होण्यापूर्वीच विरोधकांनी जो गदारोळ उठवला आहे तो फारसा सयुक्तिक मानता येणार नाही. प. बंगालचे अर्थमंत्री अशोक मित्रा यांनी असा सुस्पष्ट आरोप केला आहे की, हे कर्ज पदरात पडावे म्हणून भारतीय रुपयाचे अघोषित अवमूल्यन करण्यात आले आहे.आपल्या विधानाच्या स्पष्टीकरणासाठी त्यानी रुपया आणि डॉलर यांच्या दरामधील रुपयाची घसरती स्थिती आकडेवारीसह समोर ठेवली आहे. ते म्हणतात– भारतीय रुपयाचे १४.४% इतके अवमूल्यन झाले असून नऊ एप्रिलपासून त्याची अंमलबजावणीही झाली आहे. भारत व नाणेनिधी यांच्यामधील कर्जाबाबतच्या बोलण्यांना एप्रिलच्या पहिल्या आठवड्यातच प्रारंभ झाला, हे त्यांनी स्पष्ट केले असून रुपयाच्या अवमूल्यनाचा या कर्जमंजुरीशी संबंध असल्याचे बोलून दाखवले आहे. मित्रा पुढे म्हणतात, एप्रिल नऊ रोजी १०० रुपये=१२.७८० डॉलर असा दर होता. आठ सप्टेंबरपर्यन्त तो १०० रुपयांसाठी १०.९३८ इतका खाली खाली घसरला आहे. मित्रा व अन्य विरोधकांनी असे अनेक आरोप केले असले तरी अर्थमंत्र्यांनी ते सारे फेटाळून लावले आहेत.

### कर्जासाठी उत्तम वेळ

कर्ज स्वीकारण्यासाठी सध्याची परिस्थिती उत्तम आहे, असा अर्थमंत्र्यांचा दावा आहे. ते म्हणतात, अशी कर्जे नाणेनिधीकडून मंजूर करण्यात येतात त्या वेळी कर्ज स्वीकारणाऱ्या देशाची आर्थिक व्यवहाराबाबतची पत लक्षात घेतली जाते आणि याबाबत भारताची परिस्थिती एकदम मजबूत आहे. ३० जूनअखेर भारत सरकारच्या डोईवर १५,३६० कोटी रुपयाचा परकीय कर्जाचा बोजा आहे; पण कर्ज आणि व्याजफेडीबाबतच्या ज्या अटी आहेत त्याचे भारताने अत्यंत काटेकोरपणे पालन केले असून चुकारपणाचे अपवादात्मक उदाहरणही नाही! त्यामुळे कर्ज मिळण्यास अडचण येणार नाही. नजीकच्या काळामधील तुटीचा भरणा करण्यासाठी अधिक द्रव्याची सध्या गरज असून आता जर मोठे कर्ज हाती पडले तर आर्थिक आघाडीवर भारताला आपली स्थिती मजबूत बनवता येईल. भारताला आर्थिक संकटातून यशस्वीपणे बाहेर पडायचे असेल तर आता या मोठ्या कर्जाचा बोजा स्वीकारण्याखेरीज गत्यंतरच नाही, असा श्री. वेंकटरामन याचा दावा आहे.

आंतरराष्ट्रीय नाणेनिधीच्या संचालकमंडळाची वार्षिक बैठक या महिनाअखेर वॉशिंग्टन येथे भरत असून भारताचे अर्थमंत्री श्री. आर. वेंकटरामन हे या बैठकीसाठी २९ सप्टेंबर रोजी रवाना होत आहेत. १४१ देश या नाणेनिधीचे सदस्य आहेत. आंतरराष्ट्रीय पातळीवर महत्त्वपूर्ण चलन समजले जाणाऱ्या डॉलरचा तसेच अन्य चलनाचा देवाणघेवाण दर जास्तीत जास्त स्थिर असावा यासाठी नाणेनिधीचे प्रयत्न चालू असून या धोरणाला पूरक ठरतील अशाच अटी कर्ज स्वीकारणाऱ्या देशांवर लादण्यात येतात. आंतरराष्ट्रीय पातळीवर भारतीय रुपयाची परिस्थिती चांगली नाही. अशा परिस्थितीत एवढे मोठे कर्ज भारताला देताना भारतीय रुपयाच्या अवमूल्यनाबाबत विचार होणे अपरिहार्य आहे; पण शासन या बाबतच्या अटी स्पष्ट करणार नाही. अपमानित अटी मान्य करून आपण हे कर्ज स्वीकारणार नाही,एवढेच आश्वासन शासनाकडून देण्यात आले आहे; परंतु विरोधी पक्षांना याबाबत विश्वास वाढत नसल्याने कोणत्या अटीवर कर्ज स्वीकारले जात आहे अशी विचारणा वारंवार करण्यात येत आहे. १९६६ साली रुपयाचे ४०% अवमूल्यन करण्यात आले. त्या वेळी नाणेनिधीचे दडपण होतेच. त्या अवमूल्यनाचे काय परिणाम झाले हे सर्वविदित आहे. त्यामुळेच सहा बिलियन डॉलर्स एवढे प्रचंड कर्ज स्वीकारले जाताना रुपयाचे अवमूल्यन होणारच असे गृहीत धरूनच विरोधी पक्षातर्फे हालचाली सुरू आहेत. तथापी रुपयाच्या अवमूल्यनाची गरज भासणार नाही असा विश्वास व्यंकटरामन यांना वाटत असावा. १९६६ मध्ये देवाणघेवाणीचे दर स्थिर व कायम स्वरूपाचे होते. आज रुपयाचा परकीय चलनाचा दर प्रवाही आहे आणि रुपयाच्या या दरामध्ये सतत बदल होत असतो. खेरीज भारताजवळ आज ४ हजार कोटी रुपयांचे परकीय चलन राखीव निधीमध्ये उपलब्ध आहे. त्यामुळेच अर्थमंत्री रुपयाचे अवमूल्यन करण्याची सध्या तरी गरज नाही असे आश्वासन गृहाला देऊ शकले असावेत. मात्र आतरराष्ट्रीय पातळीवर रुपयाची किंमत केवळ डॉलरच्या संदर्भातच नव्हे तर अन्य महत्त्वपूर्ण चलनांच्या संदर्भातही घसरती आहे, ही परिस्थिती अर्थमंत्र्यानी मान्य केली आहे. या परिस्थितीचा देशाच्या आर्थिक स्थितीवर प्रतिकूल परिणाम होत असल्याने आतरराष्ट्रीय पातळीवर रुपयाची आणखी घसरण होऊ नये, अशी अपेक्षा विरोधी पक्षाने व्यक्त करणे अवाजवी समजता येणार नाही.

नाणेनिधीकडून कर्ज स्वीकारताना काही अटी मान्य कराव्याच लागतात आणि कर्ज स्वीकारणारा गरजवंत असल्याने त्याच्या दृष्टीने या अटी काहीशा जाचकही असतात; परंतु त्याचबरोबर नाणेनिधीमार्फत दिले जाणारे हे कर्ज संबंधित देशाला आर्थिक अडचणींवर मात करता यावी याच उद्देशाने देण्यात येत असल्याने, कर्जाच्या अटी अपमानकारक क्वचितच नसतात आणि भारताच्या बाबतीतही त्या तशा नाहीत अशी जी ग्वाही अर्थमंत्र्यांनी दिली आहे, त्याबाबत शंका घेण्याचे कारण नाही. खेरीज, या अटीबाबतचे संपूर्ण निवेदन ते करारावर सह्या होताच गृहासमोर ठेवणार असल्याने याच

लपवालपवीचा आणि गुप्त करारांचा काही भाग नसावा असे दिसते. या अटी समोर आल्यावर त्याबाबत जर काही आक्षेपार्ह वाटले तर गृहाने आपली मान्यता देऊ नये असेही अर्थमंत्री म्हणतात, तेव्हा या प्रकरणी ते पुरेसे प्रांजल आहेत असेच म्हणावे लागेल.

नाणेनिधीमार्फत कर्ज मंजूर करताना सर्वसाधारणपणे तुटीच्या अर्थभरण्यावर नियंत्रण घातण्यात येते, कल्याणकारी उपक्रमांवर जो शासकीय पैसा खर्च होतो त्यावर बंधने घालण्यात येतात आणि मल्टी–नॅशनलसच्या बाबतीत उदार धोरण स्वीकारण्यासाठी प्रवृत्त करण्यात येते. या सर्वसाधारण अटी आहेत; पण भारताने नियोजनाबाबत ज्या योजना आखल्या आहेत त्यांच्या तपशिलात शिरण्याचा अधिकार नाणेनिधीला नाही. सध्या हे प्रकरण ज्या पद्धतीने हाताळले जात आहे त्यावरून अपमानकारक ठराव्यात अशा अटी अर्थमंत्री मान्य करणार नाहीत. कल्याणकारी योजनावरील खर्चामध्ये कपात करण्यात येणार नाही, हेही त्यांनी स्पष्ट केले आहे. जे कर्ज घेण्यात येत आहे त्याचा मार्केटमधील पुरवठा सुधारण्यासाठी वापर करून, आर्थिक परिस्थितीवर नियंत्रण ठेवण्यासाठी वापर केला जाईल. अर्थात कर्जाचा हा व्यवहार दीर्घ मुदतीचा असल्याने आणि या सरकारच्या आर्थिक जबाबदाऱ्या भावी काळामधील शासनावर आपोआप येऊन पडत असल्याने शासनाने जास्त जबाबदारीने हा व्यवहार करणे जरूर आहे. आगामी पिढ्यांनाही याबाबतची जबाबदारी उचलावी लागेल असे जे मोघम विधान अर्थमंत्र्यांनी केले आहे ते काहीसे फसवे आहे. कारण केवळ आपली आताची गरज भागती आहे ना, मग पुढचे पुढे बघू, असा काहीसा दृष्टिकोन या विधानामागे आहे. भावी पिढ्या आपली जबाबदारी जरूर पार पाडतील. मात्र त्याचबरोबर, आपल्या आधीच्या मंडळींनी काय केले आहे याचाही तपशील ते जरूर पहातील. त्यामुळे देशाच्या आणि आगामी शासनाच्या हितसंबंधाना बाधा येईल अशा पद्धतीने हा व्यवहार केला जाणार नाही, एवढी दक्षता अर्थमंत्र्यांना जरूर घ्यावी लागेल!

## □ बंगालचे नवे राज्यपाल

राज्यपालपद हे सर्वसाधारणपणे सुखासीन आसन असले तरी प. बंगालचे राज्यपालपद ही तशी तारेवरची कसरत आहे. स्वाभाविकपणे राजकीय नेते प. बंगालचे राज्यपालपद स्वीकारण्यास उत्सुक नसतात. टी. एन. सिंग यांचा राजीनामा स्वीकारल्यावर, प्रथम ज्येष्ठ राजकारणी-राजस्थानचे माजी मुख्यमंत्री श्री. मोहनलाल सुखाडिया यांच्याकडे विचारणा करण्यात आली होती; परंतु त्यांनी नकार दिल्यावर ही अवघड जबाबदारी केंद्रीय मंत्रिमंडळाचे माजी सचिव आणि आय्. सी. एस्. केडरमधील एक ज्येष्ठ अधिकारी श्री. भैरवदत्त पांडे यांच्याकडे विचारणा करण्यात आली. त्यांचा होकार आल्यावर प. बंगाल शासनाला हे नाव कळवण्यात आले आणि त्या शासनाचा या नावाला विरोध नसल्याने श्री. पांडे यांच्या नेमणुकीची घोषणा करण्यात आली. गेल्याच सप्ताहामध्ये श्री. पांडे यांनी या नवीन जबाबदारीचा स्वीकार केला आहे.

श्री. टी. एन. सिंग यांची उचलबांगडी करण्याच्या दृष्टीने हालचाली सुरू झाल्यावर राज्यसरकारने त्याविरुद्ध जोरदार आघाडी उघडली. आपली मुदत पूर्ण करून निवडणुका होण्यापूर्वी अथवा ऐन निवडणुकीच्या वेळी राज्यशासन बरखास्त करता यावे यासाठीच टी. एन. सिंग यांना हलवण्यात येत आहे, असा आक्षेप श्री. ज्योती बसू यांनी घेतला. विरोधी पक्षाचे कोणतेही राज्यसरकार बरखास्त करण्याचा, आपला इरादा नाही हे इंदिराजींनी वारंवार स्पष्ट केले तरी राजकीय हेतू मनात ठेवून प. बंगालच्या आघाडी सरकारने ही मोहीम चालूच ठेवली. राज्यपालाने राज्यसरकारविरुद्ध अहवाल सादर केला तरच केंद्रशासन राज्यसरकार बरखास्त करू शकते, अशातला भाग नाही. राज्यपालाच्या अहवालाची वाट न पहाता केंद्रशासनही कारवाई करू शकते, घटनेत तशी स्पष्ट तरतूद आहे. अर्थात राज्यपालाचा अहवाल राज्यसरकारविरुद्ध असेल तर केंद्राच्या निर्णयाला जरा बळकटी येते. थोडा–फार नैतिक आधार मिळतो इतकेच. ज्योती बसूंना अथवा आघाडीसरकारमधील त्यांच्या सहकाऱ्यांना या घटनात्मक तरतुदीची जाणीव नाही, अशातला भाग नाही; परंतु तरीही केंद्र शासनाने टी. एन. सिंग यांच्याविरुद्ध हालचाली सुरू करताच राज्यशासनाने त्याविरुद्ध मोहीम उघडली होती. राज्यपालाने विरोधी पक्षाच्या सरकारशी अवाजवी जवळीक करणे केंद्रशासनाला रुचले नाही आणि याच भावनेतून टी. एन. सिंग यांच्याविरुद्ध कारवाई झाली.

नवीन राज्यपाल श्री. पांडे हे निष्णात अधिकारी असून स्वतंत्र विचाराचे आहेत. शहा कमिशनसमोर त्यांची साक्ष झाली होती आणि त्यांनी अत्यंत सुस्पष्ट शब्दांत आणीबाणीविरुद्ध आपले मत नोंदले होते. ज्या वेळी आणीबाणी घोषित केली गेली त्या वेळी श्री. पांडे हे कॅबिनेट सेक्रेटरी होते. तथापि आपल्याला आणीबाणी आणली जात आहे या गोष्टीची कल्पना नव्हती असेही त्यांनी शहा कमिशनसमोर सांगितले होते आणि असे असूनही पांडे यांना राज्यपाल म्हणून नेमण्यात आले आहे. याचाच अर्थ असा की, शहा कमिशनसमोर दिलेल्या साक्षीकडे दुर्लक्ष करून त्यांची निवड करण्यात आली आहे. प. बंगाल सरकारने त्यांच्या नावाला विरोध केलेला नाही इतकेच नव्हे तर त्यांच्या स्वागताला आणि शपथविधीसमारंभास मुख्यमंत्री हजर होते आणि समारंभ साधा असला तरी राज्यशासनाकडून नवीन राज्यपालाचे मोकळ्या मनाने स्वागत झालेले दिसते. प्रशासकीय सेवेतून राज्यपालपदी विराजमान झालेल्या धर्मवीर यांच्याबाबतचा अनुभव चांगला नसला तरी ६७ साली तेव्हाचे राज्यपाल धर्मवीर यांनी पहिल्या संयुक्त आघाडी मंत्रिमंडळाविरुद्ध जे केले ते श्री. पांडे करणार नाहीत असे दिसते. श्री. पांडे यांच्या नेमणुकीमुळे केंद्रशासन आपल्या विरुद्ध नाही असा दिलासा मिळाला, असे मत प. बंगालच्या एका मंत्र्याने बोलून दाखवले. श्री. पांडे हे उत्तम व निःपक्षपाती प्रशासक असल्याने त्यांच्या प्रदीर्घ अनुभवाचा राज्यशासनाला झाला तर फायदाच होईल, असे मुख्यमंत्री बसू यांना वाटते.

चौसष्ट वर्षांचे श्री. पांडे यांची प्रशासकीय सेवेमधील कारकीर्द गौरवास्पद आहे. १९३८ साली त्यांनी आय्. सी. एस्. ची परीक्षा उत्तीर्ण करून शासकीय सेवेत प्रवेश केला. त्यानंतर त्यांनी बिहार-

मध्ये लहान-मोठ्या अधिकाराच्या जागांवर वीस वर्षे काम केले. १९५९ साली त्यांना दिल्लीमध्ये बोलावून घेण्यात आले. समाज-विकास व सहकार या खात्यांत त्यांनी सहसचिव म्हणून काम केले. पुढे त्यांची अर्थनियोजनखात्याचे सचिव म्हणून नेमणूक झाली. केंद्रीय महसूलमंडळ व सुवर्णनियंत्रक व्यवस्थापन यांची सूत्रे त्यानी काही काळ संभाळली. खेरीज आयुर्विमा महामंडळाचे अध्यक्षपदही भूषवले. पुढे काही वर्षे नियोजनमंडळाचे सचिव म्हनून त्यांनी काम केले. कॅबिनेट सेक्रेटरी हे प्रशासकीय सेवेमधील सर्वोच्च सन्मानाचे पद भूषवल्यानंतर त्यांनी १९७७ मध्ये सेवानिवृत्ती स्वीकारली आणि आता प. बंगालचे राज्यपालपद त्यांच्याकडे चालून आले आहे. स्वतंत्र विचाराचा जागरूक अधिकारी अशी श्री. पांडे यांची ख्याती असल्याने केवळ केंद्रशासनाची इच्छा आहे म्हणून ते कोणतीही गोष्ट करणार नाहीत. घटनेच्या चौकटीमध्ये राहून राज्यपालांना बरेच काही करता येईल असे मत त्यांनी व्यक्त केले आहे. याचाच अर्थ असा की, आपली जबाबदारी स्वतंत्र बुद्धीने पार पाडण्याची त्यांची इच्छा आहे.

## □ केवळ एका महापौरपदासाठी

आंध्र प्रदेशात इंदिरा कांग्रेसचे शक्तिशाली शासन चांगले मजबूत संख्याबळाच्या ताकदीवर उभे आहे. राज्यामध्ये इंदिरा कांग्रेसची ताकदही चांगली आहे; परंतु अलीकडेच विशाखापट्टण व विजयवाडा येथील महानगरपालिकांच्या ज्या निवडणुका झाल्या त्या निवडणुकामध्ये इंदिरा कांग्रेसला चांगला सणसणीत पराभव पत्क-रावा लागला. स्वाभाविकपणे या पराभवाची दखल घेणे इंदिरा कांग्रेसला भाग पडून राज्यपातळीवरील पक्षाचे नेतृत्व जबाबदार व लोकप्रिय नेत्याकडे सुपूर्द करण्याच्या दृष्टीने हालचाली सुरू आहेत. विद्यमान पक्षाध्यक्ष श्री. ए. अझीझ यांचा राज्यमंत्रिमंडळामध्ये समावेश झाल्याने त्यांना पक्षाच्या कामातून मोकळे करून अन्य कोणाकडे अध्यक्षपद सोपवण्याच्या दृष्टीने हालचाली सुरू आहेत. अर्थात आपला पक्ष आपल्याला सोइस्कर वाटेल अशा पद्धतीने बळ-कट करण्यास कोणीच हरकत घेणार नाही. प्रत्येक राजकीय पक्ष अशा पद्धतीने प्रयत्न करतच असतो; पण राज्यामध्ये मजबूतपणे सत्तास्थानी असूनही या पक्षाने विशाखापट्टणचे महापौरपद भारतीय जनता पक्षाकडे जाऊ नये म्हणून हिणकस राजकारण केले. त्यामुळे त्यांचा हेतू तर साध्य झाला नाहीच, पण हसे मात्र भरपूर झाले! त्याचे काय झाले, ५० सदस्य असलेल्या विशाखापट्टण महानगर पालिकेमध्ये २५ जागा जिंकून भारतीय जनता पक्षाने पहिला दणका दिला. एवढा मोठा विजय या पक्षाला मिळेल असे इंदिरा कांग्रेसला मुळीच वाटत नव्हते; पण भा. ज. प. ने स्वतःच्या २४ व पुरस्कृत उमेदवाराची एक अशा एकूण २५ जागा जिंकल्या. इंदिरा कांग्रेसला केवळ ८ जागा मिळाल्या. याखेरीज अपक्ष ६, डावे कम्युनिस्ट २, सिटिझन फ्रंट ९ असे इतर पक्षांचे सामर्थ्य होते. महापालिकेचे महापौरपद भा. ज. प. कडे जाणार हे लक्षात येताच, इंदिरा कांग्रेने जोरदार हालचाली सुरू केल्या. सर्व म्हणजे सहाच्या सहा अपक्ष आपल्या बाजूला वळवण्यात या पक्षाने यश मिळवले व त्यानंतर सिटिझन फ्रंटशी वाटाघाटी सुरू केल्या. आपल्याकडे पुण्यात जशी नागरी संघटना ही एक बिनबुडाची संघटना आहे तशीच ही सिटिझन फ्रंट, कायद्याचे आणि काय घ्यायचे याबाबतचा तपशील ठरू लागला. १४ सदस्य आधीच तयार केले होते. त्यामध्ये या ९ ची भर पडली असती तर इंदिरा कांग्रेसच्या आदेशाची बाधिलकी मानणारे २३ सदस्य झाले असते. खेरीज जो अपक्ष भाजपच्या पुरस्कराने निवडून आला होता त्यालाही लालूच दाखवून फोडण्याचे प्रयत्न सुरू होते. हे असे फोडाफोडीचे राजकरण सुरू झाल्यावर जनतेकडून त्याबाबत नाराजीची प्रतिक्रिया व्यक्त केली जाऊ लागली. महापौरपदाची ज्या दिवशी निवडणूक होती त्याच्या आधी तीन दिवस वातावरण इतके गढूळ झाले की, नेमके काय होणार हे कोणालाच सांगता येत नव्हते. आपल्या पक्षात फूट पड नये म्हणून भा. ज. प. ने आपले २४ व आपल्या पक्षाने पुरस्कृत केलेला एक असे सर्वच्या सर्व २५ सदस्य एका अज्ञात स्थळी हलवले. तेथे त्यांना मतदानाबाबत मार्गदर्शन करण्यात आले. खेरीज पक्षबदल केल्यामुळे कसे नुकसान होते याबाबत बौद्धिके घेण्यात आली. दरम्यान जनदिशाखा युवा मोर्चाच्या तरुण नेत्यांनी प्रत्येक सदस्याच्या घरावर मोर्चा नेला. आपण पक्षबदल करणार नाही असे आश्वासन त्याना निवडून गेलेल्या सदस्यांकडून हवे होते. इंदिरा कांग्रेसकडून फाटाफुटीच्या राजकरणाला ज्या पद्धतीने उत्तेजन देण्यात येत होते त्याबद्दलही जनतेमध्ये नाराजीच होती. मोर्चे नेणाऱ्या मंडळीचा खरा राग सिटिझन फ्रंट व अपक्ष सदस्यांविरुद्ध होता. एकंदर वातावरण लक्षात घेऊन सिटिझन फ्रंटने आपली चाल बदलली. इंदिरा कांग्रेसबरोबर आघाडी करण्याचा आपला विचार नसल्याचे पत्रक या आघाडीच्या नेत्यांनी काढले. आपण इंदिरा कांग्रेसबरोबर कोणत्याही वाटाघाटी केल्या नाहीत, तर अन्य काही राजकीय हेतू मनात ठेऊन इंदिरा कांग्रेसने आपण होऊन सहकार्याचा हात देऊ केला, असे फ्रंट-वाल्याचे म्हणणे. आता हा अन्य हेतू म्हणजे काय, तर भाजपला महापौरपद मिळू न देणे. सिटिझन फ्रंटच्या नेत्यांच्या या पत्रकामुळे इंदिरा कांग्रेसच्या हालचाली मंदावल्या. दरम्यान फ्रंटच्या सहकार्याने निवडून गेलेल्या डाव्या कम्युनिस्ट पक्षांच्या दोन सदस्यांचा आपण इंदिरा कांग्रेसचा प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष पुरस्कार स्वीकारणाऱ्या उमेदवाराला मत देणार नाही, असा सुस्पष्ट खुलासा प्रसिद्ध झाल्यावर सिटिझन फ्रंटच्या उमेदवाराची महापौरपदी वर्णी लागण्याची शक्यता एकदम कमी झाली. फाटाफुटीचे राजकारण यशस्वी होत नाही हे पाहिल्यावर इंदिरा कांग्रेसने सत्तेचा वापर करून एक नवीनच पेच निर्माण केला. महानगरपालिकेच्या, किंबहुना स्थानिक स्वराज्य-संस्थेच्या कोरमबाबत काही निश्चित २ नियम अस्तित्वात आहेत; परंतु विशाखापट्टणचे महापौरपद भा. ज. प. कडे जाऊ नये अशा हेतूने राज्यसरकारने एक फतवा काढला. ज्या दिवशी महापौरपदाची निवडणूक होती त्याच दिवशी हे परिपत्रक राज्यसरकारकडून महानगरपालिकेला पोचविण्यात आले. या संदर्भात लक्षात घेण्यासारखी आणखी एक गोष्ट म्हणजे, जेथे विरोधी पक्ष बहुसंख्य होता अशा दुसऱ्या म्हणजे विजयवाडा महानगरपालिकेची निवडणूक आधीच पार पडली होती. कांग्रेस आयने आपला उमेदवार मागे घेतल्याने

तेथील महापौर बिनविरोध निवडला गेला. त्यानंतर हा सरकारी आदेश निघाला. विशाखापट्टणमध्ये भाजपचा महापौर येऊ द्यायच्या नाही या एकमेव उद्देशाने हा आदेश काढला, ही दिसती गोष्ट आहे. या आदेशाप्रमाणे महापौरपदाच्या निवडणुकीसाठी कोरम संख्या ही एकूण सदस्य संख्येच्या ५० टक्क्याहून जास्त हवी होती वास्तविक याबाबत जो कायदा आहे त्या प्रमाणे एकूण सदस्य-संख्येच्या १/४ उपस्थिती असेल तर कोरम भरला असे आहे! मग हा पन्नास टक्क्यांहून जास्त उपस्थितीचा फतवा कशासाठी ? तर भा.ज प.ची सदस्य संख्या नेमकी पन्नास टक्के. तेव्हा इतरांकडून निवडणुकीवर बहिष्कार टाकण्यात यश मिळाले तर कोरम भरू शकणार नाही आणि निवडणुकीमध्ये अडथळा येऊ शकेल, असे आडाखे बांधून हा आदेश काढण्यात आला होता.

तोडाने लोकशाहीच्या गप्पा मारावयाच्या आणि सत्तेचे प्रत्येक लहान–मोठे स्थान आपल्या हाती रहावे यासाठी आटापिटा करायचा, सर्व संकेत बाजूला ठेवून हिणकस राजकरण करायचे असा हा सगळा निंद्य प्रकार होता. अर्थात त्याचा उपयोग झाला नाही हा भाग वेगळा. कारण निवडणूक ज्या दिवशी होती त्यादिवशी भाजपचे सर्व सदस्य वेळेवर उपस्थित झाले. तरीही नवीन आदेशाप्रमाणे आणखी किमान एका सदस्याची गरज होती; पण बहिष्काराची योजना बारगळली आणि सर्व सदस्य उपस्थित झाले. कोरमबाबतचा सरकारी आदेश ज्या उद्देशाने काढण्यात आला होता तो उद्देश काही सफल झाला नाही. ५० सदस्यांच्या या सभागृहात ४८ सदस्य येऊन दाखल झाले. डाव्या कम्युनिस्ट पक्षाचे दोन्ही सदस्य गैरहजर राहिले. महापौरपदाच्या निवडणुकीसाठी २ उमेदवार होते. भा. ज. पचे श्री. एन्. एस्. एन्. रेड्डी व सिटिझन फ्रंटचे येलाजी राव. मतदानाच्या वेळी वातावरण थोडे तंगच होते. महानगरपालिकेच्या आवाराबाहेर मोठा जमाव होता. मतदान झाले आणि निकाल जाहीर करण्यात आला. भाजपचे रेड्डी निवडून आले. त्याना २८ तर त्यांच्या प्रतिस्पर्धी उमेदवाराला २४ मते पडली. याचाच अर्थ असा की, अन्य पक्षाच्या तीन सदस्यांनी भाजपच्या उमेदवाराला मते दिली. सिटिझन फ्रंटच्या एका उमेदवाराने निवडणुकीनंतर सांगितले की, राज्य सरकारने कोरम बाबत जो आदेश काढला त्याचा निषेध म्हणून मी भाजपच्या उमेदवाराला मत दिले. एका महानगरपालिकेच्या महापौरपदाची निवडणूक ती काय ? पण त्यात अवाजवी लक्ष घालून सत्ताधारी इंदिरा कॉंग्रेसने आपले हसे करून घेतले. दक्षिणेमध्ये भाजपचा पहिला महापौर निवडून गेला; त्यामुळे असे काय आकाश कोसळणार आहे ? सत्ताधारी पक्षाने या निवडणुकीच्या संदर्भात जे हिणकस राजकरण केले यामुळे या पक्षाच हसे झाले. □

# नव्या समाजपरिवर्तनाचे प्रणेते – स्वामी श्रद्धानंद

प्रा. देवदत्त तुंगार

मीनाक्षीपुरम् इतिहासात कशासाठी प्रसिद्ध आहे, कोण जाणे! पण गेल्या काही दिवसांत अनेक दलित समाजातील कुटुंबांनी इस्लाम धर्मात प्रवेश केल्याने व नवमुस्लीम कुटुंबातील काही जणांनी हिंदु वैदिक धर्मात पुन:प्रवेश केल्याने मीनाक्षीपुरम् सर्वच प्रमुख वृत्तपत्रांत आणि नियतकालिकांत अग्रभागी झळकत आहे. हिंदु धर्माची समीक्षा आणि शुद्धि–आंदोलनाचा उल्लेख वारंवार होत आहे. 'माणूस'च्या संपादकीयातही पंडित नेहरूंच्या हिंदुधर्मचिकित्सेचा उल्लेख आणि शुद्धि–आंदोलनाचे प्रवर्तक आर्यसमाजीनेते स्वामी श्रद्धानंद यांच्या भावी काळातील अवताराचा मार्मिक संकेत आला आहे.

शुद्धि–आंदोलन छत्रपती शिवाजीमहाराजांनी सुरू केले असले तरी आधुनिक काळात या आंदोलनाशी नाव जोडले गेले आहे ते स्वामी श्रद्धानंद यांचेच ! शुद्धि–आंदोलनाला मोठ्या प्रमाणावर स्वामीजींनीच चालना दिली असली तरी त्यांच्या या कार्याप्रमाणेच इतर उल्लेखनीय पैलूचे नव्या पिढीला विस्मरण झाल्यासारखे दिसते. कॉंग्रेसचे महान नेते, श्रेष्ठ पत्रकार, उत्कृष्ट वक्ते आणि लेखक, अस्पृश्योद्धार, आतरजातीय विवाह, स्वदेशी भारतीय शिक्षणपद्धतीचे आद्य प्रवर्तक या दृष्टीने स्वामी श्रद्धानंद यांनी अत्यंत मौलिक काय केले आहे. गांधीजींना 'महात्मा' करणारे श्रद्धानंदच होत. हिंदी माध्यमातून उच्च शिक्षण देणाऱ्या गुरुकुल कांगडी (हरिद्वार) चे संस्थापक तेच होते व त्यांनीच उत्तर भारतात मुलींसाठी प्रथम विद्यालये काढली, महर्षी अण्णासाहेब कर्वे यांनीही त्यांच्यापासूनच प्रेरणा घेऊन महाराष्ट्रात महिला विद्यापीठ काढले, या महत्त्वाच्या ऐतिहासिक घटनासुद्धा अगदी जाणकारांच्या स्मरणातून निसटून जाताहेत ही खेदाचीच गोष्ट म्हणावी लागेल !

स्वामी श्रद्धानंदजींचे कार्य मुख्यत: 'आर्यसमाज' हा केंद्रबिंदू म्हणूनच झालेले आहे. आर्यसमाजाचे संस्थापक स्वामी दयानंद यांचे चरित्र उज्ज्वल आणि प्रेरणादायक आहे; पण सामान्य माणसाला स्वामी श्रद्धानंद जास्त जवळचे वाटणारे आहेत. एक मद्यपी, मांसाहारी, नास्तिक व एकंदर भ्रष्ट चारित्र्याचा वाया गेलेला माणूस हीच स्वामी श्रद्धानंदांच्या पूर्वायुष्याची कहाणी आहे. गांधीजीप्रमाणेच आपले हे सर्व दोष प्राजलपणे श्रद्धानंदांनी 'कल्याण मार्ग का पथिक' या आपल्या आत्मचरित्रात नमूद केले आहेत. एवढ्या 'पतित' अवस्थेतला माणूस उत्तरायुष्यात श्रेष्ठ चारित्र्याचा भारतीय पातळीवरील अग्रगण्य नेता झाला याचे श्रेय स्वामी दयानंदानाच आहे! श्रद्धानंदांनी अनेकदा त्यासंबंधीचा ऋणनिर्देश लेखनातून आणि भाषणातून भक्तिभावाने केला आहे.

पंजाबच्या जालंदर जिल्ह्यातील तलवन गावी १९५६ मध्ये

फेब्रुवारीत (फाल्गुन वद्य १३ संवत् १९१३) स्वामीजींचा जन्म झाला. त्याचे नव मुंशीराम ठेवण्यात आले. नंतर ते महात्मा मुंशीराम झाले व संन्यासदीक्षा घेतल्यावर 'स्वामी श्रद्धानंद' असे त्यांचे नामकरण झाले. वडिलांचे ते फार आवडते होते. वडील पोलीस-खात्यात उच्च अधिकारी होते. बालपणी लाडात लालनपालन झाल्याने व संगतसोबत चांगली नसल्याने मद्यपानाचे व्यसन लागले. मांसाहार निषिद्ध नव्हताच. मित्राच्या 'मार्गदर्शनाने' मद्यपानानंतर वेश्यागृहातही ते गेले. अर्थात व्यसनाधीन जीवनात रमलेल्या या तरुणाच्या व्यक्तिमत्त्वात सत्याची आस्था आणि उदात्त मानवतेची बीजे अंकुरलेली होती. स्वामी दयानंदसरस्वती आणि पत्नी शिव-देवीची पतिपरायण निष्ठा यामुळे स्वामीजींच्या जीवनात अद्‌भुत परिवर्तन झाले.

आर्यसमाजाचे संस्थापक स्वामी दयानंदसरस्वती यांच्या व्याख्या-नांचा कार्यक्रम १८७९ मध्ये बरेलीमध्ये ठेवण्यात आला होता. श्रद्धा-नंदांचे वडील नानकचंद यांची कोतवाल या नात्याने या कार्यक्रमात गोंधळ होऊ नये म्हणून बंदोबस्तासाठी ड्युटी झालेली होती. नानक-चंद दयानंदांच्या व्याख्यानांनी प्रभावित झाले. घरी आल्यावर मुंशीरामला त्यांनी सांगितले की, 'एक संन्यासी आला असून त्याची व्याख्यानमाला सुरू आहे. उद्या तूही व्याख्यान ऐकायला चल!' मुंशीराम नास्तिक होते. वाहवत चाललेल्या आपल्या मुलावर जर चांगले संस्कार झाले व तो 'सुधारला' तर पहावे, या हेतूने नानक-चंद यांनी मुंशीरामला व्याख्यानाला नेले. बेगमबाग कोठी या व्याख्यानाच्या ठिकाणी दयानंदांचे विचार ऐकण्यासाठी पाद्री स्कॉट आणि तीन युरोपियन गृहस्थही हजर असलेले पाहून मुंशीरामला आपण येथे येण्यात फार मोठी चूक केली असे वाटले नाही. आधु-निक विद्याविभूषित मंडळीसुद्धा व्याख्यानाला हजर आहेत त्यामुळे आपल्याला अपराधीपणाची भावना होण्याचे कारण नाही, असा दिलासा त्याला लाभला. दयानंदजीचे प्रवचन सुरू होताच थोड्याच वेळात भाषाप्रभुत्व, युक्तिवाद आणि सखोल ज्ञान यामुळे मुंशीराम आश्चर्यचकितच झाला! केवळ संस्कृत जाणणाऱ्या (इंग्रजी न येणाऱ्या) दयानंदांसारख्या माणसाने इतके तर्कशुद्ध विचार व्यक्त करावेत याबद्दल 'आश्चर्य' व्यक्त करून श्रद्धानंदांनी या घटनेबद्दल नंतर आत्मचरित्रात लिहिले आहे, 'त्या पहिल्या दिवसाचा आत्मिक आनंद मी कधी विसरू शकत नाही! मी नास्तिक असूनही मला आत्मिक आनंदात रममाण करण्याचे कार्य ऋषी दयानंदांचेच होते! माझ्या मनात त्या वेळी विचार चमकून गेला की, ईश्वरावरचा विश्वास (आस्तिकभाव) आणि वेदप्रामाण्य या दोन गोष्टी दया-नंदांनी सोडून दिल्या तर दयानंदांची बरोबरी करू शकणारा कोणीही विद्वान सापडणे कठीणच दिसते, दयानंदानी आस्तिक्यभाव सोडावा असे वाटणाऱ्या या विद्वान नास्तिक मुंशीरामला अविचल ईश्वर-निष्ठा ठेवणारा 'स्वामी श्रद्धानंद' बनविले ते दयानंदांनीच! दया-नंदांच्या सहवासात मुंशीराम आले. शंकासमाधान, प्रश्नोत्तरे वरचेवर होऊ लागली. वादविवादात दयानंदांना कोंडीत पकडावे, नास्तिक करावे असा खटाटोप मुंशीरामने खूप केला; पण त्याची सतत 'हार'च होत राहिली. शेवटी मुंशीरामने स्वामी दयानंदांना सांगि-तले की, 'तुमच्याशी वादविवाद करताना माझ्या प्रत्येक मुद्द्याचे तुम्ही रास्त खंडन करता, मी निरुत्तर होतो; पण ईश्वराचे अस्तित्व आहे, याचा विश्वास काही माझ्या मनात तुम्ही निर्माण करू शकला नाही!' स्वामीजींनी त्याला सांगितले की, 'बाबा रे, तू जे प्रश्न व शंका विचारतोस त्याची उत्तरे तर मी देतच आहे. तुला ती पटताहेतही. ईश्वरावर विश्वास ठेवण्यास तुला मी भाग पाडीन असे कुठे कधी मी म्हटले होते? ईश्वरच तुला योग्य वेळी आस्तिक करील! हा अनुभूतीचा विषय आहे' यासंबंधी स्वामी श्रद्धानंदांनी आत्मचरित्रात उपनिषदातील वचनाचा उल्लेख केला आहे. 'नाय-मात्मा बलहीनेन लभ्यो न मेधया, न बहुना श्रुतेन। यमेवैष वृणुते तेन लभ्यस्तस्यैष आत्मा वृणुते तनूं स्वाम् ॥

स्वामीजींचा प्रत्यक्ष सहवास लाभल्यावर काही दिवसांनी हळूहळू नास्तिकता, मद्य–मास, जुगार, व्यभिचार आदि व्यसनांतून मुंशी-रामची सुटका झाली.

स्वामी दयानंदजन्मशताब्दी १९२५ मध्ये मथुरा येथे फार मोठ्या प्रमाणावर साजरी झाली. स्वामी श्रद्धानंदच समारंभाचे प्रमुख होते. त्या वेळी त्यांनी दयानंदांना भावपूर्ण श्रद्धांजली वाहताना म्हटले, 'गुरुवर्य ऋषी! तुम्ही भौतिक शरीर सोडून आज ४१ वर्षे झाली! पण तुमची दिव्य मूर्ती माझ्या हृदयावर कोरलेली आहे. जीवनांत 'पडता पडता' केवळ तुमच्या स्मरणाने मला किती वेळा वाचविले आहे हे मलाच माहीत आहे. माझ्यासारख्या पतिताचा तुम्ही उद्धार केला! मी काय होतो हे सर्वांना माहीत आहे. आता मी काय झालो, कसा आहे हेही सर्व जाणतात. अर्थात ही केवळ तुमचीच कृपा आहे! तुमचा खरा शिष्य बनण्याची ईश्वर मला शक्ती देवो हीच प्रार्थना!'

### एकसंध समाजनिर्मितीचे कार्य

गेल्या शतकात भारतात जी सुधारणावादी आंदोलने झाली त्यात स्वामी दयानंदसरस्वती यांनी स्थापन केलेला आर्यसमाज प्रमुख आहे. १० एप्रिल १८७५ मध्ये स्वामीजींनी काकडवाडी (मुंबई) येथे आर्यसमाजाची स्थापना केली. विशुद्ध वैदिक धर्माची पुनर्स्थापना हे आर्यसमाजाचे मुख्य ध्येय आहे. वेदसंहिताच केवळ ईश्वरीय आहेत; गीता, उपनिषद, रामायण, महाभारत आदि ग्रंथांत वेदानुकूल असेल तेवढेच ग्राह्य बाकी सर्व अग्राह्य, ही आर्यसमाजाची धार्मिक श्रद्धा आहे. हिंदु धर्मात ज्या अनिष्ट रूढी, जातिवाद, अस्पृश्यता आदि दोष आहेत त्याला वेदामध्ये कोठेही शास्त्राधार नाही! 'माणूस' हीच एक जात आहे. स्त्री–पुरुष एवढाच नैसर्गिक भेद आहे. गुण-कर्म स्वभावाने श्रमविभागणीच्या तत्त्वावर वर्णव्यवस्था आहे. ती जन्माधारित नाही. वैयक्तिक जीवनात पहिली २५ वर्षे अध्ययनाचा ब्रह्मचर्याश्रम, २५ ते ५० वर्षे गृहस्थाश्रम, गृहस्थाश्रमातून निवृत्त होऊन सामाजिक कार्यासाठीच अधिकाधिक वेळ देण्यासाठी ५० ते ७५ वर्षे वानप्रस्थाश्रम आणि ७५ वर्षांनंतर 'संन्यास' हे चार आश्रम.

अद्वैतवाद, मूर्तिपूजा, अवतारवाद यावर आर्यसमाजाचा विश्वास नाही. ईश्वर, जीव आणि प्रकृती या तिघांचे अस्तित्व मानणारा त्रैतवाद आर्यसमाज मानतो. मायावाद नाकारतो. जातिवाद विकृती आहे. आंतरजातीय विवाहाद्वारे एकसंध समाजनिर्मिती हे आर्य-समाजाचे ध्येय आहे.

आध्यात्मिक तत्त्वज्ञानाच्या जंजाळापेक्षा प्रत्यक्ष सामाजिक सुधारणांसाठी आर्यसमाजाने भारतीय समाजात, विशेषत: उत्तर भारतात, जे पर्वताएवढे कार्य केले आहे ते इतिहासात, नमूद आहे. आजही शक्त्यानुसार कार्य चालूच आहे. लाला लजपतराय, हुतात्मा भगतसिंग, पडित लेखराम, महात्मा हंसराज, स्वामी स्वतंत्रतानंद, रामप्रसाद बिस्मिल, चंद्रशेखर 'आझाद' श्यामजी, कृष्णवर्मा, गोपाळ हरि देशमुख ऊर्फ लोकहितवादी, छत्रपती शाहूमहाराज इत्यादी नेतेमंडळी आर्यसमाजाचीच होती.

स्वामीदयानंदाचा प्रत्यक्ष सहवास आणि मार्गदर्शन लाभलेले स्वामीश्रद्धानंद हे आर्यसमाजाच्या पहिल्या पिढीचे बिनीचे वीर होते ! सामाजिक सुधारणा आणि राजकीय स्वातंत्र्य या दोन्ही आघाड्यांवर एकसमयावच्छेदे लढा त्यांनीच प्रामुख्याने दिला. कॉंग्रेसला दलित-वर्गाच्या विकासाचे काम करायला त्यांनीच भाग पाडले. आपल्या चुकीमुळे परधर्मात गेलेल्यांचे शुद्धीकरण करून स्वधर्मात घेण्यासाठी त्यांनीच प्राणांची आहुती दिली ! हिंदी राष्ट्रभाषा करण्यासाठी अहो-रात्र प्रयत्न करून 'सद्धर्मप्रचारक' मासिक त्यांनीच सुरू केले. इंग्रजी आणि उर्दूचे नामवंत लेखक असूनही हिंदी ज्या काळात लोकप्रिय नव्हती त्या काळात त्या भाषेतून साहित्यनिर्मिती स्वामीजींनीच केली ! हिंदु मुस्लीम ऐक्यासाठी गांधीजींच्या आधी त्यांनीच प्रयत्न केले.

### महात्मा गांधी व श्रद्धानंद

रेव्हरंड अँड्रूज हे स्वामी श्रद्धानंदांचे निस्सीम चहाते होते. त्यांनी स्वामीजी आणि महात्मा गांधी यांना एकत्र आणले. महात्माजींना आफ्रिकेमध्ये स्वामींनी व त्यांच्या गुरुकुल कांगडीच्या विद्यार्थ्यांनी आर्थिक मदत पाठविली. २१ ऑक्टोबर १९१४ ला महात्माजींनी श्रद्धानंदांना फोनिक्स नेटाळहून इंग्रजीत पहिले पत्र पाठविले. त्यात ते म्हणतात. 'प्रिय महात्माजी ! श्री. अँड्रूज यांनी आपल्या कामाची मला माहिती दिली. एखाद्या अपरिचित माणसास मी पत्र लिहीत आहे असे मला वाटत नाही. आपल्याला 'महात्मा' संबोधल्याबद्दल त्यामुळेच बिचकून जाऊ नका ! अँड्रूज आणि मी आपणाला नेहमी 'महात्मा' म्हणूनच संबोधितो. डॉ. रवींद्रनाथ टागोर व श्री. रुद्र आपल्या कार्याने किती प्रभावित आहेत हे अँड्रूज यांनी मला सांगि-तले आहे.'

पुणे येथून गांधीजींनी श्रद्धानंदांना लिहिलेल्या पत्रात म्हटले आहे की, 'आपल्या पायी मस्तक ठेवणे हे माझे मी कर्तव्य समजतो.' गुरुकुलमध्ये गांधीजी पहिल्यांदा गेले तेव्हा अक्षरश: त्यांच्या पायी त्यांनी माथा टेकला ! गांधीजींना गुरुकुल-कांगडीमध्येच स्वामी श्रद्धा-नंदांनी 'महात्मा' ही 'पदवी' दिली. नतर सर्वांनीच गांधीजींचा उल्लेख 'महात्मा' पदवीने केला. महात्माजी श्रद्धानंदांना नेहमी आपला मोठा भाऊ समजत राहिले. श्रद्धानंदानी अहमदाबादच्या आश्रमात येऊन आश्रम पवित्र करावा असे भावपूर्ण पत्रही महात्माजींनी लिहिलेले आहे.

अमृतसर आणि विरमगाव येथील अनुचित प्रकरांमुळे महात्मा-जींनी आंदोलन स्थगित केले त्या वेळी, तसेचबार्डोली प्रकरणात श्रद्धानंद व महात्माजी यांच्यात मतभेद झाले; पण दोघांचा परस्पर स्नेह कधीच कमी झाला नाही. अब्दुल रशिद नामक धर्मांध मुस्लिमाने स्वामी श्रद्धानंदांचा २३ डिसेम्बर १९२६ मध्ये पिस्तुल झाडून खून केला ! स्वामीजी आजारी असल्याने रुग्णशय्येवरच होते. हजारो लाखो रजपूत मलकाना मुस्लिमाची शुद्धी स्वामीजींनी केली होती. तसेच १९२६ मध्येच कराची येथील असगरीबेगम ही मुस्लीम महिला आपल्या दोन मुलांसह दिल्ली आर्यसमाजमंदिरात आली व हिंदुधर्मात आपल्याला घ्या असे म्हणू लागली. तिची शुध्दी करून व शांतिदेवी असे तिचे नाव ठेवून वैदिकधर्मात तिला घेण्यात आले. दिल्ली वनिता विश्राम आश्रममध्ये राहून तिने संस्कृत आणि हिंदीचा अभ्यास केला. तीन महिन्यांनंतर तिचे वडील मौलवी ताज मुहम्मद-खान तिचा शोध घेत दिल्लीला आले. तिचा पति अब्दुल हलीम हा पण त्यानंतर आला. शांतीदेवींना भेटून पुन्हा मुसलमान बनण्यास तिला त्यांनी सांगितले; पण 'विचारपूर्वक मी धर्मांतर केले आहे. पुन्हा मुस्लीम बनू इच्छित नाही; असे स्पष्टपणे तिने सांगितले.' त्यामुळे शांतिदेवी, स्वामी श्रध्दानंद, प्रा. इंद्र, डॉ. सुखदेव, देशबंधु, लाला गणपतराय आणि कराची आर्यसमाजाचे सेक्रेटरी यांच्या विरुद्ध कोर्टात दावा दाखल करण्यात आला. जूनमध्ये दाखल केलेल्या या दाव्याचा निकाल ४ डिसेंबर १९२६ ला लागून सर्व आरोपींची निर्दोष सुटका झाली ! त्यामुळे धर्मांध मुस्लिमानी चिडून श्रध्दानंदाचा खून कर-करण्याचा कट रचला. २६ डिसेंबरला अब्दुल रशीदने त्यांचा खून केला !

महात्मा गांधींनी 'रशीद, तूने यह क्या किया ?' असे म्हणून ६ जानेवारी १९२७ च्या यंग इंडियात विस्तृत लेख लिहिला. त्यात महात्माजींनी म्हटले आहे की, जे होईल असे वाटत होते तेच अखेर झाले ! साबरमती–आश्रमात सहा महिन्यांपूर्वी स्वामीजी आले असता त्यांना धमकीची पत्रे येत आहेत हे समजले होते. स्वामीजी एक सुधारक होते, वाक्‌शूर नव्हे-कार्य-शूर होते. वीरतेची ते साक्षात् मूर्ती होते. ते योध्दा होते. योध्दा रुग्णशय्येवर मरत नाही. लढा-ईच्या मैदानात तो कामाला येतो... त्याच्या मृत्यूमुळे मला शोक नाही. मला तर त्यांचा मत्सर (ईर्षा) वाटतो. त्यांचे शरीर गेले; पण ते जिवंतच आहेत. वीराप्रमाणे ते जगले व वीराप्रमाणे त्यांना मृत्यू आला !...

'ब्रिटनचे माजी पंतप्रधान रॅमसे मॅकडोनाल्ड यांनी गुरूकुल कांगडीला भेट दिली होती. ते अत्यंत प्रभावित झाले होते. १९१४ मध्ये इंग्लंडच्या 'डेली क्रॉनिकल 'मध्ये त्यानी स्वामीजीसंबंधी, तसेच गुरुकुल कांगडीसंबंधी आपल्या आठवणी हृदयस्पर्शी भाषेत लिहिल्या आहेत. या विस्तृत स्मरणगाथेतील एक विचार किती सुरेख आहे पहा ! ते म्हणतात, 'वर्तमानकाळात एखाद्या कलाकाराला जर प्रभु येशुख्रिस्ताची मूर्ती बनवायची असेल तर जिवंत मॉडेल म्हणून मी स्वामी श्रध्दानंदांकडे अंगुलिनिर्देश करीन ! मध्ययुगीन चित्रकारांला सेंट पिटरचे चित्र काढायचे असेल तर ही भव्य मूर्ती पहाण्यास मी सांगेन!'

पं. नेहरूंनी म्हटले आहे, 'स्वामीजी निर्भयतेची मूर्ती होते. त्यांची मूर्ती नेहमी डोळयांपुढे येते. त्यांना मी कसा विसरू शकेन ?'

ख्रिश्चनाप्रमाणे अनेक मुस्लीम लोक स्वामीजींचे चहाते व मित्र होते. डॉ. अन्सारी व हकीम अजमलखान हे त्यापैकीच. त्यांनी आपल्या व्यवहारात कधी धर्मभेद, जातिभेद पाळला नाही. दिल्लीच्या

जामा मशिदीमध्ये गैर-मुस्लीम व्यक्तीने उपदेश देण्याचा पहिला आणि बहुधा शेवटचा प्रसंग म्हणजे स्वामी श्रध्दानंदांचा १९५१ मधील कार्यक्रम ! १८८८ पासून कॉंग्रेसशी त्याचा संबंध होता. १८८४ पासून आर्यसमाजाचे ते नेते झाले. आपल्या मुलामुलीचे त्या-काळात त्यांनी आंतरजातीय विवाह केले. राजेन्द्रप्रसाद, मदन मोहन मालवीय, स्वातंत्र्यवीर सावरकर, पंडित नेहरू, सरदार पटेल आदींनी त्याच्या अस्पृश्योध्दार व समाजसुधारणेच्या कार्याची मुक्त-कंठाने प्रशंसा केली आहे.

'चारित्र्य-निर्माण' हीच खरी समस्या आहे. मनुष्य नैतिक व चारित्र्यवान बनला पाहिजे अशी श्रध्दानंदाची धारणा होती. सर्व मानवजातीबद्दल त्यांना आत्मीयता होती. गांधीजीच्या असहकार आंदोलनाचे नेते म्हणून त्यांनी अलौकिक कामगिरी बजावली आहे. केवळ राजकारणाने खरेखुरे समाजपरिवर्तन होऊ शकणार नाही या निष्कर्षावर प्रत्यक्ष अनुभवान्ती ते आले व शेवटचे दिवस त्यांनी केवळ समाजपरिवर्तनाच्या कार्याला वाहून घेतले. १९१९ च्या अमृतसर कॉंग्रेसचे ते स्वागताध्यक्ष होते. कॉंग्रेसमध्ये त्यांना फार मान होता. त्याच्या निधनानंतर कॉंग्रेसने गोहत्ती अधिवेशनात दुखवटयाचा ठराव करताना म्हटले आहे— 'भ्याड आणि विश्वास-घाती पध्दतीने स्वामीजीवर जो खुनी हल्ला झाला. त्याबद्दलही कॉंग्रेस रोष आणि तीव्र आक्रोश व्यक्त करते. पददलितांची, देशाची व धर्माची सेवा करणाऱ्या देशभक्त वीरपुरुषाच्या निधनाने झालेली हानी कधीही भरून येणार नाही !' □

श्यामचा संसार (कथा तेवीसावी)

फिरोज रानडे

# श्याम 'दुसरा' संसार थाटतो त्याची कथा !

श्यामने दुसरा संसार थाटल्याचे वाचून बहुतेक लोक 'आं?' असा प्रश्नार्थक व आश्चर्यात्मक उद्गार काढतील. आता त्यांच्या 'आं?' मागची कारणे वेगळी वेगळी असणे स्वाभाविकच नाही का ? 'ह्या धर्मेंद्रनं पहिली बायको जिवंत असताना दुसरी शादी केल्यापासून अगदी श्यामसारखे लोकही किती धारिष्टयवान झाले आहेत बघा !' असे 'आं?' म्हणणाऱ्यांचा एक गट म्हणेल. 'ह्याचे एवढे धाडस झाले तरी कसे ? येथे एका संसाराचा गाडा खेचता खेचता आमचे नाकी नव येतात,' असं बऱ्याच मोठया लोकाचा गट म्हणेल.

'काय ह्या स्त्रियांवर अन्याय !' असे म्हणणाऱ्या लोकांचा कोणता गट असेल ते वेगळे सांगायला नकोच. आता ह्या अन्यायाविरुद्ध दाद मागण्याकरता मोर्चा-अर्थात काळचा घोडधापर्यंत काढता येईल काय, याची ह्या गटात चर्चा होईल; पण मग श्याम हा येवढा मोठा महत्त्वाचा माणूस नाही व त्यामुळे मोर्चाला प्रसिद्धी मिळणार नाही, मग फेमिनामध्ये वगैरे फोटो येणे दूरच राहिले, हे कळल्यावर मोर्चाचा कार्यक्रम ठप्पा होईल. कारण स्त्रियावर अन्याय वगैरे ठीक आहे; पण तो कोणा महत्त्वाच्या माणसाने व महत्त्वाच्या माणसावर केल्याशिवाय त्या अन्यायाला महत्त्व येत नाही. निदान त्याकरता राधा हरिजन असायला पाहिजे होती. हरि-जन स्त्रीवर अन्याय व अत्याचार झाला तरच तो खरा अन्याय, अशी लोकांची आज-काल भावना बनत चालली आहे.

तसं पाहिलं तर दुसरा संसार ही गोष्ट हिंदू कोड येण्याआधीच्या महाराष्ट्राच्या सास्कृतिक व राजकीय जीवनाच्या इति-हासाला काही नवीन वा 'अनहोनेवाली' राहिली नाही. राजकीय जीवनात तर अगदी नामदार गोखल्यांपासून तो अलबत्या-गल-बत्या खामदारापर्यंत वा क्वचित आमदारणीं-पर्यंत कित्येकांनी जाहीररीत्या दुसरे संसार थाटले होते व थाटले आहेत.

साहित्याच्या क्षेत्रात तर काय, कित्येक दुसरे संसार माजले, गाजले व वाजले होते. त्या सर्वांची जंत्री देण्याचा हा काळही नाही व हे स्थळही नव्हे. नाहीपेक्षा, सध्याच्या लेखकांवर त्याचा अनिष्ट परिणाम व्हायचा !

'माजले' ह्याचा अर्थ माजलेल्या लोकांनी थाटलेले संसार, असा घ्यावयाचा नसून माजले ह्याचा अर्थ उदंड जहाले—बहुत जहाले, असा बाळबोध अर्थ घ्यावयाचा आहे. 'गाजले' ह्याचा अर्थ स्पष्ट आहे. तो म्हणजे ज्यांच्या दुसऱ्या संसाराबद्दल खूप गाजावाजा झाला वा त्या लोकांनी स्वतःच करून घेतला. ह्यातल्या बहुतेकांनी हे दुसरे संसार बुद्धीची भूक भागवण्याकरता केले होते. कोणी आणखी काही करण्याकरता असतील; पण संपूर्ण महाराष्ट्रात, अगदी मराठवाडा व विदर्भ धरूनसुद्धा, शारीरिक भूक भागवण्या-करता दुसरा संसार थाटणारा व तसे छाती-ठोकपणे सांगणारा हरीचा लाल कोणी निघाला नाही. आता ह्याचा महाराष्ट्राने, परत मराठवाडा व विदर्भ धरून, अभिमान बाळगावा की इतर काही वाटून घ्यावे, हा ज्याच्या त्याच्या श्रद्धेचा प्रश्न आहे.

काही दुसरे संसार वाजले ह्याचा अर्थ वाजले म्हणजे घडयाळात किती वाजले ह्यातला घ्यावयाचा नसून, त्याचे दिवाळे वाजले ह्यातला जो 'वाजले'चा अर्थ आहे तो घ्यावयाचा आहे. पहिला संसार सुखाचा झाला नाही म्हणजे वाजला, म्हणून दुसरा संसार थाटायचा; पण पहिल्यात जे घडले नाही ते दुसऱ्यात घडेल ह्या आशेने दुसरे लग्न करावयाचे म्हणजे कोणा एका गोष्टी-तल्या सरदारजीसारखे नाही का ? आता उदाहरण सरदाजीचेच असल्यामुळे अगदी विषयाला धरून नाही पण सांगायचा मुद्दा सिद्ध होण्यास मदत व्हावी म्हणून सांगतो.

एका सिनेमात एक बाई नदीतून आंघोळ करून 'तशीच' वर येत असते. तेवढयात एक आगगाडी धाडधाड करत जाते. ती आगगाडी जाईपर्यंत ही बाई निघून गेलेली असते. एक सरदारजी तो सिनेमा पहायला दररोज यावयाचा.

आता बाई आंघोळ करून बाहेर येत

असता समोरून आगगाडी जाते, असे दाखवणारा सिनेमा फार चांगला असण्याचे काही कारण नव्हते. कदाचित् ती बाई 'नव्या लाटे'च्या नदीत आंघोळ करत नसल्याने, तशी आंघोळ करून येत असलेली बाई दाखवण्याची त्या दिग्दर्शकाला वा त्या नटीला लाज वाटली असावी. ते काही का असेना, तो सिनेमा परत परत पहाण्याच्या लायकीचा नव्हता हे नक्की.

हा सरदारजी दररोज त्याच सिनेमाला येतो आहे हे बघून दाररक्षकाने त्याला एक दिवस मोठ्या उत्सुकतेने विचारले, की 'बुवा, तुम्हाला एवढा हा सिनेमा आवडला आहे की काय ? दररोज पहाताय ? बरं आवडला आहे असं म्हणावं तर ती आगगाडी गेल्यावर तुम्ही पण निघून जाता हे कसं काय?'

'कसला चांगला सिनेमा घेऊन बसला आहात बादशा हो ?ती कुडी आंघोळ करून वर येताच ती साली गाडी धाड धाड करत समोरून जाते. मग बघतो तो कुडी गायब ! मी मनाशी म्हणतो, एक दिवस तरी गाडी उशीरा येईल; पण दररोज गाडी आपली वेळेवर ! साली गाडी आहे की पैजामा ?'

तात्पर्य काय की एकच सिनेमा कितीही वेळा पाहिला तरी त्यात काही फरक पडत नाही, तद्वतच पहिल्या संसारात व दुसऱ्या संसारात तसा काही फरक पडत नाही. तसा काही फरक पडेल ह्या आशेने दुसरा संसार थाटणारे आपल्या सरदारजीसारखे भोळेच नाहीत काय ?

मग आपल्या श्यामने ह्या दुसऱ्या संसाराचा खटाटोप का करावा बरे, असा प्रश्न पडणे सहाजिकच आहे.

श्यामचा पहिला संसार सर्वसामान्य मध्यम वर्गातल्या माणसाचा, त्या वेळी जसा लग्न झाल्यापासून होत असे तसाच झाला होता. हे स्पष्ट करण्याचे कारण, त्या वेळी आजच्यासारख्या सिगारेटच्या जाहिराती व त्या जाहिरातीत सिगारेट पिणारी मॉडेलस् ही प्रकरणे बोकाळली नव्हती. ती प्रकरणे बोकाळली नव्हती म्हणून लग्न न करता एकदम संसार थाटण्याची पद्धतही बोकाळली नव्हती.

सर्वसामान्य मध्यमवर्गीय माणसाप्रमाणेच श्यामने आपल्या भावी बायकोबद्दल मुलायम चित्रे रंगवली होती. आपल्या भावी बायकोचे माप त्याने कालिदासाच्या शकुंतलेवरून व फडक्यांच्या कादंबऱ्यांतल्या विविध नायिकांवरून घेतले होते. म्हणजे त्याने कालिदासाचे 'शाकुंतलम्' वाचले होते असं नव्हे, तर त्याने शांतारामबापूंच्या 'पहिल्या' संसाराचा 'शकुंतला' सिनेमा पाहिला होता. फडक्यांच्या कादंबऱ्यांची तर त्याने अगणित वेळा पारायणे केली होती. त्यातली वर्णने आपल्या भावी पत्नीला उद्देशूनच आहेत असे त्याने वाटवून घेतले होते.

माडखोलकर नावाच्या कोणी तज्ज्ञ लेखकाने पण अशी काही रसभरित वर्णनेही केली असल्याचे त्याच्या कानावर आले होते; पण ते पडले विदर्भातले लेखक- त्यांची वर्णने म्हणजे त्या विभागातल्या तरुणींची असणार! आपल्याला त्याचा काय उपयोग ? असा व्यावहारिक विचार करून श्यामने माडखोलकरांची पुस्तके हातावेगळी केली होती.

आता फडक्यांच्या कादंबऱ्या वाचाव्यात की वाचू नयेत, असा संभ्रम पडण्याची परिस्थिती निर्माण झाली, त्या वेळी हिंदी सिनेमात मोठ्या प्रमाणात सुंदर व गोड नट्यांची आवक झाली. मधुबालाचे ओठ, गीताबालीचे डोळे, नर्गिसचा गोडपणा, सुरैय्याचे आणखी काही वा काहींच्या बाही त्याला चांगलीच सतावू लागली होती.

श्याम इंग्रजी सिनेमा फार कमी पहात असे. एकंदर त्यातले तोंडातल्या तोंडातले बोलणे त्याला समजत नसे. वर त्यातला प्रत्येक जण प्रत्येक जणीचा पापा घेत असल्याने त्यातली बहीण कोण व प्रेयसी कोण, हे त्याला सिनेमा संपेपर्यंत उमजत नसे. सगळ्यात मुख्य म्हणजे, त्यातल्या नट्यांबद्दल, आपल्या नट्यांबद्दल वाटते तशी आपुलकीही वाटत नसे.

मात्र मित्रमंडळीत बोलताना इंग्रजी सिनेमांच्या मानाने हिंदी सिनेमा म्हणजे अगदी पोरखेळ आहेत, असे आपले मत श्याम ठोकून देत असे; पण पोरखेळ असो व थोरखेळ असो, हिंदी सिनेमा बघितल्याशिवाय व त्यातली गाणी गुणगुणल्याशिवाय त्याला रहावतही नसे !

त्यामानाने मराठी सिनेमा म्हणजे 'भाकड' वाटत असत. एक तर ते आया-बहिणींच्या, आई-मुलांचे सात्त्विक प्रेम व त्याकरता करावा लागणाऱ्या त्यागावर आधारलेले असत. त्यातून मराठी सिनेमातले नायक-नायिका म्हणजे हिंदी सिनेमातल्या मुख्य नायक-नायिकांच्या बहीण-भावांची कामे करणारी मंडळी! ती बघण्यात काय हशील? नाही म्हणायला शांतारामबापूंच्या रामभाऊ जोशींनी व संध्याबाईंच्या लटपट चालण्याने त्याला खूप दिलासा दिला होता.

पुढे राजाभाऊ, गदिमा व पंडित फडक्यांच्या नाजुक व साजुक सिनेमांनी, श्यामच्या लग्नाबाबतच्या व बायकोबाबतच्या कल्पना, टी. व्ही., टेप रेकॉर्डर, रेडियोच्या निर्मिती करणाऱ्या विविध कंपन्यांच्या विक्री-पत्रकातल्या रंगीत चित्राप्रमाणे गुलजार करून टाकल्या होत्या. 'टाकल्या होत्या' हे भूतकाळवाचक क्रियापद का वापरले आहे हे जे वाचक ही कथा शेवटपर्यंत वाचतील त्याना ओघाओघाने कळेलच.

श्यामला नोकरी लागताच तो एका फटक्यात बाप्याचा 'मुलगा' झाला व त्याच्या आवडी – निवडीबद्दल व अपेक्षेबद्दल मोठ्या कौतुकाने बोलले जाऊ लागले. ज्या श्यामला नोकरीबद्दल काही आवडीनिवडी नव्हत्या वा अपेक्षा नव्हत्या, त्या बाबतीत लवकरात लवकर ही वृत्ती ठेवावी लागत असल्याकारणाने, 'मुली'च्या बाबतच्या त्याच्या आवडीनिवडी वा उपेक्षा उफाळून येणे सहाजिकच होते.

सर्वसामान्य मराठी 'मुला' प्रमाणे त्याची अपेक्षेची यादी चांगली लांबडी होती; पण नवरा मार्केटला जाताना जशी बायकोने दिलेली सामान आणण्याची यादी कितीही लांबडी असली, तरी फक्त एक-दोनच वस्तू आणतो व बाकीच्या विसरतो, तसेच श्यामच्या अपेक्षेच्या यादीचे झाले होते.

अपेक्षायादीचा पहिला बिंदू म्हणजे 'पॉइंट' मुलगी सुंदर पाहिजे हा होता. ह्या बिंदूबद्दल दुमत होण्याचे कारण नसल्याने त्यावर ऊहापोह करण्याची गरज नाही. दुसरा बिंदू मुलगी शिकलेली पाहिजे, हा होता. त्याचे कारण शिकलेली बायको मुलांना चांगले वळण लावेल हा नव्हता. शिक्षणाचाव चांगल्या वळणाचा काय संबंध ? शिकलेली अशा माफक बाबी करता की, वेळ पडल्यास तिला नोकरी करता यावी. अर्थात ही अपेक्षा श्यामच्या लग्नाच्या वेळची. आता तर काय नोकरी असणारी रेडि-मेड मुलगीच बघतात !

तिसरा पॉइंट,मुलीचे घराणे उत्तम असावे तिची काही लफडी तर नसावीतच पण तिच्या-बद्दल अफवाही नसाव्यात. आता मुलगी सुंदर असली, शिकलेली असली तर तिचा चार लोकांशी संबंध येणारच. तेव्हा अफवांना काय तोटा ? व मजा अशी की, महाराष्ट्रात पुढारी म्हटला म्हणजे पैसे खाणारा, अब्राह्मण पुढारी म्हणजे जातीयवादी व मुसलमान पुढारी म्हणजे पाकिस्तानधार्जिणा ह्यावर जसा लोकांचा चटकन विश्वास बसतो तसाच सुरेख मुलीच्या लफडे असण्याबाबतच्या अफवावर बसतो.

येथे सर्वच्या सर्व अपेक्षांची यादी देण्याचे कारण नाही. वर दिलेला शितावरून श्यामच्या अपेक्षा – भाताची कल्पना यावी. काही दिवसांनी श्याम माफक अपेक्षेवर आला. मुलगी माफक सुंदर असावी. शक्य असल्यास तिचे कोणा तरी सिने-नटीशी माफकसे साम्य असावे, ती माफक शिकलेली असावी व आईचे समाधान होईल इतका माफक हुंडा देणारी असावी.

पण काय गंमत पहा. अशी माफक अपेक्षापूर्ती करणारी मुलगी मिळणेही श्यामला अवघड होऊन बसले. बाजारांतल्या सर्व सुंदर मुली – अगदी माफक सुंदर सुद्धा-जणू काय काळचा बाजारात गडप झाल्या. नाही म्हणायला काही बऱ्या मुली सांस्कृतिक – कार्यक्रमांना वगैरे दिसत; पण त्या फक्त पहाण्याकरता, window-shopping करता होत्या. त्या पहाण्याकरता होत्या 'बघण्या' करता नसत. मग ह्या सांस्कृतिक कार्यक्रमांना येणाऱ्या सुंदर मुली कोणाला सांगून जात असतील बरे ? असा श्यामला नेहमी प्रश्न पडे.

कधीकधी बाजारात वगैरे गुलाबासारखी सुंदर मुलगी दिसे; पण त्या गुलाबाबरोबर नवऱ्यांचा काटाही असे. ह्या साल्याना अशा सुंदर बायका मिळतात कुठे ? कधीकधी एखादी सुंदर मुलगी एकटी दिसे, नाही असे नाही; पण जरा जास्त निरखून पाहिल्यावर तिच्या गळयात मंगळसूत्र दिसे. अशा वेळी त्याच्या मनात मंगळसूत्राबद्दल अतिशय अमंगळ विचार येत.

मराठी समाजात सुंदर तर सोडाच, पण माफक दिसणाऱ्या मुलीची इतकी वानवा असावी ना ? बायकांनी बुरखा घालावा ही कल्पना मराठी मुलीना बघून तर आली नसेल ना ? रामदासस्वामी सावधान म्हणताच लग्नमंडपातून पळाले; तर त्याचे लग्न काय कोणा मराठी मुलीशी ठरले होते काय ?

पण शेवटी योग ! बलवत्तर योगायोगाने श्यामचे लग्न जमले. मराठीच नव्हेत, तर कोणत्याही भाषेतली जोडपी पाहिवीत तर त्यातली ९९ टक्के फक्त योगायोगाच्या बळावरच झाली आहेत हे कुणालाही पटावे.

श्यामने पहिल्या संसाराचा धसका घेतला तो एका अगदी कोमल प्रसंगात. लग्न झाले त्या वेळी तो कलकत्त्याला होता. लग्नानंतर दोन – चार दिवस गावी राहून तो राधाला घेऊन कलकत्त्याला गेला. श्यामच्या वेळी हनीमूनची पद्धत एवढी बोकाळली नव्हती. त्याकरता मुद्दाम माथेरान वा महाबळेश्वराला जाण्याची पण टूम नव्हती.

त्याचा पहिला धसका, जीवन न काव्य, जीवन व हिंदी सिनेमाच काय, पण जीवन व मराठी सिनेमाचाही, आपसात काही संबंध नाही, हे ज्ञान त्याला, भगवान बुद्धाला जसे बोधी वृक्षाखाली झाले, तसे लिंबाच्या झाडाखाली झाले, त्या वेळी.

कलकत्त्याला श्यामच्या घराजवळच रवींद्र-सरोवराचा नयनरम्य परिसर होता. एका संध्याकाळी श्याम व राधा फिरावयास गेले व एका लिंबाच्या झाडाखाली आडोशाला बसले. तेथे बसल्या–बसल्या त्याला एका अतिशय लोकप्रिय झालेल्या सिनेमातले अतिशय लोकप्रिय झालेले गाणे आठवले. ते गुणगुणले असता वातावरणनिर्मितीत भर पडेल ह्या हेतूने त्याने गुणगुणावयास सुरुवात केली, डोळयात वाच माझ्या तू गीत भावनांचे..."

आता पुष्कळ वेळा चकणा नसणाऱ्या माणसाचा डोळाही एकदम दामूअण्णा होतो. कदाचित् श्यामचा त्या वेळी तसा 'अण्णा' झाला असेल, राधाने तरी जे काय वाचता येईल ते वाचावे की नाही ! पण ती आता मुलगी राहिली नव्हती. बायको झाली होती. श्याम परत 'डोळयांत वाच माझ्या' गुणगुणला व योग्य त्या प्रतिसादाकरता राधाकडे पाहू लागला. राधा त्याला हळूच विचारती झाली, 'कोणत्या डोळयातले वाचू ? डाव्या की उजव्या ?'

श्यामचा दुसरा धसका म्हणजे 'मुली-मुलीत' फरक असला तरी 'बायका-बायका'त काहीही फरक नसतो, हे ज्ञान त्याला झाले त्या वेळी. स्वतःच्या लग्नानंतर त्याला सगळयांच्या बायका साधारण सारख्याच दिसू लागल्या. मग कशाला आपण एवढा जीव पाखडला की मुलगी अशीच पाहिजे व तशीच पाहिजे म्हणून ! मराठी 'बायका' सुद्धा त्याला वाटले होते तितक्या दिसायला वाईट नव्हत्या.

आता लफड्याविषयी- वा त्याबद्दलच्या अफवाविषयी म्हणाल तर 'मुली' पेक्षा 'बायकां'चीं लफडी फार असतात व त्याबद्दल नुसत्या अफवा नसतात तर ती खरोखरीची लफडी असतात, हेही त्याच्या लक्षात आले.

तिसरा धसका. साधारणपणे संसार हा दोन चाकांचा रथ आहे अथवा बैलगाडी आहे वगैरे म्हटले जाते व दोन्ही चाके तुल्यबल असली की तो रथ वा गाडी सुरळीतपणे चालते असे म्हटले जाते. हे सर्व खोटे आहे याची जाणीव श्यामला झाली. संसार हा रथासारखा नसून जपानमधल्या टोकिओतल्या एकचाकी म्हणजे MONORAIL सारखा आहे व हे चाक म्हणजे बायको व आपल्या घरात राधा !

जपानमधली ही एकचाकी गाडी कधी कलंडत नाही व पाहिजे त्या वेगाने चालते व पाहिजे तेथे व तेव्हा सुरू होते व थांबते. त्याप्रमाणे संसाररूपी गाडी बायकोरूपी एक चक्रावर धावते, चालते व मनात येईल त्या वेळी थांबते जपानची गाडी हे जगातले आश्चर्य मानले जाते; पण बायकोरूपी आश्चर्य घरोघर असल्यामुळे त्याचे कौतुक वा आश्चर्य जगाला वाटत नाही.

मग अशा धसके खाल्लेल्या माणसाने दुसरा संसार थाटण्याच्या भानगडीत का पडावे ? खरं तर श्यामसारख्या माणसानं दुधानं तोंड पोळल्यावर ताकच काय पण नीरासुद्धा फुंकून फुंकून प्यायला पाहिजे.

श्यामच्या कचेरीतल्या सहकाऱ्यांच्या भाषेत श्यामचा लग्गा लागला होता. तो परदेशाला काही वर्षांकरता जाणार होता. मुलांच्या शिक्षणाची आबाळ होईल म्हणून राधा मुबईलाच रहाणार होती व श्याम एकटाच जाणार होता व मर्यादित अर्थाने 'दुसरा' संसार थाटणार होता. श्यामलाही

मनातून थोडे मोकळे मोकळे वाटत होते. थोडे मनमोकळे वागता येईल, प्रत्येक वेळी राधाला विचारून व परवानगी घेऊन काही करण्याचे प्रयोजन रहाणार नाही. जपानी गाडी नवरारूपी एक्या चाकावर चालू शकते हे सिद्ध करता येईल वगैरे वगैरे.

श्याम ज्या देशात गेला होता त्या देशाच्या सरकारने त्याच्याकरता कोच, पलंग, कपड्यांची कपाटे, गॅसरेंज एवढेच नव्हे तर अगदी गॅस सिलेंडर ह्यांनी सज्ज असा गाळा तयार ठेवला होता. आता फक्त स्वयंपाक करण्याची आयुधे व साहित्य आणायाचे होते व ते काही श्यायला अवघड नव्हते.

राधा मुलांकरता-मुलांसाठी नव्हे-माहेरी जात असे त्या वेळीच श्यामने 'सखी शेजारणी'कडून स्वयंपाकशास्त्र शिकून घेतले होते. शेजारीण तशी वस्ताद होती. तिने श्यामला डाळ कशी शिजवायची हे जरी शिकविले तरी त्याची डाळ शिजू दिली नाही; (पण ते प्रकरण परत कधी तरी थोडक्यात) म्हणजे श्यामने बाजारात जाऊन फक्त हे द्या, ते द्या करत सर्व सामान विकत घेण्याचे बाकी होते. चुटकीसरशी ते काम होणार होते.

पण चुटकी वाजवणे वाटले होते तितके सोपे नव्हते हे श्यामच्या लक्षात आले. खरेदीकरता दुकानात गेल्यावर त्याची वाचाच बंद झाल्यासारखी झाली. अर्धांगवायू झालेल्या माणसाला वायू झालेला हात वा पाय जसा हुलवता येत नाही तशी श्यामची जीभ चालेनाशी झाली व निर्णय घेण्याचे त्याचे यंत्रच चालेना! चमचे किती घ्यावेत? दोन घेतले आणि राधा म्हणाली की, 'काय दोनच घेतलेत?' बरं, सहा घ्यावेत आणि राधा 'एवढे काय करायचे होते?' म्हणाली तर? पोळपाट-लाटणे घ्यावयाचे तर ते लाकडी घ्यावे की प्लास्टिकचे? साधे लाकडी घेतले तर राधा म्हणेल, 'हे काय परदेशात जाऊन साधे लाकडी?' प्लास्टिकचे चांगले तीस रुपयांना होते ते घेतले असते तर राधाने ते लाटणेच पाठीत घातले असते! मोठा चमचा घेतला तर मग पळीची गरज राहील का? असे अगणित प्रश्न त्याला पडले व त्यांची उत्तरे त्याला सापडेनात. कायम राधा आपली हॅम्लेटच्या नाटकातल्या भुतासारखी!

'ह्याला 'दुसरा' संसार कशाला म्हणायचे? साधे दोन चमचे घेऊ की सहा, हे ठरवता येत नाही आणि चालले होते एकचाकावरची जपानी गाडी चालवायला! श्याम मनाशी म्हणाला व काहीही खरेदी न करता घरी परत आला!

येता येता त्याच्या मनाशी विचार आला जे लोक खरोखरीचा दुसरा संसार करत असतील, ते दुसऱ्या बायकोशी वागताना तिच्याशी कसे वागले असता पहिली ओरडणार नाही, ह्याचा विचार करत असतील का? □

पुस्तके

# साम्यवादी देशातील फेरफटका

## माहितीपर प्रवासवर्णन

'साम्यवादी देशांतील फेरफटका' हे श्री. ज. द. जोगळेकर यांचे प्रवासवर्णनपर पुस्तक आहे. ह्या पुस्तकाच्या नावावर नजर ठेवून ते वाचले तर काहीसा अपेक्षाभंगच होतो! कारण साम्यवादी देशांचे सविस्तर आणि प्रभावी दर्शन या प्रवासवर्णनातून होऊ शकत नाही. एकशेबावीस पृष्ठांच्या ह्या पुस्तकात फक्त पहिल्या बावन्न पृष्ठांमध्ये सहा साम्यवादी देशांच्या एकवीस दिवसांच्या सफरीचा वृत्तांत दिलेला आहे. म्हणजे, ह्या पुस्तकाचा निम्म्याहून अधिक भाग पुस्तकाच्या नावाशी संबंधित नाही! बरं, ही गफलत जरा नजरेआड करून प्रवासवर्णन म्हणून ह्या पुस्तकाची दखल घ्यावी, तरी त्या दृष्टीनेही ते फारसे यशस्वी म्हणता येणार नाही.

ह्या छोटेखानी पुस्तकात ज्या प्रवासाचे वर्णन आहे त्या प्रवासाचा मार्ग असा होता—सोफिया (बल्गेरिया), बेलग्रेड (युगोस्लाव्हिया), बुखारेस्ट (रोमनिया), बुडापेस्ट (हंगेरी), वॉर्सा (पोलंड), प्राग (झेकोस्लोव्हाकिया), झुरिच (स्विट्झर्लंड), लंडन (इंग्लंड), डब्लिन (आयर्लंड), लिस्बन (पोर्तुगाल), माद्रिद नि बार्सिलोना (स्पेन), रोम नि फ्लॉरेन्स (इटली), अथेन्स (ग्रीस)—मुंबई. अन्य तीन व्यक्तींबरोबर लेखकाने केलेल्या ह्या प्रवासातील पहिले सहा देश साम्यवादी आहेत. साम्यवादी देशांच्या बंद दरवाजांच्या आत डोकावण्याची उत्सुकता वाचकांना असणे स्वाभाविक आहे. साम्यवादी देशांतले जीवन असते तरी कसे, याचे काहीसे दर्शन पहिल्या बावन्न पृष्ठामध्ये होते. त्या दृष्टीने काही वर्णने येथे देत आहे.

(१) बल्गेरिया — 'साम्यवादी देशांसंबंधी आपल्या काही कल्पना असतात; पण आम्हाला पोलिसांची वर्दळ दिसलीच नाही. बहुतेक घरांसमोर मोटारी होत्या. त्यावरून मध्यम नि वरचा वर्ग सुखवस्तू झाल्याचे दिसत होते. लोकांचे कपडेही छानछोकीचे होते. आम्ही रहात होतो ते घर मध्यम वस्तीतले होते आणि दादरच्या हिंदू कॉलनीची चटकन आठवण यावी असा भोवतालचा आसमंत होता.' (पृ. ६) 'साम्यवादी राजवटीत व्यक्तिस्वातंत्र्याचा संकोच होतो हे जरी खरे असले तरी त्या राजवटीचे सर्वसामान्य माणसाला काही फायदेही निश्चित मिळतात. तसे फायदे बल्गेरियन जनतेला मिळाले आहेत. शिक्षण विनाशुल्क असून वय वर्षे ७ ते १६ पर्यंत ते सक्तीचे आहे. वैद्यकीय सेवाही विनामूल्य आहे. कल्याणकारी राज्य असल्याने निवृत्तिवेतन, आजारपणातील वेतन, कुटुंबभत्ता वगैरे बल्गेरियन नागरिकाला मिळतात... बल्गेरियन लोक ईस्टर्न ऑर्थोडॉक्स चर्च मानतात. देशात धार्मिक स्वातंत्र्य आहे. मात्र या स्वातंत्र्याचा उपयोग शासनाविरुद्ध करण्यास मनाई आहे. सांप्रदायिक शाळा (थिऑलॉजिकल सेमिनरीज) चालवण्यास चर्चला परवानगी आहे. मात्र त्याला इतर शाळा चालविता येत नाहीत. चर्चला लाग-

णाऱ्या वार्षिक खर्चातील सतरा टक्के खर्च शासनाकडून मिळतो. तसेच त्यांच्या अधिकाऱ्यांच्या नेमणुकांना शासनाची मंजुरी लागते.' (पृ. ७) 'मी तिला (गाईडला) विचारले, 'इस्लामी धार्मिक शाळांना आर्थिक मदत मिळते का?' 'आमचा देश ख्रिश्चन आहे,' माझ्या नजरेला तटस्थ नजर देत ती मला म्हणाली.' (पृ. ८). 'वाटेत मोटरी नि ट्रक लागले. तसेच थोड्या घोड्याच्या गाड्या, गाढवांचे कळपही लागले. बल्गेरियन जीवनात वाहन म्हणून या प्राण्यांना अजून स्थान आहे यावरून यांत्रिकीकरणाच्या टप्प्याची आपण कल्पना करू शकतो.' (पृ. १०-११) 'आमचा गाईड म्हणाला, 'ही प्राचीन धार्मिक वास्तू आपण पाहिलीत, आपल्याला संतोष झाला असेल असे मला वाटते. हल्ली देशात धर्मविरोधी प्रचार होत आहे; पण अनेकांना असे वाटते की, स्वतःपुरता एखादा तरी संप्रदाय असावा.' (पृ. १२)

(२) युगोस्लाव्हिया – 'या देशात जरी साम्यवादी शासन असले तरी ह्यू सेटन वॅट्सन आपल्या 'नेशन्स अँड स्टेट्स्' या ग्रंथात लिहितात की, तिथे राष्ट्रीय तणाव पुन्हा जागृत झाले आहेत.' (पृ. १५) 'भुयारी मार्गात दोन याचक बायका नि एक तंतुवाद्य वाजवणारा याचक मला दिसले. तसेच बुटपॉलिशवालाही आढळला. क्वचित दिसणारी गोष्ट प्रथम लक्ष वेधून घेते इतकेच तिचे महत्त्व!' (पृ. १६) 'सामान्य कामगाराला वेतन चांगले मिळते; पण सर्व देशांत जो प्रश्न आहे तोच येथे आहे. वस्तूंच्या किमती वाढत, नव्हे भडकत आहेत. आणि तो तक्रारीचा विषय आहे. शेतकरी दहा हेक्टरपर्यंत व्यक्तिगत मालकीची शेती ठेवू शकतो. तसेच कोणत्याही नागरिकाला स्वतःच्या नि कुटुंबाच्या उपयोगासाठी खाजगी मालकीचे घर ठेवता येते. प्राथमिक शिक्षण मोफत असून सक्तीचे आहे. उच्च शिक्षणासाठी अनेक सोयी उपलब्ध आहेत. याशिवाय कल्याणकारी राज्यात असणाऱ्या वैद्यकीय व इतर सुविधाही युगोस्लाव्ह नागरिकाला युगोस्लाव्हियात किती स्वातंत्र्य आहे हे सांगताना गाईड म्हणाली की, आमच्या सीमा सात देशांना भिडतात नि त्या पूर्ण मोकळ्या आहेत. (पृ. १६)'

(३) रोमेनिया: 'पर्यटनाच्या तिकिटासाठी आपल्याला डॉलर्स भरावे लागतात. यावरून डॉलर्सच्या मागणीची कल्पना करता येते, पण तेवढ्याने जर समाधान झाले नाही तर रस्त्यावर उभे राहावे. झक्क कपडघातला तरुण तुमच्या अंगावरून जाताना डॉलर्स मोडावयाचे आहेत का अशी पृच्छा करील. त्याच्याकडून घेतलेत तर स्थानिक चलन जास्त मिळते; पण असे करणे गुन्हा आहे.' (पृ. २१) 'साम्यवादी शासन आल्यापासून सर्वसामान्य माणसाच्या जीवनात परिवर्तन झाले आहे. येथेही शिक्षण विनामूल्य नि सक्तीचे आहे. तसेच वैद्यकीय सुविधा मुबलक नि विनाशुल्क मिळतात. अन्न नि सार्वजनिक वाहतूक स्वस्त आहे. शेती जवळजवळ सामुदायिक झाली आहे. तरी शेतकऱ्याला स्वतःच्या मालकीचा भूमीचा छोटा तुकडा ठेवता येतो. चर्चला स्वायत्तता असून धर्मगुरू तयार करण्यासाठी ते स्वतः सांप्रदायिक शाळा चालवते. चर्चचा खर्च नि धर्मगुरूंचे पगार शासनातर्फे होतात. रोमेनिया नि रशिया यांच्या संबंधांत थोडा तणाव आहे. येथे रशियाचे अंधानुकरण होत नाही किंवा सतत समर्थन होत नाही.' (पृ. २२)

(४) हंगेरी: 'येथील महत्त्वाच्या धंद्यांचे राष्ट्रीयीकरण झाले आहे. शेती प्रामुख्याने सामुदायिक किंवा सरकारी तत्त्वावर चालली असली तरी शेतकऱ्यास स्वतःच्या मालकीचा शेतीचा छोटा तुकडा ठेवता येतो. वैद्यकीय सेवा विनामूल्य आहे. मात्र दारुबाज नि उगाच गर्भपात करणाऱ्यांना ती मिळत नाही. निवृत्तिवेतन, आजारीपणातील आर्थिक साहाय्य नागरिकाला मिळते. शिक्षण सक्तीचे व विनाशुल्क आहे. सरकारी शाळांबरोबरच आठ कॅथॉलिक शाळा आहेत. त्यांतही विद्यार्थी जातात. वीस सांप्रदायिक पंथांना मान्यता असून सर्वांना थोडे-बहुत आर्थिक साहाय्य शासनाकडून मिळते. मुले असणाऱ्यांना किंवा होऊ देऊ असे अभिवचन देणाऱ्या तरुण कुटुंबाला घरासाठी आर्थिक साहाय्य प्रथम मिळते.' (पृ. २९)

(५) पोलंड: '... टॅक्सीवाला येईना. तेव्हा डॉक्टरने ग्रँड हॉटेलच्या द्वारपालाला टॅक्सी बोलावण्यास सांगितले. त्याने त्याच टॅक्सीवाल्याला बोलविले. त्यांची शाब्दाशाब्दी झाली; पण साम्यवादी राज्यातला द्वारपाल राज्यपालाच्या लायकीचा असतो. आता त्यांचे रागाचे बोलणे संपून थोडे हसत संभाषण झाले. त्यावरून मी तर्क केला की, द्वारपाल म्हणाला, 'कितीही पैसे घे; पण यांना तुला न्यावे लागेल!' कदाचित ते चूक असेल; पण टॅक्सीवाल्याने हॉटेलपाशी आणून सोडल्यावर मागितलेले पैसे अवाच्या सव्वा होते.' (पृ. २५) 'पोलिश लोकांचा राष्ट्रीय अभिमान काही विलक्षणच आहे. म्हणूनच स्टॅलिन एकदा म्हणाला होता, 'साम्यवाद पोलिश लोकांना मानवणार नाही. ते लोक फारच व्यक्तिनिष्ठ नि राष्ट्रवादी आहेत.' (पृ.३६) 'देशात भूमिवाटप झाले असून १९·२ दशलक्ष हेक्टर भूमीपैकी १५·२ दशलक्ष हेक्टर भूमी व्यक्तिगत मालकीच्या क्षेत्रात आहे. बाकीची भूमी सहकारी नि सामुदायिक क्षेत्रात आहे. सात ते पंधरा वर्षांपर्यंत शिक्षण सक्तीचे नि विनामूल्य आहे. मारिआने सांगितले त्यावरून वैद्यकीय सोयी विपुल नि विनाशुल्क आहेत. ८० टक्के लोक चर्चमध्ये जातात. ल्युब्लिनला चर्चची युनिव्हर्सिटी आहे. शिवाय इतर सांप्रदायिक शाळा आहेत. या सर्वांत मुलांना धार्मिक शिक्षण मिळते.' (पृ. ३८).

(६) झेकोस्लोव्हाकिया: 'उद्योगाचे राष्ट्रीयीकरण झालेले आहे. सामुदायिक किंवा सहकारी क्षेत्रात शेतीचा अंतर्भाव झालेला असला तरी शेतकऱ्याला स्वतःसाठी भूमीचा तुकडा ठेवता येतो. सहा ते पंधरा वर्षांपर्यंत शिक्षण विनाशुल्क असून गणित, झेक, स्लोव्हाक नि रशियन भाषा यांकडे विशेष लक्ष पुरविण्यात येते. शारीरिक शिक्षणावर अधिक भर असतो. या देशातल्या शारीरिक कवायतीची जगभर ख्याती आहे. वैद्यकीय साहाय्य विनामूल्य उपलब्ध आहे. चर्चचे नियंत्रण करण्यासाठी शासनाचा एक स्वतंत्र विभाग आहे आणि धर्मगुरूंचा पगार शासनाकडून मिळतो...पूर्व युरोपातील देशांत झेकोस्लोव्हाकिया सर्वदृष्ट्या अधिक प्रगत समजला जातो. त्या समाजाची सांस्कृतिक पातळी फार वरच्या श्रेणीची आहे... लोकांना संगीत नि नृत्य यांचा विशेष शोक आहे...साम्यवादी राजवटीमुळे या हौशीकडे लोकांनी पाठ फिरवलेली दिसत नाही.' (पृ. ४५) '...सर्वजण तटस्थपणे या तपासणीचक्रातून गेले नि पुन्हा उभे राहिले.

माञ एक अपवाद दिसला. एका व्यक्तीची पासपोर्ट-तपासणी ती रांगेत उभी नसताना झाली. अर्थात साम्यवादी झाला तरी अधिकारी तो अधिकारीच!' (पृ. ५३).

अशा प्रकारच्या वर्णनांमधून लेखक आपल्याला साम्यवादी देशांतील जीवनाचे ओझरते दर्शन घडवतो. साम्यवादी राजवट म्हटल्यावर राष्ट्रीयीकरण, सामुदायिक मालकी, तरीही काही प्रमाणात खाजगी मालकी, मोफत व सक्तीचे शिक्षण आणि लोककल्याणाच्या अन्य तरतुदी यांविषयीची ढोबळ माहिती ही सुजाण वाचकाला असतेच. हे पुस्तक वाचताना त्याच गोष्टी पुन्हा लक्षात येतात. तसेच साम्यवादी देशातही कधीकधी लबाडी किंवा भ्रष्टाचार कसा चालतो याचीही एखादी झलक पाहायला मिळते. धर्म ही अफूची गोळी मानणाऱ्या साम्यवाद्यांना धर्मसंस्थेचे अस्तित्व मान्य करावे लागले आहे, हेही दिसून येते. मात्र धर्माचे फाजील स्तोम तेथे नसते. कारण धर्मसंस्थेवर राज्यसंस्थेचे नियंत्रण असल्याचे दिसते. तेव्हा मर्यादित अर्थाने साम्यवादी देशांच्या जीवनावर लेखकाने प्रकाश टाकला आहे. तसेच त्याने ज्या इतर युरोपीय देशांमध्ये प्रवास केला, तेथील जीवनाचेही काहीएक दर्शन तो घडवतो.

### चौफेर व्यासंग

हे दर्शन घडवत असताना जागोजागी लेखकाने इतिहासाचे दाखले दिलेले आहेत, 'लेखक इतिहासाचा अभ्यासक असल्याने त्याने जे टिपले आहे ते हौशी पर्यटकाच्या वर्णनासारखे निःसंदर्भ नाही,' असे जे पुस्तकाच्या मलपृष्ठावर म्हटलेले आहे, त्यात निश्चितच तथ्य आहे. लेखकाचा इतिहासाचा व्यासंग आणि त्याच्या आधारे त्याने आपल्या वर्णनांना दिलेली ऐतिहासिक संदर्भाची जोड ही ह्या पुस्तकाची एक जमेची बाजू आहे. लेखकाच्या चौफेर वाचनामुळे कधीकधी पुस्तकाची वाचनीयता वाढायला मदत झालेली आहे. उदा. रोमेनियातील प्रवासाचे वर्णन करताना साम्यवादी रोमेनिया आधी कसा होता हे स्पष्ट करण्यासाठी लेखक गंथर यानी सांगितलेल्या विनोदाचा उल्लेख करतो. त्या काळातील सामाजिक जीवनाची भ्रष्टता दाखविणारा तो विनोद असा— 'Mania means madness, Kleptomania means 'madness to steal and Romania means madness to steal applied to an entire naton.' (पृ. २२) अर्थात् इतिहासविषयक वाचन आणि लेखनाची सवय असल्यामुळेच की काय, लेखकाचे प्रवासवर्णन माहितीपर होते आणि लालित्य मात्र हरवून बसते! त्या त्या देशाचा इतिहास किंवा तेथे पाहिलेल्या गोष्टीविषयीचे (विशेषतः म्युझियम्स आणि चर्चेस) यादीवजा तपशील लेखक सांगतो; पण प्रवासवर्णनामध्ये जे आकर्षक लालित्य आवश्यक असते, त्याचा मात्र येथे काहीसा अभाव आहे. प्रवासवर्णनात निव्वळ वस्तू आणि वास्तूचे तपशील सांगून भागत नाही, तर प्रवासात भेटलेल्या व्यक्तींचे आणि आलेल्या अनुभवांचे रसीले दर्शनही घडवावे लागते. येथे लेखक फारसा यशस्वी होऊ शकत नाही. लेखकाबरोबर प्रवास करणाऱ्या व्यक्तीचे जिथे तो 'डॉ. सौ. जोगळेकर' (किंवा फारच तर 'डॉक्टर'!), डॉ. सौ. देशमुख, डॉ. आनंदराव देशमुख असे औपचारिक भाषेतले उल्लेख करतो आणि त्यांची व्यक्तिमत्त्वे वाचकाला पूर्ण अज्ञात ठेवतो, तेथे प्रवासात भेटलेल्या इतर व्यक्तींचे तो कसले दर्शन घडणार! याला एखादाच अपवाद आहे. उदा. लंडनमधला ड्रायव्हर. त्याच्याबाबतचे हे दोन उल्लेख पाहा— 'ड्रायव्हरचे नाव निक्सन होते. स्वतःची ओळख करून देतान तो म्हणाला, 'मी इंग्लिश नाही. तसेच अमेरिकेचा पूर्वाध्यक्ष निक्सन माझा नातलग नाही. मी स्कॉच आहे. इंग्लिश लोकांना त्यांच्या देशातल्या रस्त्यांवर वाहने नीट चालविता येत नसल्याने हे काम आम्ही करतो.' (पृ. ६४) 'आता आम्ही लंडनकडे निघालो. आज तीन-चार कॅथिड्रल पाहिल्याने मला निक्सनने सांगितलेल्या विनोदाचे स्मरण झाले. एका प्रवाशाची दैनंदिनी बसमध्ये एका ड्रायव्हरला मिळाली. उघड्या पानावर त्याला पुढील शब्द आढळले—' Saw A. B. C.' डायरी परत करताना डायरीवाल्याला ड्रायव्हर म्हणाला, ' माफ करा. पान उघडे असल्याने माझे लक्ष गेले त्यावर Saw A. B. C. एवढेच शब्द आहेत. त्यांचा अर्थ काय?' तो प्रवासी हसत म्हणाला, 'यात गूढ काही नाही. त्याचा अर्थ: Saw another bloody cathedral!' (पृ. ७१) — अर्थात् असे उल्लेख पुस्तकात अगदी अपवादात्मक आहेत! ते जर जास्त असते तर या ढोबळ प्रवासवर्णनाला जिवंतपणा आला असता. लालित्याच्या अभावात भर टाकणारी आणखी एक गोष्ट म्हणजे लेखकाची 'शुद्ध' मराठी भाषा! खरं तर अशा शुद्ध भाषेबद्दल एरवी आक्षेप घेण्यासारखे काही नाही; पण प्रवासवर्णनात जेव्हा ह्या 'शुद्ध' भाषेचा अतिरेक होतो तेव्हा तिला औपचारिकपणा आणि बोजडपणा आल्यावाचून राहात नाही! भिकाऱ्याला जेव्हा 'याचक' म्हटले जाते, तेव्हा हे उदात्तीकरण कसेसेच वाटते! विनाशुल्क, द्वारपाल, पादचारी पथ, स्थानक, थांबा, आसने, भोजन, याचक असे शब्द वापरणारा लेखक हॉस्पिटल, कॅन्टीन, डॉक्टर, ड्रायव्हर हे शब्दही वापरतो; तेव्हा त्याने जरा बोली भाषेच्या वा संमिश्र भाषेचा आणखी वापर केला असता तर ते वाचकाला मुळीच खटकले नसते! उलट अशा भाषेने प्रवासवर्णन अधिक जिवंत झाले असते.

तेव्हा, हे प्रवासवर्णन माहितीपर आहे; पण ही विविध देशाची ढोबळ माहिती आहे. ज्या माणसांनी हे देश बनलेले आहेत, त्या माणसांचे चेहरे मात्र ह्या प्रवासवर्णनात हरवून गेलेले आहेत! प्रवासवर्णनाला दिलेले नावही फारसे समर्पक नाही. ह्या प्रवासवर्णनाच्या शेवटी लेखक म्हणतो, 'आमची सफर संपली होती. विमानातून बाहेर येत असताना माझ्या मनश्चक्षूंसमोर सोफियातील उंच इमारतीचा स्वच्छ प्रकाशातला लाल तारा आला' (पृ. १२२.) हा लाल तारा वाचकाच्या मनात मात्र रेंगाळत रहात नाही.

—राजा दीक्षित

साम्यवादी देशांतील फेरफटका
ले. ज. द. जोगळेकर
राष्ट्रविचार साहित्य प्रकाशन
पृष्ठे — १२२, मूल्य — १८ रु.

रंगभूमी

# कशात काय अन् लफड्यात पाय

लेखक मुकुंद टाकसाळयांनी आपल्या टाकाच्या टाकसाळीतून पाडलेले फार्सचे दुसरे नाणे म्हणजे पंचम वेद संस्थेने सादर केलेले 'कशात काय अन् लफड्यात पाय'. टाकसाळयांच्या आधीच्या नाटकाच्या चालीवर-कोसळे आज इथे देव्हारा अर्थात मेलो, मेलो, मेलो ड्रामा-या चालीवर या नाटकाचे नावही 'कशात काय अन् लफड्यात पाय', अर्थात 'कोटी कोटी कोटयांचे कोट कोट लढवू' असे ठेवता येईल.

मुंबईतील एका चाळीत समोरासमोर राहणारे दोघेजण. एक-गोविंद गोडबोले ऊर्फ गोगो (मंगेश कुलकर्णी) हा शामळू कॉलेज-विद्यार्थी. दुसरे एक चांवट लफडेबाज मास्तर (जनार्दन परब). गोगोच्या जोडीला राजा (लक्ष्मीकांत बेर्डे) हा त्याचा इरसाल मित्र. एका संध्याकाळी मास्तरांनी मोलकरणीकरवी घरी बोलावलेले एक माषुक, गोगोसाठी राजाने बोलावलेली फटाकडी लैला, राजाची सांगलीहून पळून आलेली बहीण सुलभा आणि गोगोच्या वडिलांनी-नानांनी गावाहून आणलेली एक तमासगिरीण या चार बायका एकत्र येऊन टपकतात. या सगळयांनी एक हवालदार (दिलीप प्रभावळकर) आणि एक इन्स्पेक्टर (प्रकाश बुद्धिसागर) याना जोडीला घेऊन घातलेला गोंधळ आणि सरतेशेवटी गोगो आणि सुलभाचे झालेले गोड शुभमंगल, हे 'कशात काय'चे कथानक. या कथानकामध्ये वेगाने घडणाऱ्या घटनांच्या आधारे पुष्कळ प्रसंगनिष्ठ विनोद दाखवता येणे शक्य असतानाही लेखक मुकुंद टाकसाळयांनी कोटीबाजपणाच्या अतिरेचकाने-आपलं, अतिरेकाने, 'नाटक नको; पण कोटया आवर!' अशी प्रेक्षकांची दयनीय अवस्था बनवून टाकली आहे. कोणताही शब्द तडाख्यात सापडला की, त्याच्यावर उभ्या-आडव्या कोलांटया मारून, तिरक्यातिडक्या कसरती करून, कधी त्या शब्दाला उलटा-पालटा करून, कधी त्याच्या फटाफट मुस्कुटात मारून, त्याला फोडून काढून त्याच्यातून वेगवेगळे कोटयर्थ (द्वंद्व समास-कोटी आणि अर्थ) उपसून, उपटून प्रसंगी उकळून आणि पिळून काढण्याचा सुरवातीपासून पार सपाटा चालवला आहे. उदाहरणार्थ-आत्या या एका शब्दातून चार आत्या-अत्याचार, आत्यांमुळे झालेला-अत्यानंद, आत्या-आत या असे अनेक विनोद धडाधड गोफणीतून धोंडे सोडल्याप्रमाणे सोडले आहेत. गोविंद गोडबोलेचे एकदा गो गो केल्यानंतर गो गो म्हणजे 'जा जा' पासून सुरू होऊन वाढवत वाढवत 'आईचा घो' पर्यन्त जाऊन गाडी थांबते. अशा या फुटकळ कोटीबाजपणाच्या बाजारबुणग्या गर्दीत मग कधीकधी 'गुलाब आत्या, चमेली आत्या आणि आता झेंडू आत्या-तुझे आजोबा काय माळी होते का काय, ही आत्यांची फुलबाग फुलवायला?' असे बरे विनोद पार लपून जातात आणि 'त्यांना फक्त एकच छंद-माणिकचंद.' असे शब्द जोडनावे चढाओढ चालू राहतात. मुख्यत: या प्रकारामुळे हा फार्स रंगत जाण्याऐवजी कंटाळवाणा होत जातो. अर्थात फक्त या कोटीबाजीनेच संपूर्ण संहिता भरलेली आहे, असे नाही. राजा या पात्रातून सध्याच्या 'ब्रूस ली' लाटेची केलेली उत्तम टवाळी, नाटकातील मेलोड्रामाची अथवा फिल्मी प्रेमाची केलेली झकास टिंगल असे चमकदार भागही संहितेत आहेत. शिवाय समोरासमोर असलेल्या खोल्यांच्या दारावरील पाटीमुळे झालेले घोळ, पुरुषाने वेषांतर करून स्त्री बनून येणे इत्यादी फार्समधील हमखास यशस्वी युक्त्याही वापरल्या आहेतच.

संहितेमध्ये थोडी-फार जान आणून संपूर्ण नाटकाला एक टेंपो ठेवण्यात मुख्य वाटा आहे दिग्दर्शक दिलीप कोल्हटकर यांचा आणि अन्य कलाकारांचा. फार्स या प्रकाराची नस ओळखून तो शेवटपर्यन्त कायम ठेवणं हे कौशल्य फार थोडया दिग्दर्शकांना जमतं. नुकतंच येऊन गेलेला 'पोत्यातून गोत्यात' हे अशा न जमलेल्या भट्टीचं एक उदाहरण. 'कशात काय' मध्ये मात्र दिलीप कोल्हटकरानी (शेवटची सुमारे पंचवीस मिनिटे वगळता) ही फार्सची नस बरोबर ओळखली आहे. प्रत्येक पात्राने दार वाजवण्यासाठी प्रत्यक्ष थापेचा अथवा टकटकीचा उपयोग न करता तोडाने 'थाप थाप' किंवा 'टक टक' किंवा 'दन दन' असे म्हणणे, गोगोने 'मना रे' म्हणत मनाची आळवणी करुन त्याला शक्ति देण्यासाठी विनवले की होणारी दिव्यांची उघडझाप, संध्याकाळी साडेसात वाजले म्हणताच वाजणारे टी. व्ही. वरील साडेसातच्या बातम्यांचे संगीत अशा कित्येक जागा सांगता येतील. दिलीप कोल्हटकरांना अन्य कलाकारानीही ही भट्टी सुसह्य करण्यासाठी उत्तम साथ दिली आहे. (लैला, इन्स्पेक्टर असे काही सन्मान्य अपवाद वगळता.) अभिनयाच्या बाबतीत एक विशेष जाणवलेली गोष्ट म्हणजे, हवालदार झालेल्या दिलीप प्रभावळकरांचा आपली 'चिमण प्रतिमा' धुऊन काढण्यासाठी चाललेला प्रयत्न. फक्त सरतेशेवटी बाई बनून आल्यावर त्यांचा चिमण पुन्हा डोके वर काढतोच. गोगो झालेल्या मंगेश कुलकर्णीनेही 'बन्याबापू' मधील बन्या म्हणजे मोहन गोखले जसाच्या तसा उचलला आहे.

या नाटकाला संगीत मेलडी मेकर्सचे आहे. एखाद्या समूहाने संगीत देण्याचा प्रकार बहुधा मराठी रंगभूमीवरील हा पहिलाच प्रकार असावा. नाटकाच्या एकूण टेंपोशी संगीत सुसंगत आहेच, शिवाय 'तीन पैशांचा तमाशा'-च्या संगीताची चिमणी पाडणारे 'कशात काय' हे गीत, आधी उल्लेख केलेला साडेसातच्या बातम्यांपूर्वीचा संगीताचा तुकडा इत्यादी जागाही छान उचललेल्या आहेत. फक्त इतरांच्या संगीताचे प्रतिबिंब कार्यक्रमातून उमटविण्याचं काम थोडं दूर सारून स्वत: काही तरी करण्याच्या दृष्टीने मेलडी मेकर्सने टाकलेले हे पाऊल कौतुकास्पद आहे.

नाटकाचं नेपथ्य आणि प्रकाशयोजना बाबा पार्सेकराच्या नावावर जमा आहे म्हटल्यानंतर त्यातील व्यावसायिक सराईतपणाचा निराळा उल्लेख करायला नको.

नाटकाला थोडी संकलनाची आच लावून त्यातील कोटयाचं पाणी जर उडवून लावलं तर एक चांगला करमणूकप्रधान फार्स सादर केल्याचं श्रेय पंचम वेदला मिळू शकेल.

—सदानंद बोरसे

# ' आक्रीत ' – कुठून, कुणीकडे, कुणावर ?

विनया खडपेकर

' माणूस 'च्या २९ ऑगस्टच्या अंकात विनया खडपेकर यांनी ' आक्रीत ' या चित्रपटावर अभिप्राय लिहिला होता. या ठिकाणी त्याच चित्रपटावर मुंबईत झालेली गरमागरम चर्चा त्या कथन करत आहेत.

गुरुवार दि.१० सप्टेंबर१९८१. मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय. दादर प्रभात चित्रमंडळातर्फे ' आक्रीत ' या चित्रपटावर आज या ठिकाणी चर्चा आयोजित करण्यात आली होती. श्री. वसंत साठे सभेचे अध्यक्ष होते. 'माधुरी'च्या चित्रपटसमीक्षक रेखा देशपांडे, 'दिनांक'मधे अधूनमधून चित्रपटावर लिहिणारे श्री. राजीव नाईक, प्रा. मोहिनी वर्दे आणि नाटक–चित्रपटाचा इंग्लंडमध्ये जाऊन अभ्यास केलेले सुपरिचित समीक्षक श्री. ज्ञानेश्वर नाडकर्णी हे या चर्चेत भाग घेत होते. 'आक्रीत' चित्रपटाचे दिग्दर्शक श्री. अमोल पालेकर हेही आवर्जून उपस्थित होते. वक्त्यांनी आपल्या भाषणातून उपस्थित केलेल्या प्रश्नांना श्री. अमोल पालेकर यांनी शेवटी उत्तरेही दिली.

कार्यक्रम ठरलेल्या वेळी म्हणजे संध्याकाळी बरोबर साडेसहा वाजता सुरू झाला. श्री. दिनकर गांगल यांनी वक्त्यांची ओळख करून देण्याचं प्रास्ताविक थोडक्यात आवरल्यावर अध्यक्षांनी कार्यक्रमाला सुरुवात केली.

प्रथम बोलल्या रेखा देशपांडे. आपल्या भाषणात त्या म्हणाल्या, ' मी हा चित्रपट दोनदा पाहिला. सर्वप्रथम ' प्रेस शो 'मध्ये पाहिला. मिनी थिएटर खच्चून भरलं होतं. आम्ही काही प्रसंगांना अगदी दाद दिली होती. नंतर पुन्हा ' कोहीनूर ' मध्ये हा चित्रपट पाहिला. थिएटर रिकामं होतं. जे काही मूठभर लोक होते त्यांनी अगदी मख्खपणे चित्रपट पाहिला. आम्ही जेथे जेथे दाद दिली होती, तेथे तेथे मी अगदी कान टवकारले; पण ऑडिअन्स मख्ख होता ! चित्रपट रिलीज होण्याआधी मी अमोल पालेकरांची एक मुलाखत घेतली होती. तेव्हा ते म्हणाले होते, ' मानवत खून–प्रकरणावरचा हा चित्रपट नाही. पारधी या मागासलेल्या जातीतल्या शोषित स्त्रीचं चित्र आहे. प्रत्यक्षात चित्रपट पाहिला तेव्हा मला असं वाटलं की, हे मुगुटराव या गावातल्या वजनदार माणसाचं चित्र आहे. हे शोषित ' स्त्री 'चं चित्र नाही. पारधी जमातीचं चित्रही यात नाही. यात समूहदर्शन नाही. गावकऱ्यांची घबराहट दिसली नाही. हे एका गावाचं चित्र वाटलंच नाही ! मुगुटरावाला शिक्षा होते त्या प्रसंगानंतरच्या दृश्यात एक जख्खड म्हातारी मट्कन बसलेली दिसली. ती कशासाठी ? या वेळी बहुतेक अमोल पालेकरामधला चित्रकार जागा झाला असं वाटतं. मुगुटरावामध्ये मिडल–क्लास भाबरटपणा आहे. ' खून करा ' असं तो स्पष्ट शब्दात कुठे कमिट करीत नाही. तो नेहमी कुंपणावर बसणारा माणूस आहे. असा माणूस गावातला वजनदार माणूस नसता तरी या प्रकरणातून सुटलाच असता. मुगुटराव रुहीकडे जाऊन काहीच करीत नाही. त्याची तिच्याशी ' फिजिकल ' किंवा ' इमोशनल इनव्हॉल्व्हमेंट ' दिसत नाही. शिवाय दुसरी एक नर्स त्याचे खेळणे आहेच. मग रुहीकडे तो जातो कशाला ? अमोल पालेकरांनी बेडसीन्स बरेच घेतले आहेत. सूचकतेने खरे म्हणजे चालून गेले असते. ' राधिकेचा रंग पाहुनी ' हे पार्श्वगाणे, अमोल पालेकर आणि रेखा सबनीस यांच्या चेहऱ्यावरची एक्सप्रेशन ' सगळे काही ' सांगण्यास पुरेसे होते. तरी बेडसीनचा मोह का ? ' प्रेसपार्टी 'च्या सीनमध्ये पत्रकारांची खिल्ली उडवायची आहे. ही प्रेसपार्टी फिल्म जर्नालिस्टची वाटली. एक पत्रकार वेगळा दाखवला. तो एकदम गंभीर कशासाठी ? गावकरी चिडून पारध्यांची वस्ती जाळतात हा सीन उंच जायला हवा होता; पण तो जात नाही. पोलीस म्हणतात, वस्ती जाळली हे आम्हाला कोणी सांगितलंच नाही ! म्हणजे पोलिसांना वर्दी द्यायला आणखी एक पत्रकार हवा होता. पोलीस म्हणजे एकंदर काही तरी विनोदी वाटलं. ' जुलूस 'सारखं नाटक बसवणाऱ्या अमोल पालेकरांनी समूहाचा विचार केलाच नाही. मुगुटरावाच्या वाड्याचं अंगण फार रिकामं वाटतं. शेवटी अरुण जोगळेकर एकदम प्रेक्षकांशी बोलतात तेही खटकतं. चित्रपटाचा फॉर्म तसा नाही. हा नाटकांचा सूत्रधारकीपणा वाटतो. मुगुटराव सुटणार हे अरुण जोगळेकरांनी सांगितल्यावर वाटतं, सिनेमा संपला ! तर नंतर पुन्हा मुगुटराव म्हणतो, ' आम्ही सुटणारच !' याची आवश्यकता होती का ? त्याऐवजी दुसरं काही म्हणजे गावचं जीवन नेहमीसारखं सुरू किंवा मुगुटराव नर्सकडे जातो असं दाखवलं असतं तर चाललं असतं. मुगुटराव आले नाहीत, म्हणून चौकशी करायला रुही मुगुटरावाच्या वाड्याच्या दाराशी येते तो प्रसंग फार सुंदर झाला आहे. संगीत सुंदर आहे. गाण्याचे ट्रॅडीशनल शब्द, ट्रॅडीशनल चाली छान आहेत. एकंदर वाटतं, अमोल पालेकर आणखी चांगले कलादिग्दर्शक म्हणून जाणवायला हवे होते.'

यानंतर बोलणारे श्री. राजीव नाईक म्हणाले, ' आक्रीत ' हा अ-बाजारू चित्रपट आहे. चित्रपट पाहून मी चित्रपटगृहातून कोरडा बाहेर पडलो. मी चित्रपटाला रिॲक्टच झालो नाही. ही एक कहाणी वाटली. व्यक्तीची कहाणी की गावाची कहाणी ? कुठल्या तऱ्हेने चित्रपट बघावा हेच कळलं नाही. मूलभूत समस्याच इथे व्याख्याबद्ध झालेली नाही. मातृत्वाची भावना, वांझपण यांचं विश्लेषण नाही. पारधी आणि इतर गाव यांचा संघर्षही नाही. मग वाटलं, या चित्रपटात काही म्हणायचं नसेलच. फक्त दाखवायचं

असेल ! गंभीर भारतीय चित्रपट वास्तववादाच्या चौकटीत काढले जातात. उदाहरणार्थ, सत्यजित रे यांचा 'पथेर पांचाली.' पथेर पाचाली काढताना सत्यजित रे यांच्या डोळ्यांसमोर इटालियन वास्तववादी चित्रपट होता. इथं तसा वास्तववाद धड नाही– मग मला वाटलं, सादर करणाऱ्यांना अन्वयार्थ गवसला नाही, म्हणून माझ्यापर्यंत तो पोहोचलाच नाही. मुगुटराव व रूही याखेरीज कोणतीच व्यक्तिचित्रं या चित्रपटात नाहीत. मुगुटरावाची दिनचर्या, रात्रिचर्या दाखवली तरी मुगुटराव कळला नाही. मुगुटरावाचं डॉक्टरशी नातं काय, इतर गावकऱ्यांशी नातं काय ते कळत नाही. तेंडुलकर कहाणीसारखी आधी व्यक्तिचित्रं स्थापतात, नंतर घटना सांगतात. सुरुवातीला खूप वेळ काही घडतच नाही, असं वाटतं. मुगुटरावाचा ताण त्याच्या चेहऱ्यावरून कळत नाही. एकंदर अभिनय म्हणजे नक्कल वाटते. राणी सबनीस, रेखा सबनीस, दिलीप कुळकर्णी यांच्या अभिनयात महत्प्रयास वाटत नव्हते. सहज अभिनय होता. हिंदी सिनेमातल्या पोलिसाचं विडंबन बाळ कर्व्यांच्याबाबतीत वाटलं. ही अभिनयाची शैलीच चुकीची वाटते. एक जख्खड म्हातारी, अगदी गावातलीच बहुतेक असावी, दाखविल्यामुळे बाकीच्यांचं 'नटपण' आणखीच वेगडीपणानं जाणवतं. शेवटी अरुण जोगळेकर प्रेक्षकांशी बोलतात. त्याने काही विशेष परिणाम साधला नाही. विशेष परिणाम साधला असता तर असं बोलायला हरकत नव्हती. रूही अस्वस्थ असताना पाणी काढते, वगैरे गोष्टी अभिनयाची ही 'एक्सप्रेशनिस्ट' शैली 'इनइफेक्टिव' वाटते. गाव तरी नीट उभं रहातं का ? जेव्हा बरंच काही आवडतं तेव्हा एखाद्या न आवडलेल्या, न कळलेल्या गोष्टीचं कारण शोधावंसं वाटतं. इथे माझ्यापर्यंत काही पोचलंच नाही. मधेच एकदा मुलगा का मारला जातो ? कळत नाही. मी बऱ्याच जणांना याबद्दल विचारलं तेव्हा कळलं, एकसारख्या मुलीच मारल्या जातात याचा काही संशय येऊ नये म्हणून मधे मुलगा मारला ! मुगुटराव फरकॅप घालून बैलगाडीतून जातो वगैरेसारख्या फ्लॅश बॅकचं प्रयोजन कळत नाही. उलट काही ठिकाणी प्रयोजन फार स्पष्ट कळतं. दोन-तीन पोरं घेऊन लेकुरवाळी मौनी येते ती रूहीचं वाझपण आणि लेकुरवाळेपण ह्या 'कॉन्ट्रास्ट' दाखवण्यासाठी, हे तावडतोब कळतं. 'अलख निरंजन' ओरडणाऱ्या साधूचा सीन रंगमंचावर फार छान दिसला असता; पण चित्रपटात दिसत नाही. बेडसीनचा एक ठराविक ॲंगल होता.

'मी माझ्या पद्धतीने विचार केला. चित्रपटाबद्दल अपेक्षा खूप होत्या. त्या पुऱ्या झाल्या नाहीत. चित्रपट पोकळ वाटला.'

प्रा. मोहिनी वर्दे आपल्या भाषणात म्हणाल्या, 'चित्रपट मला आवडला; पण त्याने मला अस्वस्थ केलं नाही किंवा झपाटून टाकलं नाही. वातावरण आवडलं. स्थल-कालाचा एकसमयावच्छेदे करून होणारा परिणाम म्हणजे मी वातावरण म्हणते ते वातावरण या चित्रपटात आहे. संगीत परिणामकारक आहे. सुरुवातीलाच संगीतामुळे मुगुटराव भिडला. पार्श्वध्वनीही चांगले होते. त्यातून प्रसंगानुरूप भय वगैरेची जाणीव होत होती. 'बिछान्यावरचो दृश्यं' अमोल पालेकरानी औचित्याने दाखविली आहेत. 'आक्रीत 'मधे बेडसीन हव्यासाने आलेले नाहीत, त्यातून पात्राच्या भावना उद्दीपित होतात हे कळते; पण प्रेक्षकांच्या भावना उद्दीपित होत नाहीत. 'चक्र' या चित्रपटातले बेडसीन खटकतात. बटबटीत वाटतात. कथेचं मानवत–प्रकरणाशी साम्य तावडतोब लक्षात येतं. कथेमध्ये खून ज्या तऱ्हेने होतात ते बीभत्स आहे; पण ज्या सूचकतेने ते दाखवले आहेत ती सूचकता वाखाणण्याजोगी आहे. वास्तविक खून बघायला माणसाला आवडतं. ती माणसाच्या मनातली सुप्त इच्छा असू शकते. करंदीकर तर म्हणतात, मी मनात खूप खून पाडतो. आपण प्रत्यक्षात फार भेकड असतो. या सुप्त इच्छेचा फायदा चित्रपटात उठवला गेला नाही. चित्रपटात रंग अतिशय सुंदर टिपले गेले आहेत. रूहीच्या पातळाचे रंग योग्य आणि सुंदर आहेत. त्यात शरीर हेच तिच्या उपजीविकेचं साधन आहे, हे कळतं. नर्सची पातळं वेगळ्या प्रकारची आहेत. रूहीसारखी नाहीत. मुगुटराव आणि रूही यांचे फ्लॅश बॅक घाईने उरकले आहेत; पण त्याचं प्रयोजन उघड आहे. त्यात चाल निबर जीवनाच्या आधीचं नाजूक जीवन दिसतं. रूही मुगुटरावासाठी आपल्या जातीचा रोष पत्करते, त्यातून तिच्या जीवनातला संघर्ष कळतो. मुलगा का मारला जातो, हे मलाही कोडं वाटलंच होते. तसे अनेक छोटे सीन वाया जातात. 'कॅरेक्टर्स' व्हायला पाहिजेत तेवढी विकसित झाली नाहीत. फक्त रूहीची कॅरेक्टर विकसित वाटली. चित्रपट अस्वस्थ का करीत नाही ? अरुण साधूनी रिपोर्टाज पद्धतीची कादंबरी, चित्रपट आणले. 'आक्रीत' हा चित्रपटही रिपोर्टाज वाटतो. या चित्रपटात अनेक सूत्रं आहेत. (१) पोलिसांची असमर्थता (२) खुनाचा शोध (३) मुगुटरावाची दंडेली (४) अंधश्रद्धा (५) अशिक्षित, वांझ स्त्रीच्या वेदनेचं कुरूप फलित–

यामुळं नेमकं मोटिव्हेशन काय ? निर्मात्याच्या मनात गोंधळ आहे. एक सूत्र हवं. कलाकृती आणि रिपोर्टाजमध्ये फरक आहे. कलाकृतीला एक सूत्र लागतं, ते रिपोर्टाजला लागत नाही. रिपोर्टाज बऱ्याच गोष्टी असलेला एक तुकडा तुमच्यापुढे देतो. म्हणून चित्रपटात एक सूत्र हवं होतं, बातम्यांचे वर्तमानपत्री मथळे जरी एकसारखे मधूनमधून आले असते तरी बरं झालं असतं. नाही तरी मानवत आमच्या अंगावर बातम्यांतूनच आलं ! सूत्रांचं संतुलन होत नाही. अनुया पालेकर यांची वाणी स्वच्छ नाही, रेकॉर्डिंगचा दोष असेल; पण नाटकातही मला त्याची वाणी खटकली होती.

तर अशा एकंदरीत कारणांमुळे चित्रपट आवडला, तरी त्याने झपाटून टाकलं नाही.'

श्री. ज्ञानेश्वर नाडकर्णी आपल्या भाषणात म्हणाले, 'आक्रीत' या चित्रपटात कोणतीही तडजोड नाही. व्यावसायिक काळजी न करता हा चित्रपट काढला आहे, मानवत-प्रकरण मला जास्त माहीत नाही. मी वर्तमानपत्र वाचत नाही, हे चांगलं नाही; पण नाही वाचत. एकदा एकाने मला 'मानवत 'वरचं इंग्लिश पुस्तक वाचायला दिलं; पण माझ्यातल्या शिक्षकानं त्यातलं इंग्लिश बधितलं. ते जाऊ दे. 'आक्रीत 'मधला मुगुटराव मला कलात्मक वाटतो. सगळ्या घटना कलात्मक वाटतात' मुगुटराव हा शोषक आहे का, वगैरे प्रश्न 'डायरेक्टिकल क्रिटिक' करील. मला ते जमत नाही. म्हणून मी 'मेटाफिजिकल क्रिटिसिझम' करतो. कथेतील हत्याकांड भयंकर आहे. या वेळी 'नंदाचा कान्हा' हे गीत गायलं जातं. हेच गीत सुरुवातीलाही आहे. या गाण्यातून मुगुटराव आणि कृष्ण यांच्यात विरोध

तोल साधला आहे. हे गीत म्हणजे थोडे–फार शब्द बदललेली जुनी गवळण आहे. शब्द का बदलले गेले ते माहिती नाही. शय्यासोबतीच्या दृश्यांचा वक्त्यांनी उल्लेख केला: मला ती दृश्यं आवश्यक वाटतात. मुगुटरावाचं बायकोवरचं शय्यासोबतीचं दृश्य बघितलं तर काय वाटतं ? बायकोचं चिपाड झालं आहे. तिचा चेहरा अलिप्त आहे. हा जबरी शृंगार घृणास्पद वाटतो. मी याचं एक जादा इंटरप्रिटेशन सांगतो, शाक्तपंथी बळी देतात. शाक्तपंथीयांमध्ये प्रेताशी शृंगार करण्याची अघोरी रीत आहे, या गोष्टीची येथे आठवण होते. हा या चित्रपटाचा गाभा आहे, असं मला वाटतं. हे सहज झालं आहे किंवा नाही, ते मला माहिती नाही. 'थर्ड मॅन' या इंग्लिश चित्रपटात विद्वानांनी बरीच प्रतीकं शोधली. दिग्दर्शक म्हणाला, 'मला असं काही म्हणायचं नव्हतं.' 'आक्रीत' चित्रपटाचा दोष म्हणजे सरधोपट शैली. या चित्रपटात एक मोटाज आहे. डॉक्टर रूहीला सांगतात, 'तुला मूल होणार नाही' तो प्रसंग; पण तो सरधोपट वाटतो. रूहीच्या घराजवळ पिंपळाचं झाड आहे, त्याचं स्थान स्पष्ट होत नाही. ते झाड अंधश्रद्धेचं प्रतिक म्हणून दाखवता आलं असतं– तसं ते दाखवलं नाही. ते पिंपळाचं झाड आणि मुगुटराव यात साधर्म्य आहे. एका दृश्याबद्दल मला अगदी आता सुचलं, ते सांगतो. मुगुटराव आधी दारू पितो. नंतर सोडा वेगळा पितो. दारू पिण्याची अशी पद्धत नाही; पण यावरून मुगुटराव कळतो. प्रत्येक बाबतीत 'He has his own ways !' रूही–मुगुटराव फ्लॅशबॅक चांगला घेतला गेला नसेल; पण त्यांचं चालू निबर जीवन दिसल्यावर पूर्वी त्यांच्यामध्ये नाजूक काही होतं हे कळायला हवं एवढ्यासाठी तो येतो. रूहीचं घर मुगुटरावाचं घर, हेच इतकं छान आहे की, मला बाकीच्या खेड्याची आठवण राहिली नाही. हैदरअली हा पोलीस कोबडी खाऊन बोट चाटतो, याला एक अर्थ आहे. हे प्रतीक दाखवलं आहे. मध्यमवर्गीय पात्रं म्हणजे पत्रकार जेव्हा येतात तेव्हा वास्तव वातावरणाला तडा जातो. या पत्रकारांमध्ये कमलाकर नाडकर्णी, वि. भा. देशपांडे ही ओळखीची मंडळी बघितल्यावर मला वाटलं मला का घेतलं नाही ? तर एकंदर चित्रपट मला आवडला."

ही चारही भाषणं एकंदर चांगली वाटली. चित्रपटासंबंधी बरा–वाईट कसाही पण स्वतःचा विचार करून वक्ते बोलायला उभे राहिले होते एवढे निश्चित. वास्तविक यात विशेष असे काही नाही. व्यासपीठावर बोलायला उभं रहाताना विचार करून, अभ्यास करूनच उभं रहायचं असतं; पण ही गोष्ट हल्ली खरोखर दुर्मिळ झाली आहे. गेल्या वर्षीच्या नाट्यसंमेलनातल्या परिसंवादात बरीच बडी सुप्रसिद्ध मंडळी बोलली. रंगभूमी लेखकाची की दिग्दर्शकाची, प्रायोगिक रंगभूमी वगैरे विषयावरचे परिसंवाद ऐकले. तेव्हा मुद्द्याला धरून बोलायचंच नाही, असं अगदी वक्त्यांनी ठरवल्यासारखं वाटलं. त्यात मग नाव न घेता वैयक्तिक उखाळ्यापाखाळ्या काढणंही चाललं होतंच. तरीही पुष्कळ भाषणांचा विषय पाहून ऐकायला जावं तर लिहून घ्यावं, नीट बातमी किंवा इतिवृत्त ( report ) तयार करावं असं त्यात काही आढळतच नाही. त्या तुलनेनं 'आक्रीत' वरील चर्चा खूपच रंगली. शेवटी अमोल पालेकराचं भाषण संपलं तेव्हा रात्रीचे साडेनऊ वाजले होते; पण साडेसहा ते साडेनऊ सभागृह अगदी खच्चून भरलेलं होतं.

सर्व वक्त्यांची भाषणं झाल्यावर श्री. अमोल पालेकर बोलायला उभे राहिले. ते म्हणाले, 'खरं म्हणजे स्वतःच्या कलाकृतीवर बोलू नये. कारण जे काही करायचं असतं ते करून झालेलं असतं. एका कलाकृतीत जास्त अडकलं तर दुसरीकडे वळता येत नाही. मी शक्य तितकं मांडलेल्या प्रश्नांना धरून बोलतो.

"रेखा देशपांड्यांनी चित्रपटाला दाद दिल्याचं सांगितलं–थिएटर रिकामं राहिल्याचंही सांगितलं. त्या म्हणत होत्या, माझ्या चित्रपटाला फॉर्म नाही. त्यांच्या भाषणालाही फॉर्म नाही. चित्रपट वाईट कसा कसा वाटला ते त्यांनी सांगितलं. दाद कुठे दिली ते त्यांनी सांगितलंच नाही. चित्रपट मानवतवर आधारित नाही. असं मी मुलाखतीत सांगितल्याचंही त्या म्हणाल्या. पण मी पुढे आणखी काय सांगितलं, हे त्या विसरलेल्या दिसतात. मी म्हटलं होतं, मला मानवतच्या नुसत्या घटना दाखवायच्या नाहीत. हा चित्रपट म्हणजे मानवत–हत्याकांड, असं त्याचं स्वरूप नाही. मी त्याचा वेगळ्या अंगाने शोध घेतो आहे. मला 'सस्पेन्स–फिल्म' बनवायची नव्हती. तशी मी बनवलेलीही नाही. बेडसीनबद्दल बरंच बोललं गेलं. बेड सीन्सची गरज काय ? मी असं विचारतो, बेडरूम सीनशिवाय मुगुटरावाचा बाहेरख्यालीपणा रेखा देशपांड्यांना कुठे दिसला ? प्रत्येक बेडसीनमध्ये त्या बाईची व्यक्तिरेखा आणि मुगुटरावाचा स्वभाव दाखवायचा होता. बेडसीनशिवाय ते दाखवता आलं नसतं. बेडसीन काढून टाकले असते तर मुगुटरावाच्या स्वभावाचे कंगोरे दिसले नसते, असं मी ठामपणे म्हणतो. पत्रकारांची खिल्ली उडवलेली खूप जणांना विशेषतः पत्रकारांना खटकली आहे. मला बरं वाटले. पॉलीटीशीयनची खिल्ली उडवली तर ती पत्रकारांना खटकते का ? तुम्हाला हास्यविनोद करणारा पत्रकार खटकतो. गंभीर दाखवलेला पत्रकारही खटकतो. मग पत्रकार दाखवायचा कसा ? मी आता एवढंच सांगतो, मी पत्रकारावर चित्रपट काढलेला नाही. पत्रकार हा चित्रपटाचा स्वतंत्र विषय आहे. आणखी एक तक्रार अशी होती की, चित्रपटात समूह म्हणून गावकरी दिसत नाहीत. गावकरी दोनदा पाठमोरे दिसतात. तिसऱ्यांदा अंधारात दिसतात. गावकरी कोण, कसे, गावकऱ्यांना मुगुटराव काय चीज ते माहिती ! त्याच्या माघारी त्याच्या नावाने ते बोटे मोडतात. पण त्याच्याविरुद्ध ब्र काढीत नाहीत आणि शेवटी जाऊन पारधी वस्तीला आग लावतात. असे हे गावकरी दाखवून काही विशेष साधलं नसतं. हे गावकरी फक्त चकाट्या पिटतात खुनाचं सत्र चालू असतानाही चविष्टपणे बोलण्यापलीकडे काही करत नाहीत. गावात घबराट दिसली नाही, असं बोललं गेलं. त्याचं कारण सांगतो मला सस्पेन्स करायचा नव्हता. खून हे या चित्रपटातलं टेन्शन नाही. हत्याकांड सुरू असताना गावकरी सुपारी कातरत फक्त चर्चा करतात, हे माझ्या दृष्टीने टेन्शन आहे. कॅरेक्टरची 'ग्रोथ' होत नाही असा एक आक्षेप घेतला गेला. हवालदार आणि मुगुटराव एकमेकांना सांभाळून एकमेकांना डाव टाकतात. ही 'कॅरेक्टर ग्रोथ' आहे असे मला वाटतं. मोहिनी वर्दे यांनी सूत्रांचा मुद्दा सांगितला. एक सूत्र कदाचित बरं झालंही असतं; पण काय झालं असतं याला फारसं महत्त्व नाही. रेखा देशपांड्यांनी तर शेवट सुचवला. तसा शेवट केला असता तर चित्रपट रेखा देशपांड्यांचा झाला असता, माझा झाला नसता. असं झालं

# राजहंस प्रकाशन सूची

| | | | |
|---|---|---|---|
| १. | टॉलस्टॉय–एक माणूस | सौ. सुमती देवस्थळे (दु. आवृत्ती) | रु. ५५–०० |
| २. | मॅक्झिम गॉर्की | ,, ,, | १०–०० |
| ३. | नाझी भस्मासुराचा उदयास्त | वि. ग. कानिटकर | ४५–०० |
| ४. | महाडचा मुक्तिसंग्राम | प्रा. रा. म. बिवलकर, प्रा. झुंबरलाल कांबळे | २०–०० |
| ५. | लाल किल्ल्यातील अभियोगाची कहाणी | पु. ल. इनामदार | २०–०० |
| ६. | एक होता कार्व्हर | सौ. वीणा गवाणकर | १५–०० |
| ७. | शतपावली | रवींद्र पिंगे | १६–०० |
| ८. | पश्चिमेचे पुत्र | ,, ,, | १४–०० |
| ९. | देवाघरचा पाऊस | ,, ,, | १०–०० |
| १०. | हैद्राबाद मुक्तिसंग्रामातील अज्ञात कथा | अशोक परळीकर | १२–०० |
| ११. | सांगत्ये ऐका | हंसा वाडकर (ति. आवृत्ती) | १२–०० |
| १२. | रातराणी | विजय तेंडुलकर | १२–०० |
| १३. | आर् डॉक्युमेंट | अशोक जैन | १०–०० |
| १४. | टच् | अशोक प्रभाकर डांगे | १०–०० |
| १५. | गुजराथेतील मराठी राजवट | वि. गो. खोबरेकर | ७–०० |
| १६. | पूर्णिया | अनिल अवचट (दु. आवृत्ती) | ६–०० |
| १७. | परसूच्या पशुकथा | वसंत सबनीस | २–०० |
| १८. | सहा साहसे | दा. सी. देसाई | २–०० |

**राजहंस प्रकाशन, १०२५ सदाशिव, नागनाथ पाराजवळ, पुणे ३०**

असतं तर तसं, असं कलाकृतीच्या बाबतीत गणित मांडू नये. ज्या कलाकृतीत जास्त अर्थ सापडतात ती कलाकृती श्रेष्ठ. शेक्सपियर म्हणूनच आपल्याला अजूनही आवडतो. मी महान कलाकृती निर्माण केली असा माझा दावा नाही. पण मी एक प्रयत्न केला आहे. राजीव नाईक म्हणाले, चित्रपट पाहिल्यावर ते कोरडेच राहिले. त्याच्या काही प्रतिक्रियाच नाहीत. चित्रपट त्यांना आवडला नसता, कारणं सांगितली असती तर मी उत्तर दिलं असतं. त्यांच्या प्रतिक्रिया नाहीत, तर मी तरी माझ्या काय प्रतिक्रिया सांगणार ? पण प्रतिक्रिया नाही, म्हणून त्यानी बऱ्याच प्रतिक्रिया नोंदवल्या. त्याच प्रतिक्रिया संजीव साबळे यांनी साप्ताहिक 'दिनांक' मधे नोंदवल्या आहेत. कदाचित राजीव नाईक यानीच 'दिनांक' मधे संजीव साबळे या नावाने लिहिले असेल. कदाचित या दोघानी एकत्र चर्चा करून काय लिहायचं, काय बोलायचं हे ठरवल असेल. 'दिनांक' मध्येच मी जाहीर उत्तर दिलं आहे. तेव्हा आता जास्त बोलत नाही. राजीव नाईकांनी चांगल्या चित्रपटांची जी उदाहरणे दिली ती सगळी परदेशी, बंगाली, कानडी, गुजराथी चित्रपटाची होती. त्यात एकही मराठी चित्रपट नव्हता. मी बंगाली, कानडी चित्रपटांशी संबंधित आहे. एक पाहून ठेवलं, आपण मराठी लोक इतरांचं कौतुक करतो. पण मराठीचं अजिबात नाही. 'आक्रीत' बद्दल तांत्रिकदृष्ट्या कोणी बोललंच नाही. तांत्रिकदृष्ट्या चित्रपट उत्तम असल्याचं शाम बेनेगल मृणाल सेन, दत्ता धर्माधिकारी, तंत्रज्ञ गिरीश कर्वे या सगळ्यांनी सांगितलं. पण आज हे कोणी बोललं नाही. मी बेसिकली चित्रकार आहे. अँगल, कापोझिशन याबद्दल मी आठवडाभर बोलू शकतो अँगलविषयी जास्त बोलून कोणी स्वत:चे पितळ उघडं पडू देऊ नये.

'मी प्रेक्षकांसाठी चित्रपट बनवतो. पण याचा अर्थ प्रेक्षकांची आवड लक्षात घेऊन, तिचं गणित मांडून चित्रपट काढणार असं नव्हे. मला जे उत्कटतेने जाणवतं, सांगावंसं वाटतं ते मी चित्रपटातून दाखवणार. थिएटर रिकामं पडलं तर त्याचं मला वाईट वाटेल. पण म्हणून मी प्रेक्षकाच्या आवडीप्रमाणे जाणार नाही. ज्या मूल्यांवर मी विश्वास ठेवतो त्यानुसारच मी जाणार! माझी खात्री आहे, आज नाही तरी उद्या माझा चित्रपट प्रेक्षकांपर्यंत पोहोचेल!'

श्री. अमोल पालेकराच्या भाषणानंतर अध्यक्ष श्री. वसंतराव साठे समारोपाचं बोलायला उभे राहिले. तेव्हा श्रोत्यांतून श्री. संजीव साबळे यांनी पुढे येऊन सांगितलं, 'मला थोडं बोलायचं आहे. मी अध्यक्षांकडे तशी चिठी दिली होती.' अध्यक्षानी श्री. साबळे याना बोलण्याची परवानगी नाकारली–श्री. साबळे चिडून म्हणाले, 'माझं व्यक्तिगत नाव व्यासपीठावरून उच्चारलं गेलं आणि तुम्ही मला बोलू देत नाही हा माझ्यावर अन्याय आहे!' मागच्या बाजूला बसलेली बरीच तरुण मंडळी उठली. बाचाबाची सुरू झाली. 'आम्हाला प्रश्न विचारायचे होते, आम्ही प्रश्न लिहून अध्यक्षांकडे पाठविले होते, पण आम्हाला उत्तरं मिळाली नाहीत, असं मोठमोठ्याने बोलू लागली. वातावरणात एकदम तणाव आला. तरीही अध्यक्षांनी कोणाला बोलण्याची अगर प्रश्न विचारण्याची परवानगी दिली नाही. श्रोत्यांनी प्रश्न विचारावेत, अमोल पालेकर उत्तरे देतील, श्रोत्यांचा सहभाग कार्यक्रमात असेल असं कार्यक्रमाच्या निमंत्रणपत्रिकेवर स्पष्ट लिहिलेलं होतं. त्या तरुणांची मागणी बरोबर होती; पण अध्यक्षांनी कोणतंही कारण न सांगता मी कोणालाही बोलण्याची परवानगी देत नाही, असं अतिशय बेपर्वाईच्या स्वरात सांगितलं. एकच गोंधळ झाला. श्रोत्यांमधून कोणी तरी ओरडलं, 'अमोल पालेकरना शेवटी बोलायची संधी मिळाली. त्याचा त्यांनी गैरफायदा घेतला!' दुसरं कोणी तरी ओरडलं 'अध्यक्ष सांगतील त्याप्रमाणेच झालं पाहिजे!' 'तुम्ही कोण बोलणार ?' 'आम्हाला बोलायचंय्!' 'वाटेल ती विधानं करता ?' 'अधिकार काय ?' असा सगळा एकच गिल्ला झाला. श्रोत्याना बोलण्याची संधी नाही म्हणून in protest I walk out असं मोठ्यानं सांगून श्री. राजीव नाईक व्यासपीठावरून उतरले. तरीही अध्यक्ष त्यांच्याकडे लक्ष न देता समारोपाचं बोलण्याचा प्रयत्न करू लागले; पण सभागृहातील कोणीच ऐकण्याच्या मन:स्थितीत नव्हतं. सगळे लोक उठून चालायला लागले. मग अध्यक्ष थांबले. व्यासपीठावरचे लोकही उठून सभागृहाबाहेर जाऊ लागले. श्री. अमोल पालेकरांभोवती खूप गर्दी झाली. भांडणाऱ्यांची आणि इतरांचीही. ते तसेच बाहेर पडले. अशी चांगली सभा गोंधळात (किंवा नाटयमयपणे) विसर्जित झाली. खाली सभागृहाच्या आवारात श्री. अमोल पालेकर यांच्याभोवती खूप गर्दी होती. ते शांतपणे मधे उभे होते; पण भांडणारी मंडळी सगळी निघून गेली होती. आताची गर्दी 'चित्रपटसितारा' अमोल पालेकर याच्याभोवती होती. तिचा त्या सभागृहातील चर्चेशी संबंध वाटत नव्हता. वातावरण शांत होते. प्रभात चित्रमंडळाचे कार्यकर्ते त्या गर्दीत आपली माणसं शोधून त्यांना कँपा कोला, चहा वगैरे देण्याचं राहिलेलं काम उरकत होते. रात्रीचे पावणेदहा वाजून गेले होते. □


## नवीन दाखल झालेली पुस्तके

1. **The Life And Times of Lord Mountbatten**–By John Terraine–( Profusely illustrated )
2. **The Earth**–(Illustrated Time–Life book) By Arthur Beiser.
3. **Interpretation of Dreams**–By Sigmund Freud.
4. **The Man Who Kept Secrets**–(Bestseller-Non–fiction Most exhaustive book on CIA )–Richard Helms And the CIA By Thomas Powers.
5. **The Stunt Man**–( fiction–Picture Story )–By Paul Brodeur.

१. हल्दीघाटीतून कुलूघाटीत–( प्रवासवर्णन )–प्रा. सौ. मेधा काळे.
२. मेलडी–भालचंद्र नेमाडे.
३. कमळण–( कथा )–अरविंद गोखले.
४. सदाफुली–( वृत्तपत्रीय लेख )–सुहासिनी मुळगावकर.
५. धुमाकूळ–( लेख )–प्रमोद नवलकर.

¤ Good furniture, car and TV will not make you cultured. Books will. For inwardly and outwardly beautiful books—

**दि फिनिक्स लायब्ररी**

**७२७ सदाशिव पेठ, पुणे ४११ ०३०**

MANOOS (Marathi Weekly) 100 Paise Regd. No. PNC–W 28
(Licensed to post without prepayment of postage–No. 11)



प्रभात फिल्म कंपनी
मास्टर विनायक
सांगत्ये ऐका
(हंसा वाडकर आत्मचरित्र)
सत्यजित रे
गुरुदत्त
या चित्रपटपुरवण्या
माणूस दिवाळी अंकातून
यापूर्वी सादर झाल्या.
यंदा
भारतीय बोलपटसृष्टीचे
सुवर्णमहोत्सवी वर्ष साजरे होत आहे.
त्यानिमित्त

# अर्धशतकाच्या उंबरठ्यावरील भारतीय बोलपटसृष्टी

ही खास सचित्र व अभ्यासपूर्ण पुरवणी

## माणूस: दिवाळी अंकासोबत



या पुरवणीमध्ये बोलपटसृष्टीचे विविध टप्पे जवळून न्याहाळणाऱ्या अभ्यासकांच्या मुलाखती.
हे माध्यम हळुवारपणे हाताळणाऱ्या यशस्वी निर्माते–दिग्दर्शकांच्या प्रतिक्रिया.
भारतीय बोलपटांच्या पन्नास वर्षांतील चढ–उताराचा विविध दृष्टिकोनांतून विस्तृत आढावा घेणारे लेख.
ध्वनी, अभिनय, गीत–संगीत यांच्या प्रभावाचं विश्लेषण.
या सगळ्याबरोबरच मनाच्या कोनाड्यामधल्या अनेक आठवणी, दंतकथा व बोलपटसृष्टीच्या प्रवासात उमटलेल्या पाऊलखुणा दर्शवणारी असंख्य दुर्मिळ छायाचित्रं
आपल्याही संग्रही हवीच अशी पुरवणी, हवाच असा अंक

## माणूस दिवाळी विशेषांक